# का व्य वा हि नी

## खंड दुसरा


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...४९२६१... वि: ......
क्रमांक ...१०५५... नों. दि. २५/३/५८
१७१५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६९६१
दा. क्र.

REFBK-0016961



संपादक

रा. श्री. जोग

कुसुमाग्रज



कॉंटिनेंटल् प्रकाशन, पुणें २

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉंटिनेंटल् प्रकाशन,
टिळक रोड, पुणें २

सर्व हक्क सुरक्षित

किंमत तीन रुपये

मुद्रक :
य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.)
आनंद मुद्रणालय
१९६।४६ सदाशिव, पुणें २

# निवेदन

अर्वाचीन मराठी काव्याचा एक निवडक संग्रह व्हावयास पाहिजे अशी आमची बऱ्याच दिवसांची मनीषा होती. मराठी काव्याच्या नवीन आविष्कारास आतां साठ वर्षें होऊन गेलीं आहेत, आणि ज्यास आज ‘ नव कविता ’ असें म्हणण्यांत येतें असें काव्यहि उदित होत आहे. अर्वाचीन काव्याची परिणति आणि नवीन कवितेचा उदय अशा संधिकालांत आमच्या मनीषेस अधिकच चालना मिळाली आणि तीमधून ‘ काव्य–वाहिनी ’चा उगम झाला. अर्वाचीन कविता प्राधान्यानें भावगीतात्मक आहे; म्हणून या संग्रहांतून भावगीत कविताच यावीं ही दृष्टि डोळ्यांपुढें होती. साठ वर्षांतील या काव्यवाहिनीचें रूपदर्शन एकाच खंडांत करून देणें ही गोष्ट शक्य नव्हती; म्हणून आम्ही तें तीन खंडांमधून करविण्याचें योजिलें आहे. त्यांपैकीं पहिल्या खंडांत केशवसुत आणि त्यांच्या बरोबर वा मागोमाग काव्यरचना करण्यास प्रारंभ करणाऱ्या कवींच्या कविताच घेण्यांत आल्या आहेत या दुसऱ्या खंडांत गोविंदाग्रज, बालकवि आणि त्यांचे समकालीन कवि यांच्या कवितेचें दर्शन होत आहे. तिसऱ्या खंडांत रविकिरणमंडळांतील कवि आणि त्यांचे समकालीन यांची कविता येईल. बहुधा आणखीहि एखादा खंड करावा लागेल. आमच्या इच्छेस मूर्त रूप देण्याचें अंगावर घेतल्याबद्दल श्री. अ. अं. कुलकर्णी यांचे आम्ही आभारी आहों. त्याचप्रमाणें या खंडांत ज्या कवींचें काव्य आलें आहे, त्यांचा व्यावहारिक वारसा ज्यांच्याकडे आलेला आहे, त्यांनीं त्या त्या कवींच्या कविता घेण्यास अनुमति दिली याबद्दलहि आम्ही त्यांचे ऋणी आहों.

रा. श्री. जोग
कुसुमाग्रज

# तीरावर

'अर्वाचीन काव्य '–वाहिनीच्या दुसऱ्या, जरा खालच्या घाटावर आज आपण उभे आहोंत. 'काव्य-वाहिनी ' च्या पहिल्या कालखंडांत केशवसुतांची संपूर्ण कविता लिहिली गेली. त्यावेळीं अर्थात् केशवसुतांचा संप्रदाय अथवा परंपरा अशी निर्माण झालेली नव्हती हें सांगावयास नकोच. परंतु त्यांचें निराळेपण, वैशिष्ट्य वा वैलक्षण्य हें कविजनांस तरी प्रतीत झालें होतें असें या दुसऱ्या कालखंडांतील कवींच्या काव्यावरून व उद्‌गारांवरून दिसून येतें. या दुसऱ्या खंडांतील कांहीं कवींनीं तरी केशवसुतांना आपला नेता बनविलें, त्यांचें गुरुपद मान्य केलें व त्यांच्या अनुकरणास प्रारंभ केला. केशवसुतांचे समकालीन, किंबहुना वयानें व काव्यरचनेच्या दृष्टीनें त्यांच्याहून ज्येष्ठ अशा रे० टिळकांनींच उदार अंतःकरणानें 'केशवसुत करि गानातें । आम्ही गातों सांगातें ' असें म्हणून केशवसुतविषयक या भावनेला स्पष्टता दिलेली होती. याच भावनेच्या उर्मीमध्यें ते ' कविता गाया । कृष्णानें जी शिकवीली ' असेंहि म्हणून जातात. केशवसुतांच्या पुढील पिढीचे प्रातिनिधि, कवि रेंदाळकर आणि गोविंदाग्रज यांनीं या संप्रदायभावनेला पुष्टीच दिली. रेंदाळकरांनीं केशवसुतांना ' प्रतिभानभो-विहारी कविखगेन्द्र ', अशीं विशेषणें देऊन त्यांच्या वाणीचें वर्णन ' गंगौघापरि भव्य व सावेश ' अशा शब्दांनीं केलें, आणि ' आहे साथ करावयास बसलों राहून मागें तुझ्या ' या शब्दांनीं आपलें अनुयायित्व जाहीर केलें. गोविंदाग्रजांनीं आपल्यास ' केशवपुत्राचा महशूर—गोविंदाग्रज सच्चा चेला ' म्हणवून घेतल्याचें महशूरच आहे. केशवसुत हे अर्वाचीन कवींत ' कवींचे कवि ' होऊन गेल्याचें केशवसुतांचे शिष्य कवि न. शं. रहाळकर हे सांगतात. रेंदाळकरांचे मित्र कवि नागेश हे ' केशवसुत हे नवीन कवींच्या हातांत एक जादूची कांडी देऊन गेल्याचा ' उल्लेख करितात. कांहीं काळ ' केशवसुत ' हें नांव स्वतः घेऊन रचना करणारे श्री. नारायण केशव बेहेरे हेहि केशवसुतांच्या काव्योपवनांत फुललेल्या फुलांनीं अवनी वेडी झाली असें म्हणून त्यांची कविता संग्रहीत करण्याबाबत त्यांच्या ' शिष्यांना ' आवाहन करितात. केशवसुतांची कविता समग्र अशी एकत्र उपलब्ध

होण्याच्या आधींच ' चेला ', ' शिष्य ', ' साथ ' इत्यादि शब्दयोजना सुरू झाली होती हें यावरून स्पष्ट होतें. ती कविता एकत्र प्रसिद्ध झाल्यावर तिचा अनुयायिवर्ग वाढावा ही गोष्ट स्वाभाविक होती. अशा कवींत कवि काव्यविहारी यांनीं केशवसुतांना उद्देशून ' ज्या मार्गांतुनि आपण गेलां । ज्या मार्गावरि तुमचा चेला । तोच मार्ग मीं अंगिकारिला ' असें म्हणून केशवसुतांच्या वेगळ्या मार्गाची जाणीव प्रकट केली. आपल्या कवितेंत केशवसुतांचा स्पष्ट निर्देश न करितांहि त्यांचें अनुकरण व अनुयायित्व करणारे कवीहि होतेच. सारांश, अर्वाचीन कवींच्या दुसऱ्या पिढींत केशवसुतपरंपरा सुरू झाली असें म्हणावयास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

केशवसुत संप्रदायांतील कवि त्यांच्या कवितेंतील कोणत्या विशेषानें प्रभावित झाले होते हें पाहणें त्यांच्या संप्रदायाचें स्वरूप निश्चित करण्याच्या दृष्टीनें उद्‌बोधक होईल. वर उल्लेखिलेल्या बहुतेक सर्व कवींनीं केशवसुतांच्या ' तुतारी ' या कवितेचा निर्देश प्राधान्यानें केलेला आहे असें आढळून येतें. गडकऱ्यांनीं ज्या आपल्या कवितेंत स्वतःला ' केशवसुतांचा सच्चा चेला ' असें म्हणवून घेतलें, तीमध्यें कवि ' कृष्णा ' च्या ' तुतारी ' चाच उल्लेख त्यांनीं दोन वेळां केला आहे. रेंदाळकरांनीं प्रथमतः ' तुतारी ' चा निर्देश करून मगच ' हरपलें श्रेया ' चा उल्लेख केला आहे. रहाळकरांनीं इतर कांहीं कवितांबरोबर तुतारीचेंहि नांव घेतलें असल्याचें दिसतें. कवि नागेशांच्या पूर्वोक्त उद्‌गारांत ज्या जादूच्या कांडीचा उल्लेख येत आहे, ती कांडी म्हणजे ' तुतारी ' असेंच त्यांना म्हणावयाचें आहे. ' दिव्य तुतारी कवि केशवसुत । फुंकित आहे नंदनवनगत ' असे उद्गार त्यांनीं काढिले आहेत. ' केशवसुतांस ' उद्देशून लिहिलेल्या आपल्या कवितेमध्यें काव्यविहारींनींहि ' तुतारी ' चाच उल्लेख तीनचार ठिकाणीं केला आहे, आणि तुतारीभक्त या शब्दानें केशवसुतांच्या कवितेच्या चाहत्यांचा निर्देश ते करितात. तुतारीभक्त या शब्दानें प्रतीत होणारा अर्थ ' तुतारीमंडळ ' या शब्दामध्येंहि व्यक्त होत आहे, व त्या मंडळांत इतर कांहींच्याबरोबर गोविंदाग्रज आणि बालकवि या दोघांनींहि आपलीं नांवें दाखल केलीं होतीं असें दिसतें. तुतारी-मंडळ फार दिवस टिकलें नसलें तरी तुतारीसंप्रदाय हा मात्र दृढमूल झाला

आणि कांहीं मर्यादित अर्थानें तोच केशवसुत–संप्रदायहि मानला गेला. या कवींवर ‘ तुतारी ’ या कवितेची इतकी मोहिनी पडली होती कीं, तुतारी नसली तरी इतर एखादें वाद्य घेऊन त्याच्या आवाजानें सामाजिक जागृति करावी अशी इच्छा अनेक कवींना झाली. कवि टिळक यांनीं ‘ रणशिंग ’ फुंकलें. रेंदाळकरांनीं रणशिंगाचा नसला तरी एका साध्या शिंगाचा आश्रय केला. कवि नागेशांनीं केशवसुत आणि टिळक यांनीं दूर सारलेल्या ‘ सनई ’च्या साहाय्यानें तसेच विचार प्रकट केले. केशवसुतांचा किंवा त्यांच्या तुतारीचा उल्लेख न करणाऱ्या वी कवींनाहि ‘ डंका ’ वाजवून सामाजिक बंडाचे विचार प्रकट करावेसे वाटले. गोविंदाग्रज आणि बालकवि यांनीं वाद्यांचा उपयोग न करतांहि तुतारी-सदृश कविता लिहिल्या, व तुतारीबद्दल नापसंती व्यक्त करूनहि ‘रुद्रास आवाहन’ करितांना तांबे यांना डमरु, शृंग व शंख या वाद्यांचा उल्लेख करावा लागला. तात्पर्य, तुतारीसंप्रदाय अथवा केशवसुत-संप्रदाय म्हणजे सामाजिक सुधारणेचें अथवा क्रांतीचें प्रतिपादन करणारा संप्रदाय असाच अर्थ निदान कविजनांच्या मनामध्यें घर करून राहिला होता असें दिसतें. केशवसुतांच्या ज्या इतर कवितांचा उल्लेख पुढील कवींनीं केला आहे, त्यांत निशाण, नवा शिपाई याहि त्याच वर्गांत पडूं शकणाऱ्या कविता आहेत. इतर कवितांत ‘ हरपलें श्रेय ’, ‘ म्हातारी ’, ‘ आम्ही कोण ’, ‘ झपूर्झा ’, या कवितांचा निर्देश झालेला आढळतो. पण कोणीहि कवि त्यांच्या प्रेमकवितांचा उल्लेख करीत नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. केशवसुतांच्या ज्या प्रणयपीडितत्वाचा श्री. माडखोलकरांनीं एवढा पुकार केला, तें प्रणयपीडितत्व केशवसुतांना निकट असणाऱ्या पिढींतील कवींच्या लक्षांत आलें नसावें अथवा प्रणयपीडित असूनहि केशवसुतांना इतरांच्या लक्षांत राहील अशी प्रेमकविता लिहितां आली नसावी.

वस्तुतः सामाजिक क्रांतीचे विचार प्रकट करणें हा केशवसुतांच्या एकंदर कवितेमधील महत्त्वाचा, परंतु अगदीं अल्पसंख्य कवितांचा विषय आहे. केशव-सुतांच्या कवितेनें एवढेंच कार्य केलें असें म्हणतां येणार नाहीं, आणि म्हणून केशवसुतपरंपरा सामाजिक विचारप्रकटनापुरती मर्यादित करितां येणार नाहीं.

आपल्या कवितेनें केशवसुतांनीं मराठी कवितेस कांहीं निराळेंच वळण दिलें असें नंतरच्या कवींस वाटत असल्याखेरीज त्यांनीं केशवसुतांचें अनुकरण केलें नसतें. सामाजिक क्रांतीच्या विचारांत रूढिभंजनाला विशेष महत्त्व असलें तरी व्यक्तिस्वातंत्र्यालाहि कमी महत्त्व होतें असें नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणून तिच्या विकासाला वाव मिळूं देत नाहीं, म्हणूनच रूढीचें भंजन करण्याची भाषा सुरू होते. व्यक्तिस्वातंत्र्यामध्यें प्रेमस्वातंत्र्य ही एक महत्त्वाची बाब आहे. म्हणूनच आपल्या प्रेमविषयक भावनेला नवीन कवींनीं उघडपणें अभिव्यक्ति देण्यास प्रारंभ केला. नवीन कवितेचें स्वरूप आत्मलेखनाचें असल्यानें केशवसुतांनींहि आपली प्रेमविषयक कविता आत्मनेपदी स्वरूपांत लिहिलेली असली तरी तीमध्यें स्वतःच्या अनुभवाचे बोल आले असावेत असें वाटत नाहीं. केशवसुतांनीं इंग्रजी प्रेमकवितेचें वाचन बहुतांशीं विवाहोत्तर केलेलें असल्यानें त्यांच्या प्रेमकवितेमधील विचार व कल्पना प्रत्यक्षानुभवापेक्षां पुस्तकी आणि बौद्धिक आकलनांतून आलेल्या दिसतात. त्यांच्या पुढील पिढींतील कवींना या प्रेमकल्पना इंग्रजी काव्य किंवा केशवसुतांचें काव्य यांमधून अल्पवयांत व विवाहपूर्व अशा स्थितींत समजल्या. म्हणून प्रेमविषयक आकांक्षा मनामध्यें खरोखरीच निर्माण होऊन त्यांची कविता लिहिली गेली. समकालीन परिस्थितीमुळें या आकांक्षा सफल होण्यासारख्या नसल्यानें गोविंदाग्रज व रेंदाळकर यांच्या पदरीं निराशाच आली व तिचा आविष्कार त्यांच्या कवितेमधून उत्कटत्वानें झाला.

परंतु रूढिभंजनाचे विचार किंवा प्रणयप्राधान्य वा प्रणयपीडितत्व यांपैकीं कोणतेंहि एक अथवा दोनहि मिळून केशवसुतसंप्रदाय झाला असें समजणें चुकीचें होईल. केशवसुतांनीं मराठी कवितेला जें नवीन वळण लावलें तें गेल्या शतकांतील इंग्रजी भावगीत–काव्याचें होय ही गोष्ट सर्वपरिचितच आहे. भावगीतकाव्याचें प्रधानस्वरूप म्हणजे कवीनें स्वतःच्या उत्कट भावनांस दिलेलें शब्दरूप होय. आत्मलेखन किंवा आत्माविष्कार उत्कटपणें करणें हेंच खरोखर या नवीन कवितेचें स्वरूप आहे. तें स्फुट अशा लहान लहान रचनेच्या द्वारें होऊं लागून ती कविता बाह्यरूपाच्या दृष्टीनेंहि निराळी झाली हा भाग लक्षणीय असला तरी गौण आहे. केशवसुतांनीं रचनादृष्ट्या सुकर अशीं कित्येक मात्रावृत्तें

नव्यानें निर्माण केलीं व गडकरी, बालकवि इत्यादींनीं त्यांचा भरपूर प्रमाणांत उपयोग केला म्हणून नवीन कविता जुन्या कवितेपेक्षां स्पष्टपणेंच वेगळी होऊन केशवसुत–संप्रदाय निर्माण झाला असें म्हणावें लागेल.

या भावगीतसंप्रदायासच काव्यांतील रोमँटिक संप्रदाय असेंहि म्हणतां येईल. ठराविकाविरुद्ध बंड, व्यक्तिस्वातंत्र्याचें गुणगायन, निसर्गाबद्दलचें प्रेम, प्रेमाबद्दल विशेष कल्पना इत्यादि रोमँटिक कवितेचे मानले गेलेले विशेष या काव्यामधून दिसून येतात. या विविध विषयांचा आविष्कार प्रत्येक कवीमध्यें सारख्या प्रमाणांत झाला असें अर्थातच म्हणतां येणार नाहीं. तथापि सारे मिळून संप्रदाय असा एकच होतो. या दृष्टीनें रेंदाळकर, गडकरी, बालकवि इत्यादि कवींच्या काव्याचा थोडा अधिक परामर्श घेणें योग्य ठरेल.

कवि रेंदाळकर यांचा इंग्रजी कवितेचा व्यासंग हा मूळचा नव्हे. त्यांचें शिक्षण मराठी आणि नंतर संस्कृत अशा मर्यादेंतच झालेलें होतें. त्यांच्यावर वस्तुतः केशवसुतपूर्व पंडिती परंपरेची छाप बसणें हेंच स्वाभाविक ठरलें असतें. परंतु तसें न होतां त्यांनीं या नवीन संप्रदायाची कांस धरली, हें केशवसुतांच्या कवितेच्या परिणामामुळें झालें. केशवसुतांनीं सामाजिक रूढीविरुद्ध जें बंड उभारलें त्याचें पुढील टोंक गांठून रेंदाळकरांनीं समाजच आपला तिरस्काराचा विषय बनविला. " आहे मूढ समाजदृष्टि बहुधा त्याची भ्रमें झाकते " असें ते म्हणतात. समाज या अर्थानें जग या शब्दाचा उपयोग करून त्यालाहि ते मूढ ठरवितात असें " जगाला मूढाला त्रिदित न महोदात्त विषय " या ओळींत दिसून येतें. त्यामुळें जगाकडे पाठ फिरवून कल्पनेच्या मनोराज्यांत ते गुंग होऊन रहातात. रेंदाळकरांनीं आपली प्रेमविषयक कल्पनाहि कांहीं चमत्कारिक बनविली होती. तिला 'प्लेटॉनिक प्रेमा'चें नांव कदाचित् देतां येईल. या कल्पनेमुळें मित्र, भगिनी आणि प्रेयसी या सर्वांच्यावरील प्रेम एकाच स्वरूपाचें असूं शकेल व पत्नीप्रेमामध्यें शारीर भाग कांहीं नसावा अशीहि त्यांची कल्पना असावी असें दिसतें. पत्नीबाबत असा संयम राखतां आला नाहीं म्हणून ते स्वतःची निर्भर्त्सनाहि करून घेतात आणि " चित्तीं मीं प्रेमाची व्याख्या जी करुनि ठेविली होती ती प्रत्यक्षामध्यें चुकीची ठरली " अशी कबुली ते देतात.

प्रेमाच्या तात्त्विक कल्पनेमध्यें ज्याप्रमाणें त्यांची निराशा झाली त्याप्रमाणें त्यांच्या व्यावहारिक अनुभवांमध्येंहि त्यांची निराशा झाली असावी. या निराशेचा उल्लेख प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें त्यांनीं आपल्या अनेक कवितांमधून केलेला आहे. ठराविकाविरुद्ध करावयाच्या बंडामध्यें रेंदाळकरांनीं निर्यमक कवितेचा पुरस्कार केलेला दिसून येतो. संस्कृत कवितेमध्यें यमक नाहीं ही गोष्ट त्यांना अनुकूल वाटली असेल. तरीहि यमकबंधन तोडण्यामध्यें संस्कृतच्या अनुकरणा-पेक्षां रोमँटिक कवींची स्वातंत्र्यप्रीतीच असावी असें वाटतें. निर्यमक कवितेला विरोध असणाऱ्या दिवसांमध्यें त्या कवितेचा सक्रिय असा पाठपुरावा रेंदाळकरांनीं मोठ्या धडाडीनें केला, व निर्यमक रचना हीहि काव्यमय होऊं शकते हें त्यांनीं दाखवून दिलें. या प्रयत्नाला मिळावें तसें यश मिळालें नाहीं हें खरें, परंतु निर्भयपणें निर्यमक कविता रचण्याचें श्रेय त्यांना दिलें पाहिजे, यांत शंका नाहीं.

केशवसुतांचे दुसरे आणि 'सच्चे चेले' गडकरी यांच्यावर रोमँटिक संप्रदायांतील प्रणयप्राधान्याचा विशेष परिणाम होऊन मराठी कवितेंतील 'प्रेमाचे शाहीर' अशी पदवीहि त्यांना मिळाली. त्यांची प्रेमकल्पना रेंदाळकरांच्या प्रेमकल्पनेपेक्षां भिन्न व बहुतांशीं वास्तव अशी होती. म्हणून त्यांच्या कवितेमधून प्रेमाची उत्कट आर्तता उत्तम प्रकारानें व्यक्त झालेली दिसते. त्यांच्या जीवनामध्यें या आर्ततेला अनुभवसिद्ध अशा प्रकारचें स्थान प्राप्त झालें होतें. परिस्थितीमुळें त्यांनाहि आपल्या प्रेमजीवनांत निराशा पत्करावी लागली, आणि तिचे पडसाद त्यांच्या कवितेमधून उमटले. तथापि गडकऱ्यांनीं स्वतःस केशवसुतांचे सच्चे चेले म्हणवून घेतलें तें प्रेमविषयाच्या बाबतीमध्यें नव्हे. काव्यामध्यें सामाजिक सुधारणेचे विचार व्यक्त करून आपली दृष्टीहि सामाजिक असल्याचें दाखविण्याचा प्रयत्न गडकऱ्यांनीं केला. तरी पण त्यांची कविता सामाजिक असण्यापेक्षां वैयक्तिकच अधिक असावी असें त्यांच्या समग्र कवितेवरून वाटतें. गुरु आणि शिष्य यांच्या कवितेंतील या फरकामुळें गुरु क्रांतिकारक तर शिष्य प्रतिक्रांतिकारक अशीहि कल्पना कांहींकांची झाली. तसेंच पाहिलें तर गोविंदाग्रज सामाजिक सुधारणेस मुळींच प्रतिकूल नव्हते हें

त्यांच्या दसरा, घुबडास, स्मशानगीत इत्यादि कवितांमधील समाजाच्या प्रचलित स्थितीवरील टीकेवरून दिसून येतें. बोलक्या सुधारकांवरील 'एक समस्या' या कवितेमधील त्यांची टीका म्हणजे समाजसुधारणेस विरोध नव्हता. पण भोंवतालची दुनिया दीडवितीची असल्याच्या जाणीवेमुळें सामान्यांविषयींची सहानुभूति ते प्रकट करूं शकले नाहींत. पण काव्यांतील क्रांतिकारकत्वाची ही कल्पनाच येथें गैरलागू होते. केशवसुतांनीं प्रणीत केलेल्या भावगीतसंप्रदायाला किंवा रोमँटिक संप्रदायाला गोविंदाग्रजांच्या कवितेनें अधिकच तेज चढलें व ही कविता लोकप्रिय झाली. अर्वाचीन मराठी कविता लोकप्रिय करण्याचें श्रेय गोविंदाग्रजांनाच जातें. त्यांच्या कल्पनासामर्थ्यानें आणि भाषाप्रभुत्वानें त्यांना या कार्यांत फार साहाय्य केलें, व विचाराच्या दृष्टीनें केशवसुतांपेक्षां पुढें न जातांहि नवीन मराठी कवितेचें पाऊल त्यांनीं पुढें नेलें यांत शंका नाहीं.

रोमँटिक संप्रदायाचा एक निराळाच पैलू बालकवींच्या कवितेंत प्रकट झाला. केशवसुतांचें निसर्गावर प्रेम असलें, तरी त्यांतील सौंदर्याच्या दर्शनापेक्षां त्यांतील शिवाकडेच त्यांचें लक्ष अधिक होतें. निसर्गाचा उपयोग रेंदाळकरांनीं मनांतील भाव व्यंजनेनें सांगण्यासाठीं केला; त्यावरील प्रेमानें नव्हे. गोविंदाग्रजांच्या कवितेंत त्याला गौणच स्थान मिळालें होतें. खरी निसर्गसौंदर्यलुब्धता बालकवींच्या कवितेंतच व्यक्त होते, त्यांच्या आधीं (व त्यांच्या नंतरहि म्हणावयास हरकत नाहीं) निसर्गांतील सौंदर्य पाहण्याचें सामर्थ्य व त्याजवरील अकृत्रिम प्रेम इतर कोणाहि कवीमध्यें दिसून येत नाहीं. निसर्गावरील प्रेमापुढें त्यांचें मानवावरील प्रेम फार फिकें पडतें व आपणहि कांहीं सामाजिक विचार करूं शकतों हें दाखविण्यासाठीं त्यांनींहि तुतारी-मंडळांत आपलें नांव दाखल करून घेतलें असलें व १-२ कविता त्याकरितां म्हणून लिहिल्या असल्या तरी तें त्यांचें क्षेत्र नव्हतें ही गोष्ट सहज दिसून येते. कोणा विशिष्ट मानवी व्यक्तीऐवजीं व्यापक अशा निसर्गावरच प्रेम केल्यानें त्यांत उदारता आली असली तरी रेखीव निश्चितपणाचा प्रत्यय येत नाहीं, व प्रेमाचा उच्चार त्यांनीं आपल्या कवितेंत पदोपदीं केलेला असला तरी त्यांची

कविता प्रेमविषयक असल्याचा परिणाम वाचकाच्या मनावर होऊं शकत नाहीं. बालकवींनीं आपल्या कवितेंत नवी प्रतिमायोजना केली आहे, म्हणून खरोखर नवीन व क्रांतिकारक कवि ते होत असा विचार आज मांडला गेला आहे. त्यांनीं योजिलेल्या प्रतिमांच्या सुबोधतेमुळें किंवा सहजसुंदरतेमुळें, त्यांचें नावीन्य लोकांच्या लक्षांत आजवर फारसें आलें नसावें, व म्हणून काव्याच्या नवीन संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून त्यांना ओळखण्यापेक्षां केशवसुतप्रणीत संप्रदायाचें एक पाईक म्हणूनच त्यांची सामान्य वाचकवर्गास माहिती आहे. केशवसुतांनीं रूढ केलेल्या बालानंद व पादाकुलक या जातींमध्येंच पुष्कळशी रचना केल्यामुळेंहि रसिकांची तशी समजूत झाली असावी. आपल्या नवप्रतिमायोजनेची जाणीव स्वतः बालकवींनाहि नसावी. किंवा असल्यास तिचा गाजावाजा करण्याचें धैर्य त्यांना नसावें. पण यामुळें नवकवितेच्या प्रवर्तनाचें श्रेय मात्र हुकलें असें म्हणावयास हवें.

रोमँटिक मनोरचनेंत जिला कांहींसें महत्त्वाचें स्थान आहे, अशी एक प्रकारची अनामिक हुरहूर बालकवींच्या कवितेंत आढळून येते. त्यांच्या शून्य मनाच्या घुमटांत कसलें तरी गीत घुमत असे, पण त्याचा अर्थ मात्र कळत नसे व त्यामुळें मनाला विश्रांति नाहीं अशी स्थिति होई. त्यांच्या कवितेंत ज्या ' दिव्या 'चा उल्लेख अनेक वेळां होतो, त्या ' दिव्या'ची ओढ त्यांना लागलेली होती. पण या ' दिव्या'चें आकलन मात्र त्यांना झालेलें असावें असें वाटत नाहीं. " काय बोचतें तें समजेना । हृदयाच्या अंतर्हृदयाला । " असें ते म्हणतात. " येथें नाहीं, तेथें नाहीं । काय पाहिजे मिळवायाला । " अशी त्यांची स्थिति होई. अशा या स्थितींतच महाराष्ट्रकाव्यतरूवरील बुलबुल एके दिवशीं अकालींच आगगाडीखालीं अपघातानें मरण पावला.

रेंदाळकर, गडकरी आणि बालकवि हे अर्वाचीन कवितेचे दुसऱ्या पिढींतील प्रमुख धुरीण होत. इतर अनेकांनीं आपापल्या परीनें हातभार लावला असला तरी तिची खरी मदार या तिघांवर होती. हे तिघेहि जवळजवळ एकदमच इह-लोक सोडून गेल्यामुळें अर्वाचीन मराठी कवितेला मोठाच धक्का बसला यांत शंका नाहीं. प्रस्तुत संग्रहांत ज्या इतर कवींच्या कवितेचा समावेश केला आहे, त्यांतील

नागेश, रहाळकर, बेहेरे, सोनाळकर हे नवीन संप्रदायांतलिच कवि म्हणतां येतील. पण यांच्यापेक्षां भावगीतत्वाच्या दृष्टीनें रणदिवे यांची कविताच अधिक सरस ठरेल. आपल्या जैनधर्मावरील श्रद्धेनें प्रथम प्रथम त्यांनीं धार्मिक व जुन्या पंडिती परंपरेची कविता लिहिली असली, तरी पुढें पुढें सामाजिक सुधारणेचें व्रत त्यांनींहि घेतलें. पण प्रतिपादनात्मक कवितेपेक्षांहि भावकवितेचीच गोडी त्यांना अधिक होती हें या संग्रहांत घेतलेल्या कवितांवरून कळून येईल.

भावकाव्याच्या संप्रदायापेक्षां भिन्न संप्रदायामधील एक प्रमुख कवि म्हणून सावरकरांचा विचार साहजिकच यापुढें प्राप्त होतो. केशवसुतांच्या कवितेचा परिणाम त्यांच्यावर कोणत्याच बाबतींत झाला नाहीं. इंग्रजी रोमँटिक कवितेपेक्षां मिल्टनच्या गंभीर महाकाव्यपद्धतीची छाप त्यांच्या मनावर अधिक बसली. मराठी कवींत मोरोपंतांच्या संस्कृतप्रचुर भाषेनें त्यांना तरुणवयांत आकृष्ट केलें. विधवांच्या स्थितीवर लिहिलेल्या एका दीर्घ कवितेबद्दल तरुणपणींच त्यांना पारितोषिक मिळालें असलें तरी सामाजिक सुधारणा त्यांच्या कवितेस विशेष प्रेरक झाली नाहीं. राजकीय पारतंत्र्य व इतिहासावर आधारलेला ज्वलंत देशाभिमान यांतूनच त्यांची महत्त्वाची कविता जन्म पावली आहे, व त्रुटित, भावप्रधान कवितेपेक्षां भरदार, दीर्घ, विचारप्रधान कवितेचेंच आकर्षण त्यांना फार असल्यानें गडकरी–बालकवि यांच्याप्रमाणें ते केशवसुतसंप्रदायांत बसूं शकले नाहींत. आपल्या काव्यप्रतिभेचें हें स्वरूप स्वतः सावरकरांच्या लक्षांत आल्यानें तिला अनुरूप अशा काव्यवाहनाची–वैनायक वृत्ताची–निर्मिति त्यांनीं केली. मराठींतील धवलचंद्रिका या मात्रावृत्ताचा चरण घेऊन त्याची इंग्रजींतील ब्लँक व्हर्सच्या धर्तीवर योजना करून 'गोमान्तक' या आपल्या काव्याचा उत्तरार्ध त्यांनीं लिहिला, व 'मूर्ति दुजी ती' सारख्या या संग्रहांत घेतलेल्या दीर्घ कवितेकरितांहि त्याचा उपयोग केला. विचारभाराच्या दडपणामुळें त्यांच्या कवितेमधील भावना दबतदबतच व्यक्त होते, व अर्थामध्येंहि क्लिष्टता येते. प्रस्तुत संग्रहांत घेतलेल्या बहुतेक कविता त्यांच्या दीर्घकाव्यांतलि उतारे आहेत, याचें कारण त्यांनीं लिहिलेल्या अल्प भावकाव्यापेक्षां या दीर्घ कवितांतच त्यांची पल्लेदार प्रतिभा अधिक चांगल्या प्रकारानें व्यक्त होते. नियमक कविता रूढ

करण्याचा सावरकरांचा प्रयत्नहि रेंदाळकरांच्या प्रयत्नाप्रमाणेंच यशस्वी झाला नाहीं, याचें एक कारण भावगीतकवितेस तो अनुकूल नाहीं हें असावें, पण त्याहीपेक्षां त्याचा पहिलाच आविष्कार प्रसन्न न होतां क्लिष्ट झाला हेंहि असण्याचा संभव आहे. महाकाव्य–लेखनांत गांभीर्याच्या परिणामाच्या दृष्टीनें ही क्लिष्टता कदाचित् इष्ट ठरली, तरी आत्माविष्कारात्मक भावकाव्यांत ती अनुकूल ठरत नाहीं. अशा स्थितींतहि केव्हां केव्हां भावकविता प्रकट झाली म्हणजे ‘ सागरा ! प्राण तळमळला ’ यासारख्या सर्वपरिचित भावगीताची निर्मिति सावरकर करितात.

महाकाव्यानुकूल मनोरचना असणारे दुसरे कवि साधुदास होत. रामचरित्रावर त्यांनीं संस्कृतपद्धतीचीं तीन महाकाव्यें लिहिलींहि. त्यांच्या इतर रचनेमध्येंहि कांहीं शतकस्तोत्रें व दीर्घ अशीच रचना पुष्कळशी आहे. कांहीं थोडीच स्फुट भावगीतस्वरूपाची कविता त्यांनीं लिहिली. दीर्घ कवितेंत दिसून येणारी रचनेची सुश्लिष्टता व प्रसन्नता या स्फुटकवितेमध्येंहि दिसून येते, तथापि अशी कविता लिहितांना त्यांच्या कवित्वाला विशेष तेज चढत नाहीं. तें त्यांच्या दीर्घ कवितेमध्येंच व्यक्त होई. इंग्रजी कवितेचा परिणाम त्यांच्या कवितेवर झालेला मुळींच दिसत नाहीं. शरीरानें नव्या कालांत, पण मनानें ते जुन्या कालांत वावरत असल्यानें जुन्यांकडून व नवीनांकडून त्यांच्या कवितेकडे सारखेंच दुर्लक्ष्य झालें. जुन्या पंडितकवींत श्रेष्ठस्थानीं बसण्याची पात्रता असूनहि भावकाव्याच्या युगांत त्यांच्या रचनेकडे फारसें लक्ष गेलें नाहीं, व नवीन कवितेबद्दल विशेषशी आस्था स्वतः त्यांना न वाटल्यानें त्या संप्रदायांतहि ते मान मिळवूं शकले नाहींत. भरपूर गुण जवळ असूनहि त्याला मान्यता मात्र योग्य प्रमाणांत मिळूं नये अशी त्यांची स्थिति झाली.

कवित्व व पांडित्य हीं दोनहि साधुदासांच्या मानानें कमी असूनहि तिवारींना मात्र कांहींशी एकांगी, पण पुष्कळ लोकमान्यता मिळाली व तिचें कारण त्यांच्या कवितेचा विषय हें होय. मराठ्यांच्या संग्रामगीतांच्या अनेक आवृत्ति निघाल्या यावरून ही लोकप्रियता अजमावतां येईल. तिवारींची लेखणी सर्वगामी व रचना विपुल आहे. काव्याचा जुना वा नवा कोणताहि प्रकार त्यांनीं अस्पृष्ट

ठेवला नाहीं. दीर्घ–स्फुट, ऐतिहासिक–पौराणिक, राष्ट्रीय–सामाजिक, नागर–जानपद, चित्र काव्य–भावगीत, शृंगार–भक्ति, स्वतंत्र–अनुवादात्मक, अशी आशय व रचना या दोनहि दृष्टींनीं विविध अशी कविता त्यांनीं लिहिली. तीपैकीं इतर कवितेचें स्वागत वाचकांकडून विशेषसें न झालें तरी संग्रामगीतें किंवा झांशीची संग्रामदेवता यांचें कौतुक मात्र भरपूर झालें. या कवितेमध्येंहि अर्थगौरवापेक्षां आवाज फार अशी कल्पना विदग्ध रसिकाची होते, व त्या आवाजामुळें भावना फिक्की पडते किंवा अवास्तव भडक वाटते. मराठी मातृभाषा नसतांना विपुल आणि विविध काव्यरचना करून मराठी कवितेची जी सेवा त्यांनीं केली ती मात्र कौतुकास्पद आहे.

मनाचा खरा ओढा जुन्या कवितेकडे, पण नवीन कवितेमध्यें स्थान मिळविण्याची आकांक्षा अशा ओढाताणींत कवि अनंततनय सांपडले होते. आपल्या तीन काव्यसंग्रहांस त्यांनीं ' हृदयतरंग ' असें नांव दिलें असलें तरी ते आत्मलेखनात्मक नसल्यानें त्यांना खऱ्या अर्थानें हृदयतरंग म्हणतां येणार नाहीं. आपल्या शारदादूतिका, स्वर्गाच्या द्वारांत, नवरसमंजरी इत्यादि प्रकरणांनींच त्यांनीं प्रसिद्धि मिळविली. तसें म्हटलें तर नवीन कवितेचे विषय व तीमधील प्रकार अनंततनयांनीं हाताळलेले दिसतील; परंतु थोडक्या अवकाशांत एखादी भावना उत्कट होऊन आत्मलेखनपद्धतीनें शब्दरूप पावली आहे असें त्यांच्या कवितेचें झालें नाहीं. त्या मानानें उपाध्ये यांनीं थोडी कविता लिहूनहि अधिक चमक प्रकट केलेली आढळते.

अर्वाचीन कवितेच्या द्वितीय कालखंडांतील कवितेचें स्वरूप हें असें आहे. विचार व रचना या दृष्टीनें कांहीं विशेष प्रकारचा नवीन उपक्रम या कालखंडांत झाला असें नाहीं. नियमक रचनेचा झालेला प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाहीं. केशवसुतांचें का होईना, पण अनुयायित्व पत्करल्यामुळें वैचारिकदृष्ट्या नवीन सांगण्यापेक्षां जें नव्यानें रूढ झालें होतें, त्याचाच अधिक प्रसार करून तें दृढमूल करावें यापलीकडे या अनुयायांची मजल गेली नाहीं. नवीन मराठी कवितेचें रूप अधिक रेखीव व स्पष्ट करून तिला रसिकजनांच्या मनांत मानाचें स्थान मिळवून देण्याचें कार्य मात्र या खंडांतील कवींनीं केलें. दुर्दैवानें त्यांतील

प्रमुख कवींच्या जीवनकलिका नैराश्यविद्ध आणि अकालोपहृत झाल्या व नवीन कवितेवर कांहीं काल तिमिरपटल आलें. पण पुढें लवकरच रविकिरणांचा उदय होऊन ती पुनः नव्या जोमानें वाटचाल करूं लागली. काव्यवाहिनीच्या या तिसऱ्या अवस्थेचें दर्शन पुढील खंडांत करविण्याचें योजिलें आहे. तोंपर्यंत रसिकांनीं वाट पाहावी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ४०२६९ विः काव्य
क्रमांक ३८८५८ नोंद दिः २५/३/६८

# अनुक्रमणिका


| कविता | कवीचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १. प्रबोधन | रेंदाळकर | १ |
| २. चल ये वेडे ! | रणदिवे | ३ |
| ३. कविनें कविता मागितली | साधुदास | ५ |
| ४. कवि | रेंदाळकर | ७ |
| ५. माझी कविता | आनंदराव टेकाडे | ९ |
| ६. 'माझी सृष्टि' | सोनाळकर | ११ |
| ७. आनंदी-आनंद | बालकवि | १२ |
| ८. प्रभु-कृति | आनंदराव टेकाडे | १४ |
| ९. निर्झरास | बालकवि | १८ |
| १०. मधमाशी | रेंदाळकर | २१ |
| ११. फुलराणी | बालकवि | २२ |
| १२. तें पाऊल कुणाचें ? | साधुदास | २५ |
| १३. बाल-विहग | बालकवि | २६ |
| १४. फुलबाग | सावरकर | २९ |
| १५. तारकांचें गाणें | बालकवि | ३२ |
| १६. कोंकणचा राजा | ना. के. बेहेरे | ३४ |
| १७. श्रावणमास | बालकवि | ३६ |
| १८. चंद्रास | आनंदराव टेकाडे | ३७ |
| १९. अरुण | बालकवि | ३९ |
| २०. औदुंबर | बालकवि | ४४ |
| २१. खेड्यांतील रात्र | बालकवि | ४५ |
| २२. गवताचें गाणें | बालकवि | ४६ |
| २३. ती कोण ? | गोविंदाग्रज | ४८ |
| २४. प्रेम-लेख | बालकवि | ४९ |

| | कविता | कवीचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २५. | निर्दय वालेस | गोविंदाग्रज | ५० |
| २६. | चोर तो चोर आणि शिरजोर | रणदिवे | ५२ |
| २७. | गोड निराशा ! | गोविंदाग्रज | ५३ |
| २८. | एकदांच पाहिलें | उपाध्ये | ५७ |
| २९. | गुलाबी कोडें | गोविंदाग्रज | ५८ |
| ३०. | मदनविद्वार्चे ज्योतिष | खापर्डे | ६० |
| ३१. | तूं तर चाफेकळी | बालकवि | ६२ |
| ३२. | प्रेम आणि मरण | गोविंदाग्रज | ६३ |
| ३३. | भेटीचा पहिला प्रसंग ! | रणदिवे | ६८ |
| ३४. | पुनर्जात प्रेमास | गोविंदाग्रज | ६९ |
| ३५. | पातली दिपवाळी राजसे ! | रणदिवे | ७१ |
| ३६. | तान्हुला | रहाळकर | ७२ |
| ३७. | विराणी | उपाध्ये | ७५ |
| ३८. | अनंताची आरती | सावरकर | ७६ |
| ३९. | वस्तुजातांत उभा भगवंत | रणदिवे | ७७ |
| ४०. | जगन्नाथाचा रथोत्सव | सावरकर | ७९ |
| ४१. | एका जुन्या श्लोकाची आठवण | गोविंदाग्रज | ८१ |
| ४२. | वेडा ठरलों ! | सुमन्त | ८२ |
| ४३. | विचार | गोविंदाग्रज | ८३ |
| ४४. | तीर आणि गरुड ! | सुमन्त | ८५ |
| ४५. | विरामचिन्हें | गोविंदाग्रज | ८७ |
| ४६. | प्रभावना ! | रणदिवे | ८८ |
| ४७. | एक समस्या | गोविंदाग्रज | ९० |
| ४८. | पायऱ्यांची फिकीर | रणदिवे | ९२ |
| ४९. | एखाद्याचें नशीब | गोविंदाग्रज | ९३ |
| ५०. | फूल तें फूल ! | अनंततनय | ९४ |

अनुक्रमणिका


| . | कविता | कवीचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ५१. | गर्वध्वनि | साधुदास | ९६ |
| ५२. | अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस | गोविंदाग्रज | ९८ |
| ५३. | मूर्ति दुजी ती! | सावरकर | १०२ |
| ५४. | सागरास | सावरकर | ११० |
| ५५ | दसरा | गोविंदाग्रज | ११३ |
| ५६. | बेइमान कैसा होऊं | तिवारी | ११९ |
| ५७. | पांखरास | बालकवि | १२३ |
| ५८. | मृतांचे आत्मे | नागेश | १२५ |
| ५९. | निजूं दे स्वस्थपणें आतां! | रेंदाळकर | १३० |
| ६०. | राजहंस माझा निजला! | गोविंदाग्रज | १३२ |
| ६१. | माझें मृत्युपत्र | सावरकर | १३९ |
| ६२. | यमाचे दूत | बालकवि | १४५ |
| ६३. | अजुनि चालतोंचि वाट | रेंदाळकर | १४७ |
| | कविपरिचय | | १४९ |

## — २ —

**१. अनंततनय**

५० फूल तें फूल ! ९४

**२. रणदिवे**

२ चल ये वेडे ! ३
२६ चोर तो चोर आणि शिरजोर ५२
३३ भेटीचा पहिला प्रसंग ! ६८
३५ पातली दिपवाळी राजसे ! ७१
३९ वस्तुजातांत उभा भगवंत ७७
४६ प्रभावना ८८
४८ पायऱ्यांची फिकीर ९२

**३. सुमन्त**

४२ वेडा ठरलों ! ८२
४४ तीर आणि गरुड ! ८५

**४. रहाळकर**

३६ तान्हुला ७२

**५. सावरकर**

१४ फुलबाग २९
३८ अनंताची आरती ७६
४० जगन्नाथाचा रथोत्सव ७९
५३ मूर्ति दुजी ती ! १०२
५४ सागरास ११०
६१ माझें मृत्युपत्र १३९

**६. उपाध्ये**

२८ एकदांच पाहिलें ५७
३७ विराणी ७५

**७. साधुदास**

३ कविनें कविता मागितली ५
१२ तें पाऊल कुणाचें ? २५
५१ गर्वध्वनि ९६

**८. गोविंदाग्रज**

२३ ती कोण ? ४८
२५ निर्दय बालेस ५०
२७ गोड निराशा ५३
२९ गुलाबी कोडें ५८
३२ प्रेम आणि मरण ६३
३४ पुनर्जात प्रेमास ६९
४१ एका जुन्या श्लोकाची आठवण ८१
४३ विचार ८३
४५ विरामचिन्हें ८७
४७ एक समस्या ९०
४९ एखाद्याचें नशीब ९३
५२ अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस ९८
५५ दसरा ११३
६० राजहंस माझा निजला ! १३२

अनुक्रमणिका


## ९. सोनाळकर

६ 'माझी सृष्टि' ११

## १०. रेंदाळकर

१ प्रबोधन १

४ कवि ७

१० मधमाशी २१

५९ निजूं दे स्वस्थपणें आतां ! १३०

६३ अजुनि चालतोंचि वाट १४७

## ११ तिवारी

५६ बेइमान कैसा होऊं ११९

## १२. नागेश

५८ मृतांचे आत्मे १२५

## १३. खापर्डे

३० मदनविद्वाचें ज्योतिष ६०

## १४. ना. के. बेहरे

१६ कोंकणचा राजा ३४

## १५. बालकवि

७ आनंदी-आनंद १२

९ निर्झरास १८

११ फुलराणी २२

१३ बालविहग २६

१५ तारकांचें गाणें ३२

१७ श्रावणमास ३६

१९ अरुण ३९

२० औदुंबर ४४

२१ खेड्यांतील रात्र ४५

२२ गवताचें गाणें ४६

२४ प्रेम-लेख ४९

३१ तूं तर चाफेकळी ६२

५७ पांखरास १२३

६२ यमाचे दूत १४५

## १६. आनंदराव टेकाडे

५ माझी कविता ९

८ प्रभु-कृति १४

१८ चंद्रास ३७

# १. प्रबोधन

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ............

उघडि नयन ! रम्य उषा हंसत हंसत आली
अरुणकिरणमय वसना अवनी ही ल्याली !

मंजु मधुर गान करित      आनंदें भुवन भरित
विहगवृंद गगनिं उडत      या सुरम्य कालीं !

हंसति फुलें, तरु डुलती      लतिकागण नृत्य करिति
धावति या भ्रमरतती      सुप्ति तुला आली !

स्निग्ध दृष्टि तव पडतां      होय वृत्ति सुखभरिता
रविकिरिं घनपंक्ति तथा      स्वर्णमय जहाली !

सुप्रभात सुखकर हा      दारुण तिमिरोत्करहा
रमवी सकलांस पहा      दिव्य विभवशाली !

ऊठ ऊठ ! तुजविण परि      नीरस हें सुख सुन्दरि !
विफल गमत तें ज्यावरि      दृष्टि न तव गेली !

विकचकमलगंधि पवन      शीतल करि तापशमन
त्यांत परी श्वसन तव न      तप्त तनु जहाली !

खगकूजित अलिरंजित      लतिकातरुगणासिंजित
सुदति ! विफल सकल गमत      तुजविण या कालीं !

गगन तरणिकररंजित
चपल धवल घन विहरत
क्षणहि परि न दृष्टि वळत
तव मुखिं दृढ ठेली !

ऊठ ऊठ ! सखि झडकरि
नयनद्युति चपल पसरिं
रम्य मधुर हास्य करीं
स्वर्ग आण खालीं !

प्रेमाचा ओघ सरल
वाहो तव मुखिं अविरल
अचरहि जग करुनि तरल
बुडविं सुखिं विशालीं !

—रेंदाळकर

## २. चल ये वेडे !

चल ये वेडे ! ! कां घेतिस आढेवेढे ?

पसरी गगनीं मेघ पसारा
व्यापि तिमिर भूलोकहि सारा
सोसाट्याचा सुटला वारा
वीज कडाडे ! १

क्षणांत बघ जलधारा गळतिल
रूक्ष माळरानें हिरवळतिल
दग्ध वेलिंसह तीं पालवतिल
वठलीं झाडें ! २

कधिंहि कशानें पाझरलेले
निज नयनांना मुळीं न दिसले
तेही फत्तर होतिल ओले
मोठे जाडे ! ३

या अभिनव जीवनकार्याचें
आश्चर्यातिल आश्चर्याचें
सृष्टीच्या अद्‍भुत जादूचें
सोडवूं कोडें ! ४

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम........................ वि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि: ........................

अलंकार कुरुपांची ढाल
कशास ती तुज व्हावी बोल ?
पुरे शब्दजालांचें फोल
घोटणें पाढे ! ५

चैन न वाटे तुजविण पळभर
होउन गेलों केवळ हतबळ
प्रतिक्षणीं हृदयाची तळमळ
सारखी वाढे ! ६

ये ये माझे जादुगारिणी
तुझीहि दाखव अद्भुत करणी
दृक्पातें चल टाक करोनी
चराचर वेडें ! ७

काढ एकदां तव मधु बोल
दे विश्वाच्या हृदया डोल
प्रेमरसाचे रानोमाळ
खळखळवि ओढे ! ८

—रणदिवे

## ३. कविनें कविता मागितली

कविनें कविता मज मागितली
करण्या बसल्या–समयीं कथिली;
कविता मज पाहुनियां हसली
तरि आज करूं कविता कसली ? १

कविता स्वर काय विण्यामधले ?
म्हणुनी तुज छेडुनि दावुं भले ?
कविता गुज बोल मनापुरता
प्रिय तूं बन, मी करितों कविता. २

कविता मधुराकृति का रमणी ?
म्हणुनी तिज पाडुं तुझ्या नयनीं ?
कविता करपाश जिवाभंवता,
मृदु तूं बन, मी करितों कविता. ३

कविता वद काय वसंत–रमा ?
म्हणुनी तुज दावुं तिची सुषमा ?
कविता द्युतिलेख मतीपुरता;
पटु तूं बन, निर्मिन मी कविता. ४

कविता वद काय करंजिपुरी;
म्हणुनी करुनी तव दे
कविता मकरंद फुलापुरता;
अलि तूं बन, मी करितों कविता. ५

कविता सखया न गुलाबकळी,
तुज कीं मृदु गंध तिचा कवळी.
कविता कवि—चंदन—धूप—वली;
बन मारुत तूं, कविता उकली. ६

—साधुदास

## ४. कवि

सोडुनि अर्थाला कवि वेडा कुठला
'ट' ला 'ट' जोडित बसला !
फुललीं नव कुसुमें टाकुनि अलि त्यांतें
भुलला सुवर्णकमलातें !
सत्या अवगणुनी असत्यांत रमला
चिरसुखलाभाला मुकला !
प्रियेच्या गालीं लाजेची लाली
आली, ती न तया दिसली;
परि अचिरस्थायी संध्या-रागाची
मोहनी पडली त्या साची !
फुलें बागेंत हंसतांना बघुनी
जातें मन त्याचें भुलुनी;
परी घरिं हंसऱ्या बालाच्या लीला
रमविती अल्पही न त्याला !
कलरव विहगांचा टाकी गुंगवुनी
गणी तो स्वर्गासम धरणी;
चिमण्या छबड्यांचीं गाणीं मंजुळ तीं
परि तया कदा न डोलविती !
पांढऱ्या टिकल्या बघतां आकाशीं
तुडविती कविं हे मणिराशी !

रमणिचे अश्रु यांस तुच्छ गमती,
दंवाच्या बिंदूस्तव रडती !
बसतिल चुंबित हे नवकिसलयजाला
देखति न शिशुच्या अधराला !
घडि संसाराची मोडली न बघती
वृत्तें यत्नें जुळवीती !
एकही मात्रा कमिअधिक न चाले
प्रपंचीं मात्र सर्व खपलें !
सुरधनु हारपतां करिती आक्रोश
मृतास्तां मिळे न निश्वास !
काव्यीं वाहविती ओघहि अमृताचे
घरिं न हो दर्शन ताकाचें !
ऋणही काढूनी काव्यें छापीती,
उघडीं पोरें पण फिरतीं !
कल्पना निर्मी अगणित रत्नांला
दमडी नाहीं हातांला !
बाभळीखालीं बसुनी डौलानें
भोंवतीं रचिती सुरविपिनें !
वाटतें कवि हा स्वप्न मूर्तिमंत
स्वप्नें पसरी जगतांत
न कळे लाभेल जागृति कधिं त्याला
त्यासह साऱ्या विश्वाला ?

—रेंदाळकर

## ५. माझी कविता

मलाच माझी रुचे खरी कविता । मनोहर

गर्दभ-रव तो प्रिय न जनांतरिं
खंत तया नच तदीय लवभरि
स्व-कंठ वाटे गोड किती तरि
स्व-गीत आलापि तो मुदें चित्ता । रमविण्या.

स्वरूप सुंदर किति मोरांचें
कुरूप तितुके चरण तयाचे
तयास प्रिय ते परि बहु साचे
तयेंचि नर्तन करी मुदें चित्ता । रिझविण्या.

कज्जलासही लाजविणारा
काक-वर्ण तो जगिं दिसणारा
करिति कटु वचें जन धिक्कारा
स्व-रूप मिरवी जगांत तो चित्ता । सुखविण्या.

गंधहीन सुम कोरांटीचें
म्हणुनी रसिकां मुळींहि न रुचे
आवडतें किति परि तें तरुचें
धरोनि वक्षीं प्रमोदवी चित्ता । सुखें त्या.

गंधहीन वा वर्णविहीन
कुरूप भेसुर अथवा दीन
कुणी आदरो अशि मत्कृति न
असो कशी ती प्रमोद दे चित्ता । माझिया.

—आनंदराव टेकाडे

## ६. 'माझी सृष्टि'

हिमालयाची विस्तृतता – सिंधूचीही अगाधता
सृष्टिसतीची जादुगिरी – समर्थ भुलवाया न परी
सृष्टी विश्वामित्राची – अपूर्व जी गणिली साची
सृष्टी माझी खरोखरी – तयात्तरीही ताण करी
विस्तृततेला मुकलेली – विस्तृततेची तान्हेली
अगम्यतेची अगम्यता – मद्हृदयीं विरुनी जातां
मत्सृष्टी गोजिरवाणी – हृदयाची झाली राणी

× × ×

राज्य चिमुकलें जरि माझें – अखंड त्रैलोक्यीं गाजे
त्रैलोक्याचा मी राजा – परि न करी गाजावाजा
चिमुकलेंच चैतन्य परी – भरुनी उरलें चराचरीं
चिमुकलीच माझी छाया – संतत झुलवी जगता या
चिमुकलेंच माझें गाणें – अखंड विश्वाचें लेणें
विश्वाच्या विश्वासाची – मत्सृष्टी जननी साची

× × ×

सृष्टीची माझ्या रचना – कशी असे मी कथूं कुणा ?
मजसाठीं माझी सृष्टी – प्रेमाची करिते वृष्टी
नागरीक मी म्हणूं कुणा – न कळे पटतिल कुणा खुणा
परि जे जे माझे कोणी – गजबजली सृष्टी त्यांनीं
आकुंचित माझी सृष्टी – विश्वांना घाली पाठीं

— सोनाळकर

## .७. आनंदी–आनंद

आनंदी आनंद गडे !
इकडे तिकडे चोहिंकडे.
वरतीं खालीं मोद भरे,
वायूसंगें मोद फिरे;
नभांत भरला,
दिशांत फिरला,
जगांत उरला,
मोद विहरतो चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे !

सूर्यकिरण सोनेरी हे,
कौमुदि ही हंसते.आहे,
खुलली संध्या प्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
मेघ रंगले,
चित्त दंगलें,
गान स्फुरलें,
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे !

नीलनभीं नक्षत्र कसें
डोकावुनि हें पाहतसें;
कुणास बघतें ? मोदाला !
मोद भेटला का त्याला ?
तयामध्यें तो
सदैव वसतो,
सुखें विहरतो,
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे !

वाहति निर्झर मंदगती,
डोलति लतिका वृक्षतती;
पाक्षि मनोहर कूजित रे
कोणाला गातात बरें ?
कमल विकसलें,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले—
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे !

स्वार्थाच्या बाजारांत
किती पामरें रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो !
सोडुनि स्वार्था तो जातो.
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आतां उरला
इकडे तिकडे चोहिंकडे
आनंदी–आनंद गडे !

—बालकवि

## ८. प्रभु-कृति

मधु सौरभयुत चंपक अभिमत अलिस न होय परी
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी !

हंसे रुसे शिशु जननिसवें
भुले डुले अहि गान-रवें
प्रतिदिनिं विधु घे रूप नवें
निसर्ग-सुंदर गुलाब तरुवर कंटक अंगीं धरी
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी !

वीज घनांतुनि घे जनन
सलिलापासुनि कृष्ण घन
उदया ये सरिं कमलवन
मौक्तिक सागरिं शिंपेभीतरिं कैसें वास करी
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी !

घनांबु पी खग चातक तो,
हंस जलांतुनि पय घेतो,
कोकिल पंचम गुणगुणतो,
नभिं कादंबिनि केकि विलोकुनि हर्षे नृत्य करी
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी !

रत्न फणीच्या शिरिं विलसे,
सागर–जठरीं अनल दिसे,
मृग–नाभीं मधु गंध वसे,
शुष्क होय जरि बकुल पुष्प तरि परिमल तें विखरी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

रवि बघतां कमलिनि हंसते,
चंद्रागमनें ती रुसते,
दुजि तितुक्यांताचि स्मित करिते,
क्षितिंचा अंबरिं नभींचा भूवरि फेरे मेघ करी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

कुठुनि भुवनिं ये जीवताति ?
जाई कुठें मग परतुनि ती ?
मिळे कोणती स्थिति पुढतीं ?
मीन जलांतरिं झोप खरोखरि घेई केंवि तरी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी

गिरि–शिखरावरि हिम चमके,
तृणांकुरांवरि दंव झळके,
रंगरूप त्या साम्य निकें
एक अमर जानिं दुज्या मरण क्षणिं अंतर उभयिं परी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

हांसे ताराकुल तिमिरीं,
दिव्य फुलें जणुं नील सरीं,
शांत सृष्टिला मुदित करी
उषेस बघतां सर्व रुचिरता विलया जाइ परी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

रविशशि उगवति गगनिं, तरी
क्रीडति ते ह्या धरणिवरी,
लघु वंशी जग मुदित करी,
रवि सकलांतर तोषवितो परि भीती चूक धरी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

मुग्ध बहर ये तरुवरती,
पुष्पें सुंदर मग फुलती,
फळें तयांचीं मधु बनती,
बाला, तरुणा, वृद्धा भुवना स्थिति ये नित्य खरी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

दीप लाजवी तिमिराला,
चंद्र लाजवी दीपाला,
दिनकर लाजवि ह्या सकलां,
मत्कुणसंगें, हीरक भंगे, न चले तर्क तरी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

रंगभूमि धरणी-पट हा,
अगणित पात्रें नटुनि अहा,
क्षणभर हंसती रडति पहा,
लयास जाती जगास दाविति नश्वरता सारी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

काल जातसे पुढें पुढें
सत्कृति दुष्कृति त्यांत दडे
प्रकटवि जगिं तो जें अवडे
जें भक्षियलें जें देखियलें सकल तया जठरीं
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी !

— आनंदराव टेकाडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम... दि:
क्रमांक ... नों. दि.

# ९. निर्झरास

गिरिशिखरें वनमालाही दरी दरी घुमवित येई !
कड्यावरुनि घेऊन उड्या खेळ लतावलयीं फुगड्या.
घे लोळण खडकावरती फिर गरगर अंगाभंवतीं,
जा हळुहळु वळसे घेत लपत छपत हिरवाळींत.
पाचूंचीं हिरवीं रानें झुलव गडे, झुळुझुळु गानें !
वसंत–मंडप–वनराई आंब्याची पुढती येई.
श्रमलासी खेळुनि खेळ नीज सुखें क्षणभर बाळ !
हीं पुढचीं पिवळीं शेतें सळसळती–गाती गीतें;
झोंप कोठुनी तुला तरी, हांस लाडक्या ! नाच करीं.
बालझरा तूं–बालगुणी बाल्यचि रे ! भरिसी भुवनीं !

बालतरू हे चोंहिकडे ताल तुला देतात गडे !
प्रेमभरें त्यांवर तूंही मुक्तामणि उधळुनि देई !
बुद्बुदलहरी–फुलवेली फुलव सारख्या भवतालीं.
सौंदर्यें हृदयामधलीं दे विश्वीं उधळून खुलीं !
गर्द सावल्या सुखदायी वेलींची फुगडी होई !
इवलालीं गवतावरती रानफुलें फुलती हंसती.
झुलवित अपुले तुरे तुरे निळी लव्हाळी दाट भरे.
जादूनेंच तुझ्या बा रे वन नंदन बनलें सारें !
सौंदर्याचा दिव्य झरा बालवसंतचि तूं चतुरा;
या लहरीलहरीमधुनी स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं.

आकाशामधुनी जाती मेघांच्या सुंदर पंक्ति;
इंद्रधनूची कमान ती ती संध्या खुलते वरती;
रम्य तारका लुकलुकती नीलारुणफलकावरती;
शुभ्र चंद्रिका नाच करी स्वर्गधरेवर एकपरी;
हीं दिव्यें येती तुजला रात्रंदिन भेटायाला !
वेधुनि त्यांच्या तेजानें विसरुनिया अवघीं भानें,
धुंद हृदय तव परोपरी मग उसळी लहरी—लहरी.
त्या लहरींमधुनी झरती दिव्य तुझ्या संगीततति !
नवल न, त्या प्राशायाला स्वर्गहि जर भूवर आला !
गंधर्वा ! तव गायन रे वेड लाविना कुणा बरें !

पर्वत हा, ही दरी दरी तव गीतें भरलीं सारीं.
गाण्यानें भरलीं रानें, वर खालीं गाणें ! गाणें !
गीतमय स्थिरचर झालें ! गीतमय ब्रह्मांड डुले !
व्यक्त तसें अव्यक्तहि तें तव गीतें डुलतें झुलतें !
मुरलीच्या काढित ताना वृंदावनिं खेळे कान्हा;
धुंद करुनि तो नादगुणें जडताही हंसवी गानें;
दिव्य तयाच्या वेणुपरी तूंहि निर्झरा ! नवल परी—
गाउनि हें झुळुझुळु गान विश्वाचें हरिसी भान !
गोपि तुझ्या हिरव्या वेली रास खेळती भंवतालीं !
तुझ्या वेणुचा सूर तरी चराचरावर राज्य करी !

काव्यदेविचा प्राण खरा तूंच निर्झरा ! कवीश्वरा !
या दिव्याच्या धुंदिगुणें दिव्याला गासी गाणें.
मी कवितेचा दास, मला कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं दिव्यांची असली श्रेणी !
जडतेला खिळुनी राही हृदयबंध उकलत नाहीं !
दिव्यरसीं विरणें जीव जीवित हें याचें नांव,
तें जीवित न मिळे मातें मग कुठुनी असलीं गीतें ?
दिव्यांची सुंदर माला ओंवाळी अक्षय तुजला !
तूंच खरा कविराज गुणी सरस्वतीचा कंठमणि !
अक्षय तव गायन वाहे अक्षयांत नांदत राहे !

शिकवी रे शिकवी मातें दिव्य तुझीं असलीं गीतें !
फुलवेली–लहरी असल्या मम हृदयीं उसळोत खुल्या !
वृत्तिलता ठायीं ठायीं विकसूं दे सौंदर्याहीं !
प्रेमझरी–काव्यस्फूर्ति ती आत्मज्योती चित्तीं
प्रगटवुनी चवदा भुवनीं दिव्य तिचें पसरी पाणी !
अद्वैताचें राज्य गडे अविच्छिन्न मग चोहिंकडे !
प्रेमशांतिसौंदर्याहीं वेडावुनि वसुधामाई
मम हृदयीं गाइल गाणीं रम्य तुझ्या झुळझुळ वाणी !
आणि जसें सगळें रान गातें तव मंजुळ गान,
तेंवि सृष्टिची सतार ही गाइल मम गाणीं कांहीं !

—बालकवि

## .१०. मधमाशी

रत्नें ज्यांवर झगमगती
पंख असे हलवीत
नाचत डोलत मधमाशी
तरंगते गगनांत.
मधमाशी गे, थांब जरा
सांग मला हळुवार,
पंख असे जडले रत्नीं
मला कधीं मिळणार ?
भिऊं नको, त्या फुलबागा
तुझ्या तुला लखलाभ;
नकोत मजला आवडतीं
कमळें तव नीलाभ !
पंख असे हे मज मिळतां
सांग कुठें जाईन ?
भरभर उडुनी तुझ्यापरी
रत कोठें होईन ?
गुलाब पुष्पें असोत तीं
नको जुई गुलजार
भिकार असल्या जड सौख्या
नाहीं मी भुलणार !
फुलराणी मम हृदयाची
जाइन धांवत तेथ,
अधर-दलावर गुंजावें
हाच जिवाचा हेत !

—रेंदाळकर

## .११. फुलराणी

हिरवे हिरवे गार गालिचे   हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती   फुलराणी ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत   अव्याज मनें होती डोलत;
प्रणयचंचला त्या भ्रूलीला   अवगत नव्हत्या कुमारिकेला !
आईच्या मांडीवर बसुनी   झोके घ्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला   साध्या भोळ्या फुलराणीला ?

पुरा विनोदी संध्यावात   डोलडोलवी हिरवें शेत;
तोच एकदां हांसत आला   चुंबून म्हणे फुलराणीला:—
"छानी माझी सोनुकुली ती   कुणाकडे ग पाहत होती ?
कोण बरें त्या संध्येंतून   हळुंच पाहतें डोकावून ?
तो रविकर का गोजिरवाणा   आवडला अमुच्या राणींना "
लाजलाजली या वचनांनीं   साधी भोळी ती फुलराणी ?

आंदोलीं संध्येच्या बसुनी   झोंके झोंके घेते रजनी;
त्या रजनीचे नेत्र विलोल   नभीं चमकती ते ग्रहगोल !
जादूटोणा त्यांनीं केला   चैन पडेना फुलराणीला;
निजलीं शेतें, निजलें रान   निजले प्राणी थोर लहान.
अजून जागी फुलराणी ही   आज कशी ताळ्यावर नाहीं ?
लागेना डोळ्याशीं डोळा   काय जाहलें फुलराणीला ?

या कुंजातुन त्या कुंजातुन
मध्यरात्रिच्या निवांत समयीं
त्या देवीला ओंव्या सुंदर
झुलुनि राहिलें सगळें रान
प्रणयचिंतनीं विलीनवृत्ति
डुलतां डुलतां गुंग होउनी

इवल्याशा या दिवव्या लावुन,
खेळ खेळते वनदेवी ही.
निर्झर गातो; त्या तालावर–
स्वप्नसंगमीं दंग होउन !
कुमारिका ही डोलत होती;
स्वप्नें पाही मग फुलराणी

“ कुणी कुणाला आकाशांत
हळूंच मागुनि आलें कोण
प्रणय–खेळ हे पाहुनि चित्तीं
तों व्योमींच्या प्रेमदेवता
हळूंच आल्या उतरुन खालीं
परस्परांना खुणवुनि नयनीं

प्रणयगायनें होतें गात;
कुणी कुणा दे चुंबनदान ? ”
विरहार्ता फुलराणी होती;
वाऱ्यावरती फिरतां फिरतां–
फुलराणीसह करण्या केली.
त्या वदल्या ही अमुची राणी ?

स्वर्भूमीचा जुळवित हात
खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला
आकाशींची गंभीर शांति
विरूं लागलें संशयजाल
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेउनी
स्वप्नसंगमीं रंगत होती

नाचनाचती प्रभातवात;
हळुहळु लागति लपावयाला
मंद मंद ये अवनीवरती;
संपत ये विरहांचा काल.
हर्षनिर्भरा नटली अवनी;
तरीहि अजुनी फुलराणी ती !

तेजोमय नव मंडप केला, लख्ख पांढरा दहा दिशांला,
जिकडे तिकडे उधळित मोतीं दिव्य वऱ्हाडी गगनीं येती.
लाल सुवर्णी झगे घालुनी हांसत हांसत आले कोणी;
कुणी बांधिला गुलाबि फेटा झकमकणारा सुंदर मोठा !
आकाशीं चंडोल चालला हा वाङ्निश्चय करावयाला;
हें थाटाचें लग्न कुणाचें साध्या भोळ्या फुलराणीचें !

गाउं लागले मंगलपाठ, सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा कोकिळ घे तानांवर ताना !
नाचुं लागले भारद्वाज, वाजविती निर्झर पखवाज.
नवरदेव सोनेरी रविकर नवरी ही फुलराणी सुंदर !
लग्न लागतें ! सावध सारे ! सावध पक्षी ! सावध वारे !
दंवमय हा अंतःपट फिटला भेटे रविकर फुलराणीला !

वधूवरांना दिव्य रवांनीं, कुणीं गाइलीं मंगल गाणीं;
त्यांत कुणीसें गुंफित होतें परस्परांचें प्रेम अहा तें !
आणिक तेथिल वनदेवीही दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं फुलराणीची गोड कहाणी !
गुंगत गुंगत कवि त्या ठायीं स्फूर्तीसह विहराया जाई;
त्यानें तर अभिषेकच केला नवगीतांनीं फुलराणीला !

—बालकवि

## .१२. तें पाऊल कुणाचें ?

गगनाच्या अंगणीं । उमटतें पाउल शुभलक्षणी
नाजुक गोंडस असें कुणाचें सांगा मजला कुणी. ध्रु०

संध्यारागांतुनी । तयाचा तळ दिसतो साजणी
स्वर्गंगेसम रेषा दिसती कधीं कधीं ज्यांतुनी. १

पाउल पडतांक्षणीं । जाहली तुटातूट पैंजणीं
कांहीं अस्ताव्यस्त विखुरले नक्षत्रांचे मणी. २

कांहीं उरले गुणीं । तयांतुनि रुणझुण उठतो ध्वनी
कानीं येतो अव्यक्ताच्या तो अवकाशांतुनी. ३

गगनीं एके क्षणीं । दुजा तें उठतें क्षितिजांतुनी
पाउल दिसतें परी तयाचा कोण असावा धनी ? ४

——साधुदास

## १३. बाल-विहग

सांज खुले सोन्याहुनि पिंवळें हें पडलें ऊन;
चोहिंकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान.
पांघरली जरतार जांभळी वनमाला शाल,
सांध्यतेज गिरिशिखरीं विखरी संमोहनजाल.
त्या तेजाचा प्राण, चिमुकला संध्येचा दूत,
बाल–विहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत !
क्षणभर येथें, क्षणभर तेथें, भिंगोरी साची,
अवकाशीं जशि काय फिरविली फिरकी जादूची !
खेळाडू कविबाळ करुनि जणुं भावांची होडी
मूर्तरूप देउनी तिला या वाऱ्यावर सोडी.
गिरिशिखराचें गोल फूल हें सांध्य तरंगांनीं
झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतो गगनीं ?

अष्टदिशांचा गोफ सभोंतीं हा भिरिभिरि पाहे
मंद झुले वनमाल, वाहता शांत झरा राहे.
समाधिस्थ जणुं काय जाहले हा गिरि, हें रान,
हा आनंदोद्रेक नाचरा गगनीं पाहून ?
सुंदरतेचा जलसा असला पाहुनिया धाला
कालहि वाटे विस्मितचित्तें स्तब्ध उभा ठेला.

सृष्टिदेविच्या सगुणा बाळा स्वर्गाच्या तान्ह्या
नांवहि रे तव ठाउक नाहीं मज गोजिरवाण्या !
निजदेहाचा करुनि असा हा सुंदर आंदोल
आत्मरंगिं रंगल्या मनाला झुलविसि कीं बोल ?
किंवा कोणी दिव्य देवता जरि न दिसे मज ती
लीलेनें तुज हालविते का घेउनिया हातीं ?

सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें
चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं
बनवावें मन धुंद रंगुनी काव्यसुधापानीं !
अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे
चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खगबाळा व्हावें.

भवदुःखाच्या अनंत डोहीं परि बुडतों पाहीं,
शांति मिळेना क्षणभर, जीवा विश्रांती नाहीं.
काव्य--देवता अंतरली मज गरिबाला आज;
काळ लोटला हाय किती मन वरिताहे लाज.
भ्राते माझे वातावरणीं तुजपरि भरभरती
पंख तुटुनियां विव्हल पडलों मी धरणीवरती.

सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे
बंधहि होती शिथिल, हरपतें भानहि जगताचें.

जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं
हाय ! सुटेना दृढ देहाच्या परि बसल्या गांठी !
दिव्यानंदीं म्हणुनि उमाळा दुःखाचा दाटे
सत्यहि जो आनंद कल्पनामय केवळ वाटे.

अपूर्णता ही यापरि मजला जरि बुडवी शोकीं
चित्र मनोहर खगबाला परि मी तव अवलोकीं.
अपूर्ण अपुलें ईप्सित झालें पूर्ण दिसे जेथें,
मनुजाचें मन सहज पावतें आकर्षण तेथें.
तुजला बघतां भरभर उडतां कविता आठवली;
कशीबशी ती त्वत्प्रीतीस्तव या कवनीं लिहिली.

——बालकवि

## १४. फुलबाग

फुलबाग किती शोभे लहान, नटवी, करी
नटुनी थटुनी नाना नखरे वरचेवरी.
हिरवाचि कधीं शालू, सित मल्मलिचा कधीं,
रेशमी जरतारी वा जयाच्या पदरामधीं
नित्य ताजे जिते मोती पाच – माणिक जन्मती
पवनेंच तसें त्यांसी नटवी डुलवी किती !
पथानें फुलबागेच्या दों बाजूं सम शेवरी
आवली धरुनी होत्या डौलदार; यशें वरी–
भाट बुल्बुल गातातीं; या शेंगा हिरव्या, फुलें
लाल हीं लढतां त्यांसी भासे चित्तांत चौफुले.

× × ×

मांडवी ही प्रवेशाची, जाईनें विणिली जिला,
फुलें हीं हंसरीं येत्या आदरीती पलोपला !
फुलें ? अहा, फुलें ना तीं, उद्यानीं विहरावया
रात्रींत चोरुनी येतां अप्सरा, धरिलें जया,
नोंद त्या दिव्य पाप्यांची ठेवूं जाइवरी असे
चुंबनांचेचि त्यांच्या घे देवी द्वारप हे ठसे !

× × ×

वीथिका कदलींची ही उद्यानांतिल मर्मरी
तया सुरेखिल्या पाथाचिया दों तटिं शोभली.

येत्या – जात्यावरी मर्यादेनें आनतशा शिरीं
वारी विंजणवाऱ्यासी, आतपत्र अणी धरी;
निर्गंधते करी क्षम्या नम्रता, कर जोडिती
अशीं केळफुलें, गोऱ्या गोड केळफण्या किती !

× × ×

शेवंती ही; हरी गेला चढाई करुनी तदा
कुसुमाकर ही कल्पी ढाल कीं कुसुमायुधा !
आणि हे सोनचांफ्या, तूं शिकलासि तरी कुठें
ही दिव्य किमया ? आम्हां स्वयंमन्य नरां जिथें
रुप्याचेंही करायासी जड स्वर्ण न साधतें,
ओल्या मातींत सूर्याचीं किरणें पिळुनी तिथें–
मृदु चेतन सोन्याची, स्वर्णचंपक ! हीं फुलें
सुगंधी तुज पाहोनी निर्मितां मन हें भुले !
प्रियाच सोनचांफ्याची, चमेली किति ही खुले,
तो तिच्यावरि, ही त्याच्यावरती उधळी फुलें.

× × ×

नाना बालतरू देशाविदेशांतिल आणुनी,
फुलें किती अशीं ज्यांचीं पानें रंगित देखणीं,
तशीच फुलझाडेंही विचित्र नटवीं किती,
कुंड्यांकुंड्यांतुनी होतीं गुच्छांहीं रचिलीं पथीं.
भवतीं फुलवागेच्या वर्तुलाकृति रेखिले
तृणस्तबक जे गार हिरवे हिरवे खुले.

प्रभातीं तृणवेलींसी त्यांतल्या धवलीं अती
अती चिमुकलीं, लाखों फुलेंही फुलतां किती
मनोज्ञ तरि ती शोभा ! यामिनींत, गमे हृदीं,
होती वहात जी येथें ज्योत्स्नेची रसिता नदी
प्रभातिंच्या हिमें का ती घनीभवन घे नवें–
चकाकती फुलें ना हीं, चांदण्याचे रवे रवे ! !
वशीकरणचूर्णासी देत त्यास तिला हरूं,
मंत्र गुंजत त्या भोगक्षमा ज्या कलिका करूं,
ह्या पुष्पा वश त्या पुष्पीं करवीत परोपरी
हिचें चुंबन दे त्यासी, त्याचें देत हिला, अली
दयितादयितांमाजी शुमलोकांतल्या पहा
घाली खेपा मधावारी मदनाचा दलाल हा !
धोतऱ्याचीं महादेवा फुलांत रुचलीं फुलें;
गुणान्धत्वहि मोठ्यांचें मोठेंचि असणें बरें !
फूल ह्या निशिगंधाचें ! हें अधीरवितें हृदें
कामसेना–पुरोगामी रौप्यशृंगाचि काय तें ?

× × ×

छोटेसें स्फटिकांचें हें अष्टपैलु मधें खुलें
लीलासर, सदा पूर्ण स्वादु शीतलता जलें;
कारंजें शतधारांचें कासारांत तया उडे
नर्तदू–बिंदूवरी त्याच्या तेजोबिंब यदा पडे,
तदा गमे असा लीलासरा उडत ये तया
थवा इंद्रधनुष्यांच्या पिलांचा विहरावया.

—सावरकर

## १५. तारकांचें गाणें

कुणि नाहीं ग कुणि नाहीं । आम्हांला पाहत बाई !
शांति दाटली चोंहिकडे । या ग आतां पुढें पुढें
लाजत लाजत । हळूंच हांसत
खेळ गडे खेळूं कांहीं । कोणीही पाहत नाहीं. १

सुंदर तें तें नटवून । कोमल तें तें खुलवून
प्रेमाच्या वसतीकरितां । जग सगळें फुलवूं आतां
दिव्य रवांनीं । गाणीं गाउनि
विश्वाला निजवायाला । वाऱ्याचा बनवूं झोला. २

फेकुनि द्या इकडे तिकडे । थोडेसे दंवबिंदु गडे
या निर्मल अवकाशांत । प्रेमाचें पेरूं शेत
मंदयामिनी– । सर्व गुंगुनी
झोंप लागली जगताला । या ग आतां खेळुं चला. ३

सरितांच्या लहरींवरती । नाचूं या निर्भय चित्तीं
अर्धोन्मीलित फुलवोनी । लपूं चला कलिकांत कुणी
कवि–हृदयांत । गरके घेत
जाउनिया खेळूं आतां । हीं गाणीं गातां गातां. ४

एखादी तरुणी रमणी । रमणाला आलिंगोनी
लज्जामूढा भीरुच ती । शंकित जर झाली चित्तीं
तिच्याच नयनीं । कुणी बिंबुनी
धीट तिला बनवा बाई । भुलवा ग रमणालाही. ५

सुस्वप्नांनीं गुंगवुनी । पुण्यात्मे हसवा कोणी
आशा ज्या ज्यांच्या चित्तीं । त्याच रचा स्वप्नांवरती
दयितचिंतनीं । विरहभावनीं
दिवसा ही झुरली बाला । भेटूं द्या स्वपती हिजला. ६

अनेक असले खेळ करूं । प्रेमाशा विश्रांत भरूं;
सोडुनिया अपुले श्वास । जगीं नाचवूं उल्हास;
प्रभातकाळीं । नामनिराळीं
होउनिया आपण राहूं । लोकांच्या मौजा पाहूं. ७

—बालकवि

## १६. कोंकणचा राजा

“ आंबा पिकतो
रस गळतो
कोंकणचा राजा ( बाई ) झिम्मा खेळतो ” ध्रु०

फोफळीच्या वाड्या
ताडाचिया माड्या
कोंकणचा राजा ( बाई ) तेथें रंगतो. १

सागर नाचतो
वारा भांडतो
कोंकणचा राजा ( बाई ) गंमत पाहतो. २

भात पिकला
देश हंसला
कोंकणचा राजा ( बाई ) गोरा शोभतो. ३

फणस पिकले
कांटे टिकले
कोंकणचा राजा ( बाई ) कठोर भासतो. ४

कापे, बर्के गरे
खातो तो खोबरें
कोंकणचा राजा ( बाई ) रसाळ राहतो. ५

लेकी, बाया, सुना
भाऊ, मुलें, नाना
कोंकणचा राजा ( बाई ) कामीं जुंपतो. ६

ब्राह्मण मावळे
मांडपंचा ल्याले
कोंकणचा राजा ( बाई ) समान लेखतो. ७

उंच उंच कडे
जाती नभाकडे
कोंकणचा राजा ( बाई ) देव वाटतो. ८

शूर धारकरी
गेले देशावरी
कोंकणचा राजा ( बाई ) पाठ राखतो. ९

—ना. के. बेहेरे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...४८२६९... वि: ........
क्रमांक ...९५५५... नों. दि. २५-३-९८

## १७. श्रावणमास

श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोहिंकडे;
क्षणांत येतें सरसर शिरवें, क्षणांत फिरुनी ऊन पडे !
वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधलें नभोमंडपीं कुणि भासे !
झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा ! तों उघडे;
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळें पिवळें ऊन पडे !
उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा !
सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा.
बलाकमाला उडतां भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि कीं एकमतें !
फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती,
सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजबाळांसह बागडती.
खिल्लारें हीं चरती रानीं, गोपहि गाणीं गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरें !
सुवर्ण-चम्पक फुलला, विपिनीं रम्य केवडा दरवळला,
पारिजातही बघतां भामारोष मनींचा मावळला !
सुंदर परडी घेउनि हातीं पुरोपकंठीं शुद्धमती
सुन्दरबाला या फुलमाला रम्य फुलें-पत्री खुडिती.
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत !
वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावणमहिन्याचें गीत !

——बालकवि

## १८. चंद्रास

गाउं कसें तुजला । चंद्रा ! गाउं कसें तुजला ?

परप्रकाशें । भुवनीं विलसे
लाज न मुळि ज्याला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

दिनिं मुख लपवी । रजनिंत मिरवी
दावुनिया डौला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

पिंगा धरुनी । स्त्रीजनिं खेळनिं
मानित हर्षाला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

बुल्बुल् वाणी । मात्र रमणिगाणें
पुरुषिं मुग्ध बाला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

सदनीं राणा । बाहिर ललना
दावि अशा कृतिला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

शीतल वचना । वदुनी भुवना
लावी कुपथाला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

मृदु कर फिरवुनि । अंगावरुनी
विसरवि स्वहिताला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

जन स्वागमनें । मोहिं बुडविणें
नित्य क्रम ठरला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

कामी बनवी । शीला हरवी
हीच कीर्ति विमला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

नीच कृतीचा । डाग सदाचा
तनुला चिकटविला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

स्त्रीमुख-कांति । चोरुनि जगतीं
जन्म धन्य केला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

विलासिनींचा । किंकर साचा
वंश भूषवीला । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

स्त्रीमुख न दिसे । क्षण भरे पिसें
जीव होइ दुबळा । चंद्रा ! कोण गाइ त्याला ?

केंवि अशाला । वर्णायाला
स्फुरण चढे कविला । चंद्रा ! बोल, विचारिं तुला.

वृथा प्रतिष्ठा । मिरविशि नष्टा !
स्वस्थ बैस अपुला । चंद्रा ! तो क्षण मृत झाला.

जग तें गेलें । अजवरि भुललें
केवळ माधुरिला । चंद्रा ! काळ अतां फिरला.

बालरवीसम । हरुनि मोहतम
ओपी तेजाला । चंद्रा ! विश्व गाइ त्याला.

—आनंदराव टेकाडे

## १९. अरुण

पूर्वसमुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणीं उधळिली मूठ नभीं ही लाल गुलालाची ?
पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं;
हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं.
क्षितिजाची कड सारविली ही उज्ज्वल दीप्तीनें,
सृष्टिसतीनें गळां घातलें कीं अनुपम लेणें ?
हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिवळे कांहीं,
रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं.
उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा,
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुररस अपुल्या अंगा !

---

अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय, ?
प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय ?
कीं, नव युवती उषासुंदरी दारीं येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनीं ?
दिवसयामिनी परस्परांचें चुंबन घेतात–
अनुरागाच्या छटा तयाच्या खुलल्या गगनांत !
स्वर्गींच्या अप्सराच अथवा गगनमंडलांत
रात्रीला शेवटचीं मंगल गीतें गातात ?
किंवा ' माझी चोरुनि नेली मोत्यांची माला '
म्हणुनि नभःश्री रुसली, आली लाली गालांला ?

कीं रात्रीचें ध्वांत पळालें, आशेची लाली
उत्साहाशीं संगत होउनि ही उदया आली ?
किंवा फडके ध्वजा प्रीतिची जगता कळवाया,
कीं अपणावर आज पातली हीच खरी विजया ?
कीं स्वर्गींच्या दिव्यांचें हें फुटलें भांडार ?
जणूं वाटतें स्वर्गच त्यासह खालीं येणार.
प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें ?
कीं सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे ?

" तेजानें न्हाणितें जगाला कोण सखे बाई ?
नवल अगाई ! तेजोमय तूं ! तेजोमय मीही ! "
परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं
" विरह–काल संपला गा गडे, प्रेमाचीं गाणीं !
या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा–पुरे गडे ग ! हा तुमचा मान !
अम्ही गवळणी हृदय–रसांनीं पूजूं प्रेमाला,
प्रेमकाल हा ! म्हणोत कोणी अरुणोदय याला.
पूर्वदिशेशीं गोफ खेळतो कृष्ण गडी बाई !
उधळित सोनें सर्व तयाच्या लागूंया पायीं.
मधुस्मितानें विश्व भरूं ग ! शंकित कां म्हणुनी ?
सर्व सारख्या, हांसावें मग कोणाला कोणी ? "
गोफ चालला गगनमंडळीं, रंग नवा आला;
त्यांत लागला कृष्णाचा कर पूर्वेच्या गाला.

विनयवती ती पूर्वदिशा मग अधोवदन झाली,
तों प्रेमाची अद्भुत लहरी वसुधेवर आली !

या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावें,
हें आम्हांला, ब्रह्मांडाला, देवाला ठावें.
परंतु ही बघ भूदेवी तर वेडावुनि गेली,
टकमक पाहत स्वस्थ बैसली या मंगल कालीं !
दंवबिंदूंचा–नव्हे नव्हे ! हा पडदा लज्जेचा––
मुग्धपणाचा, बालपणाचा, कोमल हृदयाचा––
निजवदनाहुनि या प्रौढेनें दूर पहा केला,
योग्यच, अथवा प्रेम न मोजी क्षुद्र लौकिकाला !
प्रेमातिशयें मला वाटतें विसरुनि जाइल ही
प्रिय नाथाचा आगमनोत्सव हा मंगलदायी.
कविते ! तिजला साह्य तूंच हो, तूंही पण वेडी !
परंतु वेडाविण सुटतिल कां हृदयाचीं कोडीं ?
जा, जा, आतां लाजुं नको ग ! पाहुं नको खालीं!
लाजच अथवा–खुलशिल तूंही या मंगल कालीं.
या लज्जेनें कविमानस हें होउनिया लोल
प्रेमचंचले ! प्रेमच तुजवर मग तें उधळील.
प्रेमावांचुनि फेड कशानें प्रेमाची व्हावी ?
हा बघ सविता प्रेमळ भूतें प्रेमानें नटवी !

हा प्रेमाचा लोंढा वरुनी आला हो आला;
भव्य गिरींनो ! निजशिखरांवर झेलुनि ध्या याला.
नील झग्यावर वेलबुटी तो तुमच्या चढवील,
' निगा रखो ! ' येईल तुम्हांला सरदारी डौल.
कविवाणीचा स्फूर्तियुक्त मग होतां अभिषेक,
तटस्थ होउनि तुम्हांस बघतिल हे सारे लोक.
सुवासिनींनो, वनदेवींनो, डोला ग डोला !
नटवा सजवा वनमालेला तुमच्या बहिणीला.
वनमालांनों, हळूच हलवा हा हिरवा शेला,
सूत्रधार हा नभीं उदेला, उधळा सुमनांला.
' जय ' शब्दानें आळविण्याला लोकनायकाला
नभोवितानीं द्या धाडुनि ही विहगांची माला.
सरोवराच्या फलकावरतीं स्वर्गाच्या छाया
कुणी रंगवा कुणी फुलांवर लागा नाचाया.
वेलींच्या वलयांत बसोनी गा कोणी गाणीं,
या झाडावर त्या झाडावर हंसत सुटा कोणी.
कुणी कुणी या नदीबरोबर नाचत जा बाई,
प्रपातांतही बसुन गा कुणी मंजुळ शब्दांहीं.
उषःकालच्या सुगंध, शीतल, मृदुल मंद वाता !
विहार कर, ये पराग उधळित अवनीवर आतां.
या कोमल रविकिरणांवरती स्वर्ग बसुनि आला,
सख्या मारुता, गाउनि गाणीं झोके दे त्याला !

ऊठ कोकिळा, भारद्वाजा, ऊठ गडे, आतां,
मंगल गानीं टाका मोहुनि जगताच्या चित्ता.
सरिते, गाणें तुझें, सुरामधिं या मिळवीं बाई !
साध्या भोळ्या तुझ्या गायना खंड मुळीं नाहीं.
पिवळीं कुरणें या गाण्यानें हर्षोत्कट झालीं,
गाउं लागलीं, नाचुं लागलीं, वेडावुनि गेलीं.
चराचराच्या चित्तीं भरलें दिव्याचें गान;
मूर्त गान हें दिव्य तयाला गाणारें कोण ?
दिव्य गायनें, दिव्य शांतता, दिव्याचे झोत,
वसुंधरेच्या अरुण ओतितो न कळत हृदयांत !
त्या दिव्यानें स्वर्भूमीचें ऐक्य असें केलें,
त्या दिव्यानें मांगल्याचे पाठ सुरू झाले.
मंगलता ती दिव्य कवीला टाकी मोहोनी,
वाग्देवीनें सहज गुंफिली मग त्याचीं गाणीं.

—बालकवि

## २०. औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळा सावळा झरा वाहतो बेटांबेटांतुन.
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढें.
पायवाट पांढरी तयांतुन अडवी तिडवी पडे;
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.
झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर,
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.

—बालकवि

## २१. खेड्यांतील रात्र

त्या उजाड माळावरती
बुरुजाच्या पडल्या भिंती;
ओसाड देवळापुढती
वडाचा पार–अंधार दाटला तेथ भरे भरपूर.

ओढ्यांत भालु ओरडती;
वाऱ्यांत भुतें बडबडती;
डोहांत सावल्या पडती
काळ्या शार–त्या गर्द जाळिमधिं रात देत हुंकार.

भर रानीं काकस्थानीं
उठतात ज्वाळ भडकोनी,
अस्मान मिळालें धरणीं
आर ना पार–अवकाळ रात्रिचा प्रहर घुमे तो घोर.

—बालकवि

## २२. गवताचें गाणें

परस्पराकंठीं हात घालुनिया बसलों गात;
ऐको ना ऐको कोणी हीं अमुचीं वेडीं गाणीं.
उच्छृंखल ओढा चाले, उच्छृंखल मारुत डोले,
उच्छृंखल अभ्रें झालीं, उच्छृंखल अमुची बोली.
अर्थ तयाचा कुणा जरी कळे न, परवा काय तरी ?
ज्ञान असो अज्ञानच हें गोड अम्हां अमुचें आहे.

+ + +

स्वर्गांतुनि आली आई, मंजुरवें आम्हा बाही;
ती वदली "ला-ला-ला-ला या या रे नाचायाला.
वारा पाउस ऊन गडे नाचनाचती स्वैर पुढें.
पंख पाचुचे तुम्हीहि ते या उडवित येथें तेथें;"
या जननीवचनीं धालों, नाचत वर आलों आलों.

+ + +

पवनाच्या आंदोलांत देवदूत होते गात.
आलिंगुनि आम्हांला ते हालविती गद्गद हातें.
परस्परां चुंबित यावें, नाचावें, मंजुळ गावें;
झोक्यावर झोके घ्यावे, सृष्टीशीं समरस व्हावें.

+ + +

उंच कड्यावरती कोणी प्रेमाचीं बसवी ठाणीं.
खोल दरी अंधारांत तेथेंही कोणी झुलत;
एक परी अमुचें गीत, सर्वांचें एकच चित्त.
द्वैताला ठावच नाहीं, प्रेम दिसे ज्या त्या ठायीं,
प्रेम बनुन जीवें भावें प्रेमाला शोधित जावें.

—बालकवि

## २३. ती कोण ?

दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी;
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे;
भूलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी;
रात्रीमागुनि धांवतो दिवसही, कीं भेट व्हावी कुठें.
जीवाचें जगणें असेंच असतें सापेक्ष प्रेमावरी !
डोळेभेट दुरून, भाव अथवा आशाहि त्याला पुरे;
मी हें पाहुनि जीवबंधन असें शोकार्त होतों परी,
कां कीं, या मम लक्ष्यशून्य हृदयीं कांहीं न आशा स्फुरे !
ओठांशीं भिडतें रहस्य मनिचें—सांगूं कुणाला परी ?
अश्रू हे नयनींहि—माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ?
आलें हें भरुनी रितें हृदयही—देऊं कुणाच्या करीं ?
आला दाटुनि कंठ—हाय ! रडुनी कोठें करूं मोकळा ?
जी माझ्यास्तव, मी जिचें सकलही, आधार जी जीवनीं,
देवा ! भेटवि—दाखवी तरि मला ती कोण देवी जनीं !

—गोविंदाग्रज

## २४. प्रेम-लेख

मेघाचें करिं भूर्जपत्र धरुनी अस्ताचलीं प्रत्यहीं
स्वर्गींचे नव लेख कुंकुमरसें ती सांध्यदेवी लिही;
रात्रीं शांत गभीर अंबुनिधिच्या आनील पृष्ठावरी
लज्जालेख लिही विकंपित करें ती तारकासुंदरी;
श्यामा निर्झरिणी पुनःपुनरपी सारीत नीलांचला
मुग्धालेख सुरम्य सैकतिं लिही मंदोर्मिमालाकुला;
वेलींचें स्वकरें कराग्र धरुनी त्या मंदमंदानिलें
क्रीडालेख वनस्थलीहि लिहिती कांहींतरी आपुले.

हे सारे मधुलेख घेउनि जगीं नाचोत वेडे कवि,
गावो गीतशतें तयांस, मजही त्यांची कळे थोरवी.
लज्जामुग्ध परी शिरःकमल तें ठेवून माझ्या उरीं
श्वासांच्या कवनीं लिही:प्रियतमा ही प्रेमलेखावलि.
सारे ते मग लेख तुच्छ गमती चित्ताचिया लोचनीं,
तीचा अक्षय लेख एकच उभा मी मग्न पारायणीं!

-- बालकवि

## २५. निर्दय बालेस

अखेर झाली आतां घे हा प्रणाम जातां जातां ध्रु०

जिंकुनि तुजला प्रेमें होइन दास तुझा जन्माचा
या आशेवर जीव टांगला होता या दीनाचा. १

नजर जराशी तुझी बदलतां थोडा थोडा होई,
वेडा माझा जीव बुडविला तूं शोकाच्या डोहीं. २

होतें नव्हतें त्याची केली तुझ्या ठिकाणीं पोंच;
जीवाच्या जाळ्यांत झेलला शब्द न पडला तोंच. ३

रूप मनोहर असलें, बुद्धिहि तीव्र लाभली तुजला;
खऱ्या गुणाची पारख कांहीं असेल तव हृदयाला. ४

वेडी आशा अशी धरुनिया धडा जिवाचा केला;
भल्याबुऱ्याचा भेद न तुजला, अनुभव भलता आला. ५

केल्या ज्याच्या पायघड्या मीं तुझ्या पावलासाठीं
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस नटव्या थाटापाठीं. ६

जग सगळें हें डोळ्यांपुरतें, रूप जिवाला पुरतें;
उदार हृदया परि निर्दय जग दगडाखालीं पुरतें. ७

ज्या देवानें जग हें केलें, ज्या प्रेमें हें चाले,
त्या देवाला, त्या प्रेमाला, जाळिन आतां बाले ! ८

जगावांचुनी लाभतीस तरि जग मीं केलें असतें;
तुझ्यावांचुनी जग हें आतां असून झालें नसतें ! ९

दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नांवा;
परतायाचें नाहीं आतां त्या प्रेमाच्या गांवा. १०

होइल होइल वाटत होतें तेंच अखेरिस झालें,
नांव घेतल्यावांचुन आतां मनांत झुरणें आलें ! ११

—गोविंदाग्रज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि:
... नोंद दि.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सा. क्र.
(स्थळ प्रत)

## २६. चोर तो चोर आणि शिरजोर

पुष्पपात्रीं घेऊन फुलें ताजीं
निघे मंदिरिं जायास प्रिया माझी;
तोंच पसरुनि मीं हात खूप लांब
तिला म्हटलें, " लाडके ! जरा थांब. १

विविध पुष्पीं हें पूर्ण पुष्पमात्र
रुचे देवा जें, तें न यांत मात्र !"
" कोणतें हो ? " ती हंसुन तदा बोले
बोललों मी " तव हृदयपुष्प, बाले ! " २

मान हलवुन ती म्हणे, " बाइ ! बाई !
करुनि चोरी शिरजोरि केवढी ही !
चोरियेलें मम पुष्प तुम्हिच ना तें
चला आणा प्रभुचरणिं वाहतें तें ! " ३

—रणदिवे

## २७. गोड निराशा !

जादूची माझी बाग
तींत फुलें जागोजाग;
रम्य जरी बागाईत,
तरी तिची न्यारी रीत;
कळी कोंवळी चांफ्याची
मिटलेली ती कायमची;
जरि न कधीं उमलायाची
करिल वृष्टि तरि वासाची;
तशाच कोणी,
सूत्रावांचुनि,
दिधल्या रचुनी
कुंदाच्या वेण्या दोन
मोल जिवाचा त्यां होन ! १
नाहीं पाणी जरि भवतीं
तरी दोन कमळें हंसतीं;
जन्म जलामधिं कमळांचा
न्याय असे हा जगताचा;
परि या कमळांच्या रंगा
खेळे प्रेमाची गंगा !
तुमच्या जगतीं,
किरणें पडतीं,
कमळें फुलतीं,

परि माझीं कमळेंच बघा
निजकिरणीं खुलविती जगा ! २
गुलाब होते दोन तसे,
आनंदाचे गोड ठसे;
कळ्यांवाचुनी फुललेले
कांट्यांच्या त्रासा चुकले;
जणूं फडकती मौजेचीं
नवीं निशाणें लाजेचीं !
गुलाब असले
हांसत बसले,
मनांत ठसले,
हृदयीं धरिलें या भावा
एकतरी काढुनि न्यावा ! ३
परी फुलें तीं जादूचीं
लपंडाव खेळति साचीं;
रक्षण त्यांचें करणार
मनांतला जादूगार !
दिसतां हातीं लागत ना,
वेड लागलें तेंच मना;
क्षणांत फुलतीं
क्षणांत लपतीं,
दिसतीं हंसतीं,
घेर घेतला गिर्कीचा
फेर थरकत्या फिर्कीचा. ४

निश्चय केला जिंकाया
जादूची असली माया;
तोंडानें उडवायाचा
मंत्र हाकिला प्रेमाचा;
श्वासानें हृदयीं भरिला
मनिं वाटे आतां धरिला;
परि तो कुठला
गवसायाला !
तसाच उरला,
अधिक पसरला चहूंकडे;
तोडितांच उलटा वाढे ! ५

यत्न मांडिला तोच पुन्हां
जीव गुलाबावीण सुना;
स्वस्थानांतुनि हलत नसे
काढावा तो वाटतसे;
गुलाब तर न मिळे मजला
परि कांटे मम देहाला !
त्या कुसुमाचे
संसर्गाचे
कांटे साचे
मांडिति अंगीं थैमान !
कांट्यांचें माजे रान ! ६
कोण असा जादूगार
खेळ करी हा अनिवार !

उघड्यावरती टाकुनियां
राखा ती फुलती दुनिया;
चोरितांच वाटे ऐशी
चोरीची थट्टा खाशी !
चित्त शरमलें,
जरी विरमलें,
तरिही रमलें;
चोरी असली लाजेची
वाटे त्याला मौजेची ! ७

अशी निराशा भरे मनीं
शरीर भरलें कांट्यांनीं;
गुलाब मज हांसत बसला
हाताशीं नाहीं आला;
नवल तरी कैसें होई
दुःख निराशा नच देई !
न कळे कांहीं,
हुरहुर कां ही !
वेडें मनही
कां विनवितसे देवासी ?
निराशाच दे गोड अशी ! ८

— गोविंदाग्रज

## २८. एकदांच पाहिलें

पाहिलें तयाक्षणींच आपुली न राहिलें ध्रु०

काय जाहलें कळे न
चित्त ठायिं राहिलें न
वेध लागला जिवास, अंतरंग मोहिलें. १

जी कधींच अनुभवीं न
सृष्टि ती दिसे नवीन
सांगतां मुखीं न येति भाव ते मनांतले. २

दृष्टि घे तिथेंच उडी
वृत्ति तीं न सोडि घडी
ज्या घडीस नयन-नयन एकमेक भेटले. ३

ठाउकें न नांव गांव
कळवुं केविं हृदयभाव
हें असें अधांतरीं जिणें न जाय साहिलें. ४

इंद्रियां न विषयभान
एक लोचनां तहान
हाच जरी प्रेमबाण, माखिला हलाहलें. ५

—उपाध्ये

## .२९. गुलाबी कोडें

[ संध्याकाळीं सूर्य पश्चिम दिशेस असतांना पश्चिम तर तांबडी होतेच; पण पूर्व दिशेवरहि त्याच रंगाची छटा दिसते हें पुष्कळांनीं पाहिलेंच असेल. ]

रंग गुलाबी संध्या पसरी पश्चिम दिग्भागीं,
समोर पूर्वा स्वमुख रंगवी त्याच रम्य रंगीं.

परी पश्चिमाहृदयिं तांबडें सूर्यबिंब विलसे,
कशी रंगली पूर्वा याचें कारण कांहिं नसे,

विनोदचतुरा मुग्धा बाला विचारि निज नाथा
" शास्त्रज्ञा, पंडिता, उलगडा हें कोडें आतां !

अपरा–वदनीं रमते लाली रविसहवासानें,
रवि नसतां परि कां रंगावें प्राचीच्या वदनें ?

रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली !
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली ! "

विनोदपंडित पति कौतुकला, हंसे तसा थोडें;
ओंठ गुलाबी, गाल गुलाबी, गुलाबीच कोडें !

वदे तिला, " हें रहस्य असलें कथीन कानांत ! "
करि कंठीं कर एक, दुज्यानें धरि दुसरा हात !

ओढुनि जवळी, ऐकविला तिस मुकाच कानांत,
––गालांवरचें गीत कसें तें वठवूं गानांत !

दूर सरकतां लज्जित बाला, प्राणनाथ बोले
" बघ हृदयाच्या आरशांत जें चित्र तुझें डोळे.

रविबिंबासम चुंबन-बिंबचि विलसत या गालीं,
सहज तयाची छटा गुलाबी पसरे भंवतालीं.

चुंबनचित्र न परी उमटतां या दुसऱ्या गालीं,
सांग, वल्लभे ! नाचतसे कां त्यावरि हो लाली ?

रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणि कधीं कशी केली ? "

" कांट्यानें काढावा कांटा ", शास्त्रज्ञा ठावें,
गुलाब टाकुनि गुलाबास मग कां नच उडवावें ?

हीं हृदयाचीं कोडीं सोडवि हृदयांचा मेळ,
शास्त्रांना हा कसा कळावा हृदयाचा खेळ !

ओठ गोष्ट मग कशीं बोलली तीं मिटलीं तोंडें,
' गोविंदाग्रज ' रसिकां टाकी गुलाबाचि कोडें !

—गोविंदाग्रज

## ३०. मदनविद्धाचें ज्योतिष

शुभांगी शोभे जी गगनसम नीलांबरवती,
जरीचे बिंदू हे गगनिं शुभ तारे चमकती,
स्वयें चंद्राची कीं वदनिं वसते हो सरसता,
अशीचे, अंधांनो ग्रह तरि तुम्ही काय बघतां ? १

जिचा उंचीचा कीं मदनशशि हा स्वीय सदनीं,
कृशांगीच्या जीच्या विलसति गुरूशुक्र नयनीं,
ललाटीं कुंकू तो विकसित वसे मंगल स्वतां,
अहो जन्मांधांनो ग्रह तरि तिचे केंवि बघतां ? २

सुकेशीच्या केशीं सुकिरण परावृत्त दिसतो,
जणूं वेणीमाजीं शनि रमणिच्या नित्य डुलतो,
सदा येथें राहूं जवळिं, कवळूं चित्त म्हणतां,
कसे रे मंदांनो ग्रह बघत हे स्वस्थ बसतां ? ३

उडे जाई मागें पदर पवनें कंपित दिसे,
तदा केतू चेतोहर मदनसैन्यांत विलसे,
अशी तन्वी डोळे भरुनि बघुनी तृप्ति नसतां,
रिकामे अंधांनो ग्रह घुसळुनी काय करितां ? ४

गुणातें एकेका रदन करुनी ठेवि वदनीं,
गुणी ऐसी रामा मम गुणवती कुंदरदनी;
शुभांगी सर्वांगा त्यजुनि निज पंचांग रडतां,
अतां कैसे वानूं ? जरठ मजला सत्य दिसतां ? ५

जिला लावण्याची सकल जन हे रास म्हणती,
तनुस्थानीं जीच्या जननयनतारा विहरती,
धनस्थानीं हीच्या बुधजनचिदानंद असतां
अहो निर्बुद्धांनो ! ग्रह छळुनियां काय रडतां ! ६

स्वयें तारा किंवा ग्रहसकलधामैक रमणी,
हिला सोडोनीयां दिसत दुसरी काय तरुणी ?
अशी ही टाकोनी ग्रह ! ग्रह ! उगे कां बकतसां !
मला रे क्रूरांनो ! उगिच बसुनी कां छळितसां ! १७

—खापर्डे

## ३१. तूं तर चाफेकळी

" गर्द सभोंतीं रान, साजणी तूं तर चाफेकळी !
काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं ? "

ती वनमाला म्हणे " नृपाळा, हें तर माझें घर;
पाहत बसतें मी तर एथें जललहरी सुंदर.

हरिणी माझी, तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी गोड बोलते, तिजला माझा ळळा.

घेउन हातीं गोड तिला त्या कुरणावरती फिरे—
भाऊ माझा, मंजुळवाणें गाणें न कधीं विरे."

" रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी तुला.
तूं वनराणी, दिसे न भुवनीं तुझिया रूपा तुला.

तव अधरांवर मंजुळ गाणीं ठसलीं कसलीं तरी
तव नयनीं या प्रेमदेवता धार विखारी भरी !

क्रीडांगण जणुं चंचल सुंदर भाल तुझें हें गडे,
भुरु भुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळे उडे.

अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालावरी,
भुललें तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरीं. "

—बालकवि

## ३२. प्रेम आणि मरण

जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी,
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी.

——श्रीहोनाजी बाळ

कुठल्याशा जागीं देख
मैदान मोकळें एक—पसरलें.
वृक्ष थोर एकच त्यांत
वाढला पुऱ्या जोमांत—सारखा.
चहुंकडेच त्याच्या भंवतें
गुडघाभर सारें जग तें—तेथलें.
झुडुपेंच खुरट इवलालीं,
मातींत पसरल्या वेली—माजती.
रोज तीं, कैक उपजती, आणखी मरती,
नाहिं त्यां गणती ! दादही अशांची नव्हती—त्याप्रती. १

त्यासाठीं मैदानांत
किति वेली तळमळतात—सारख्या.
परि कर्माचें विंदान
कांहींतरि असतें आन—चहुंकडे.
कोणत्या मुहूर्तावरती
मेघांत वीज लखलखती—नाचली !
त्या क्षणीं, त्याचिया मनीं, तरंगति झणीं
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी—न कळतां. २

तो ठसा मनावर ठसला;
तो घाव जिव्हारीं बसला—प्रीतिचा.
वेड पुरें लावी त्याला
गगनांतिल चंचल बाला—त्यावरी.
जातिधर्म त्याचा सुटला,
संबंध जगाशीं तुटला—यापुढें.
आशाहि, कोठली कांहिं, राहिली नाहिं
सारखा जाळी। ध्यास त्यास तीन्ही काळीं—एक तो. ३

मुसळधार पाऊस पडला
तरि कधीं टवटवी त्याला—येइना.
जरि वारा करि थैमान
तरि हले न याचें पान—एकही.
कैकदां कळ्याही आल्या
नच फुलल्या कांहीं केल्या—परि कधीं !
तो योग, खरा हटयोग, प्रीतिचा रोग
लागला ज्याला। लागतें जगावें त्याला—हें असें ! ४

ही त्याची स्थिति पाहुनिया
ती दीड वितीची दुनिया—बडबडे
कुणि हंसे कुणी करि कींव,
तडफडे कुणाचा जीव—त्यास्तव.
कुणि दयाहि त्यावरि करिती,
स्वर्गस्थ देव मनिं हंसती—त्याप्रती.

निंदिती, कुणी त्याप्रती, नजर चुकविती,
भीतिही कोणी, जड जगास अवजड गोणी—होइ तो. ५

इष्काचा जहरी प्याला,
नशिबाला ज्याच्या आला—हा असा
टोंकाविण चालू मरणें,
तें त्याचें होतें जगणें—सारखें.
हृदयाला फसवुनि हंसणें,
जीवाला न कळत जगणें—वरिवरी.
पटत ना, जगीं जगपणा, त्याचिया मना,
भाव त्या टाकी, देवांतुनि दगडचि बाकी—राहतो. ६

यापरी तपश्चर्या ती
किति झाली न तिला गणती—राहिली.
इंद्राच्या इंद्रपदाला
थरकांप सारखा सुटला—भीतिनें.
आश्चर्यें ऋषिगण दाटे,
ध्रुवबाळा मत्सर वाटे—पाहुनी.
तों स्वतां, तपोदेवता, काल संपतां,
प्रकटली अंतीं, ‘ वरं ब्रूहि ’ झाली वदती—त्याप्रती. ७

“ तप फळास आलें पाहीं,
माग जें मनोगत कांहीं—यावरी.
हो चिरंजीव लवलाही,
कल्पवृक्ष दुसरा होई—नंदनीं.

...५...

प्रळयींच्या वटवृक्षाचे
तुज मिळेल पद भाग्याचें–तरुवरा !
तो वदे, ‘ देवि सर्व-दे, हेंच एक दे–,
भेटवी मजला, जीविंच्या जिवाची वाला–एकदां ! ’. ८

सांगती हिताच्या गोष्टी
देवांच्या तेतिस कोटी–मग तया.
“ ही भलती आशा बा रे
सोडि तूं वेड हें सारें–वातकी.
स्पर्शासह मरणहि आणी
ती तुझ्या जिवाची राणी–त्या क्षणीं.
ही अशी, शुद्र राक्षसी, काय मागसी,
माग तूं कांहीं, लाभलें कुणाला नाहीं–जें कधीं. ” ९

तो हंसे जरा उपहासें,
मग सर्वेच वदला त्रासें–त्यांप्रती.
“ निष्प्रेम चिरंजीवन तें,
जगिं दगडालाही मिळतें–धिक् तया.
क्षण एक पुरे प्रेमाचा,
वर्षाव पडो मरणांचा–मग पुढें. ”
निग्रहें, वदुनि शब्द हे, अधिक आग्रहें,
जीव आवरुनि, ध्यानस्थ बैसला फिरुनी–वृक्ष तो. १०

तो निग्रह पाहुनि त्याचा
निरुपाय सर्व देवांचा–जाहला.

मग त्याला भेटायाला
गगनांतिल चंचल वाला–धाडिली.
धांवली उताविळ होत
प्रीतीची जळती ज्योत–त्याकडे.
कडकडे, त्यावरी पडे, स्पर्श जों घडे,
वृक्ष उन्मळला, दुभंगून खालीं पडला–त्या क्षणीं. ११

दुभंगून खालीं पडला,
परि पडतां पडतां हंसला–एकदां.
हर्षाच्या येउनि लहरी
फडफडुनी पानें सारीं–हांसलीं.
त्या कळ्या सर्वही फुलल्या,
खुलल्या त्या कायम खुलल्या–अजुनिही.
तो योग, खरा हठयोग; प्रीतिचा रोग
लागला ज्याला, लाभतें मरणही त्याला–हें असें. १२

स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी
मराठी रसिकांसाठीं ‘ गोविंदाग्रज ’ पाठवी.

—गोविंदाग्रज

## .३३. भेटीचा पहिला प्रसंग !

येइल कोणी गडे !
जाउं द्या, काळिज मम धडधडे ! ध्रु०

शिकवायाच्या मिषें आणिलें मजशीं एकीकडे;
तुमचे असले पुरे जाहले मुलखाविरहित धडे. १

गोकुळापरी घर भरलेलें, भावोजी पलिकडे;
सासुबाइही मामंजीना लावुनि देती विडे. २

माउबाइसम जाउबाइची दृष्टि चपल चहुंकडे;
हुडकित हुडकित वन्सहि येउन उभ्या राहतिल पुढें. ३

मावस-सासूबाइ घरामधिं जणुं बिजली कडकडे;
भिडविल बाई कोण तयांच्या नजर ग ! नजरेकडे. ४

बसाल आपण खुशाल येथें घेउन पुस्तक पुढें,
परि माझ्या निंदेचे झडतिल घरोघरीं चौघडे. ५

नका आवळूं मनगट इतुकें फुटतिल बिलवर गडे !
अगबाई ! ये कुणितरि इकडे पळुं आतां कुणिकडे ? ६

—रणदिवे

## ३४. पुनर्जात प्रेमास

प्रेमा ! ऊठ--चल उघड, झांकली मूठ !
तुंबळ सागर तव खळबळला,
हृदयीं तटवूं त्यास कशाला ?
जगभर लाटा उधळायाला
दिली तुज सूट---चल उघड झांकली मूठ !
कोंडुनि असला सागर धरिला,
माझा मूर्खपणा मज कळला,
मिळतां स्थल तुज नाचायाला,
करीं रे लूट---चल उघड झांकली मूठ !
क्षणभर वाटत होतें मजला,
कीं तव ओघ आटुनी गेला,
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट---चल उघड झांकली मूठ !
उगवे सूर्य काल मावळतां,
फिरुनी फुलतें फूलहि मिटतां,
प्राणजीवना, तुजही शिवतां
मरण हें झूट---चल उघड झांकली मूठ !
द्वेषावरती, दुःखावरती,
फिरवीं तुझ्या यशाची महती,
जा, जा, नाच सर्वही जगतीं,
धांव बेछूट---चल उघड झांकली मूठ !

विसरुनि जाऊं अनुभवजाला,
तुडवूं पायीं चल खेदाला !
टाकूं जाळुनि नैराश्याला !
दुःख सर्व झूट ! --चल उघड झांकली मूठ.

तुझिया श्वासाच्या उद्गारें
टाकूं भरुनी जग हें सारें,
एकच नादें करुं आतां रे,
सुखाची लूट--चल उघड झांकली मूठ !

मी तूं दूर न राहूं आतां,
दाखवुं शक्ती अपुली जगता,
आणूं परमेश्वरही हाता;
उठ रे ऊठ--चल उघड झांकली मूठ !

—गोविंदाग्रज

## .३५. पातली दिपवाळी राजसे !

सुटति न अजुनी बाण नयनिंचे वेगवान तीव्रसे,
पातली दिपवाळी राजसे !
फुगले नाहिंत अजुनि गुलाबी गालाचे अनरसे,
पातली दिपवाळी राजसे !
दंतपंक्तिच्या रांगोळीचे उठति न अधरीं ठसे,
पातली दिपवाळी राजसे !
उधळि न जिह्वेची फुलबाजी वक्र फुलांचे पसे,
पातली दिपवाळी राजसे !
मुरड न मानेच्याहि करंजिस गोडगोडशी बसे,
पातली दिपवाळी राजसे !
प्रेमदेवतेच्या प्रेमाचे दिवे न लागति कसे,
पातली दिपवाळी राजसे !
कलहकारणा हात नव्या रंगाचा बसला नसे,
पातली दिपवाळी राजसे !
सुरम्य रुसव्या रोषणाइचें दृश्य मुखीं नच दिसे,
पातली दिपवाळी राजसे !
आपटबार पदांचे करिति न कर्ण अजुनि बधिरसे,
पातली दिपवाळी राजसे !
यांविण व्हावें माझ्याकडुनी लक्ष्मीपूजन कसें ?
पातली दिपवाळी राजसे !

—रणदिवे

## ३६. तान्हुला

तान्हुल्या !
वाटतें तुला
काय तरि बाळा ?
झोपेंत दचकसी काय असा वेल्हाळा ! १

जग कसें
ठाऊकें नसे
मुळीं तुज कांहीं,
तुज 'आजऊथांचा' विचारही पण नाहीं. २

कठिणता
मूर्त ती खतां
जगीं या भरली;
झुळकही तिची परि नाहीं तूं अनुभविली. ३

बाधिती
घडरि गांजिती
अम्हाला बाळा !
परि दूर पळति तव भिऊनि शुद्ध आत्याला. ४

कां बरें
हृदयिं मग भरे
भयाची धडकी,
चिमुकल्या ! तुझ्या ही; काळिज मम तुटतें कीं. ५

तुज असे
काय तरि दिसे
म्हणुनि मुख रडवें
जाहलें तुझें हें? नयनीं मज नच बघवे ! ६

कल्पना
तुझ्या नच मना
मुळीं दुःखाची;
कां भीसि, काढिसी ओढ, काय तुज बोंची? ७

संसृति
दुःखपूर्ण ती,
मनुज रडण्याला
जन्मला जगीं, परि बाळपणीं सुख त्याला. ८

तूं जाण
सुखाची खाण
पूर्ण ती असुनी
झोपेंत दुःख तुज कोण देत कोठोनी? ९

वळविल्या
मुठी, चढविल्यां
भृकुटि कां भाळीं?
हा राग कशाचा तुला तरी या काळीं? १०


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४८२६९..... दि: ..........

कोंवळी
स्मिताची कळी
कोंवळ्या गालीं—
विकसली, कपोलीं खळी गोड किति पडली ! ११

कुणिकडे
लपवुं या गडे
जगापासोनी
का हृदय फाडुनी ठेवुं आंत लपवोनी ? १२

—रहाळकर

## ३७. विराणी

कुणि कांहिं म्हणा, कुणि कांहिं म्हणा
अनुसरलें अपुल्याच मना ! ध्रु०
रीत म्हणा, विपरीत म्हणा कुणि
दिलें झुगारुनि आवरणा. कुणि०
रीति कुरीती, नीति अनीती
आतां उरली चाड कुणा ? कुणि०
लोकलाज भय धरूं कशाला
मागायाचें काय जना ? कुणि०
जळल्या साऱ्या आशा मनिंच्या
पुसल्या उरल्या त्याहि खुणा. कुणि०
स्वैर सोडिलें तारुं मनाचें
त्यजिला रुळला मार्ग जुना. कुणि०
मेलें सासर माहेरहि तें
मिटला विटला आप्तपणा. कुणि०
जीव भरेना, हौस पुरेना,
वाढतोच घरिं काम दुणा; कुणि०
यास्तव हा 'परपुरुष' परिणिला
मन मिनलें गोविंदगुणा ! कुणि०

—उपाध्ये

## ३८. अनंताची आरती

निरंजनासी निरंजनाचा देवा दीप तुला
दाविती देवा, दीप तुला ध्रु०
आकाशाच्या अंगणांत तव
सूर्यसहस्त्रीं जो दीपोत्सव
पाजळिती हे पणती अपुली त्यास करूं साजरा
दाविती देवा, दीप तुला ! १

सूर्यसहस्त्रींही जो उरला
पणतीनें तो जाई स्फुरला
नयनीं ऐसा अंधकारलव आहे तोचि भला
दाविती देवा, दीप तुला ! २

आईच्याची बागेमधुनी
ताजींताजीं वेंचुनि वेंचुनि
मुली गुंफिती आईच्याची वेणींतूनि फुलां;
दाविती देवा, दीप तुला ! ३

—सावरकर

## ३९. वस्तुजातांत उभा भगवंत

बनवोत मंदिरें तुजसाठीं धनवंत
तूं निखिल वस्तुजातांत उभा भगवंत !

मध्याह्नरात्रिच्या गगनमंडपाखालीं
तव शांति दिसे ध्यानस्थ मला बसलेली.
कविजन ज्या म्हणती मधुर फुलांचें हास्य
मज दिसे त्यांत तव मृदुल मनाचें लास्य.
नव धवल चंद्रिका यदा धरेला न्हाणी,
वाणीच गमे ती मजशिं तव सुधेवाणी.
तव वीतरागता दावि मला तरुराजि;
विलसे तव शुचिता विमल तडागांमाजी.
हे खळखळणारे ओढे, सरिता संथ
द्रविभूत तुझ्या करुणेचे ओघ अनंत.
तव वत्सलताही शिरुनि उषादेहांत
सृष्टीच्या फिरवी अंगावरुनी हात.
तव सौंदर्याच्या छटा, न हा हरिचाप;
अध्यात्मगीत तव मूर्त कोकिलालाप.
नच गगन, तुझ्या हें मस्तकिं छत्र:विशाल;
तारांच्या लटकति झालरि ज्या बिनमोल.
हा सिंधुरव न, तव उपदेशाचा घोष,
दे अर्थ तयाचा आर्त जिवांना तोष.

तव पूजनार्थ भगवंत ! धरुनि गिरिरूप
सोत्कंठ उभे हे अमर-लोकिंचे भूप.
हिमगिरींद्र करिं घे केशर हा तुजसाठीं
सह्याद्री श्रीफळ भरिं कोकणच्या ताटीं.
उधळिती फुलें तुजवरी लतासुरबाला
खग–किन्नर गाती, गोड धरिति घन ताला.
ही वीज म्हणति त्यां खुळ्यांस समजेनाच;
करि भक्ति-मुग्ध ही रम्य अप्सरा नाच.
तूं, तुझी विभूती, ऐशी–मजपुढें
फिरविली दृष्टि ही कैशी–कुणिकडे ?
तरि दिसशी विश्वहितैषी–चहुंकडे.
मज म्हणोत वेडा धर्मज्ञांचे कुकडे
भगवंत ! मजशि तूं दिसशी जिकडे तिकडे !

——रणदिवे

## ४०. जगन्नाथाचा रथोत्सव

**परिचय :** जगन्नाथपुरी या क्षेत्रीं जगन्नाथाच्या रथाची मिरवणूक प्रतिवर्षीं निघत असते. ती मिरवणूक एक उदात्त व विशाल प्रतीक आहे अशी कल्पना सुचून तिचें वर्णन या कवितेंत केलें आहे. यांत विश्वनियंता जगन्नाथ गतींचे अश्व जुंपलेल्या दिक्क्षितिजांच्या रथांत बसून कालाच्या अतूट उतरणीवरून कुठें जात आहेत याबद्दल साश्चर्य प्रश्न केला आहे.

१

ऐश्वर्यें भारी । या अशा । ऐश्वर्यें भारी
महाराज, आपुली कथा ना कुठें निघे स्वारी ? ध्रु०
   दिक्क्षितिजांचा दैदीप्य रथ तुझा सुटतां
   ह्या कालपथाच्या अतुट उतरणीवरता
   नक्षत्रकणांचा उठे धुराळा परता
युगक्रोश दूरी । मागुती । युगक्रोश दूरी
महाराज, आपुली कथा ना कुठें निघे स्वारी ?

२

पुसूं नयेचि परी । पुसतसे । पुसूं नयेचि परी,
मिरवणूक ही किमर्थ अथवा कुठें निघे स्वारी ?
दुज्या कुण्या द्वारीं । जावया । दुज्या कुण्या द्वारीं
किंवा केवळ मिरवित येऊं परत निजागारीं ?

ह्या सूर्यशतांच्या किती मशाली जळती
मधुनीच शतावधि चंद्रज्योति ह्या उडती
सरसरत बाण हे धूमकेतुचे सुटती
कितिदां आणि तरी । हीहि तैं । कितिदां आणि तरी
उठे चमकुनी रात्रि पुरातन तिच्या अंधकारीं

३

जीवाचीच किती । कथा या । जीवाचीच किती
रथासी जगन्नाथ, तुझ्या या ओढूं जे झटती.
ज्वालामुखिपंक्ती– । पासुनी । ज्वालामुखिपंक्ती
—मज्जापिंडापर्यंत प्रस्फुटिता जी जगतीं,
उंचनिंच पाठीं । पुढति वा । उंचनिंच पाठीं
गति तितुकी तव रथा झटतसे ओढायासाठीं.

इच्छांत आणि या भूतमात्र वेगांच्या
ओवून लगामा तुझ्या परम इच्छेच्या
त्या अतुट उतरणीवरती हो काळाच्या

खेळत हा अतलीं । रथोत्सव । खेळत हा अतलीं
महाराज, आपुली कथा ना कुठें निघे स्वारी ?

—सावरकर

# ४१. एका जुन्या श्लोकाची आठवण

" डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कार्नी, पदीं चालतों,
जिव्हेनें रस चाखतों, मधुरही वाचे अम्ही बोलतों,
हातांनीं बहुसाळ काम करितों, विश्रांतिही घ्यावया
घेतों झोंप सुखें, फिरून उठतों ही ईश्वराची दया."
पूर्वी पूर्ववयें प्रसन्नमयता जेव्हां मिळे सृष्टिला
शाळेच्या चिमण्या जगांत असतां हा श्लोक मीं वाचिला;
साध्या बाळमनास अर्थ पटला, आनंदही वाटला;
आतां कां करुणारस स्मृतिबळें त्याच्या असा दाटला ?
डोळ्यांनीं बघणें, ध्वनी परिसणें इत्यादि सर्वा क्रिया
आतांही घडती; उपाधि चुकल्या नाहींत जीवासि या
जेव्हां जीव थकून पाहत परी विश्रांतिही घ्यावया
नाहीं झोंप सुखें–अहो, हरपली ती ईश्वराची दया !

सौंदर्यें भरल्या जगास बघुनी हा प्रश्न चित्तीं उठे,
जीवानें जगिं काय कार्य करणें श्लोकांत नाहीं कुठें !

—गोविंदाग्रज

## .४२. वेडा ठरलों !

मी या जगांत वेडा ठरलों ! मी या जगांत बाजूसि सरलों !
जग हें अपुल्या उदरा भरितें, मी उपवासी उरलों !
जग हें नटुनी थटुनी साजे, मी नटण्यास विसरलों !
जग हें वैभवसंग्रह करितें, मी उधळित तें सुटलों !
जग हें यथेच्छ निद्रा घेतें, मी तिजला मुळिं विटलों !
जग हें स्वप्नीं भिउनी कांपे, मी बहु त्यामधिं रमलों !
जग हें उगीच हांसत राहे, मी अश्रुजलें भरलों !
जग हें सदैव अपणा बघतें, मी पर पाहत फिरलों !
जग हें दिवसां मशाल लावी, मी तमिंहि न डगमगलों !
जग हें सुमनें हुंगुनि टाकी, मी तद्रसांत शिरलों !
जग हें एका मार्गा लागे, मी अन्या अनुसरलों !
कैसा जगिं या मिसळुनि वागूं? ऐसा जर अवतरलों !

—सुमन्त

## .४३. विचार

[ विचार ज्याच्या त्याच्या पाठीस लागलाच आहे. त्याची ओळख कशाला करून द्यावयाला पाहिजे ! ]

(१)
विचार करितां तुजविषयीं
गुंग, विचारा! मन होई.
दिवसभरी करुनी धंदा
गुलाम पोटाचा बंदा
पडे न तो थकव्यासाठीं
तोंच लागसी त्यापाठीं !
ताळतंत्र न तुला कांहीं
आदि अंत तुजला नाहीं !
दया न अंतरिं,
करिसी स्वारी,
सदा तयांवरि—
खपती जे पोटावारी
या जगताच्या बाजारीं.

(२)
तूं असती बहु नवलपरी,
विश्रांतीचा कामकरी;
निद्रा तव करितां नाश,
स्वप्नांतहि देसी त्रास !
झोंप जागती तयांप्रती,
ज्यांसी तूं धरिसी हातीं.
नसल्या आधि
स्वैर शतावधि
निर्मुनि आधीं,
क्षणोक्षणीं मग वाढविसी
विश्वामित्र दुजा गमसी !

(३)
विपत्तिकाळीं आम्हांसी,
न कदाही टाकुनि जासी !
मित्र म्हणावें तुला जरीं,
देह जाळिसी सदा तरी !
शत्रु म्हणावें जरि तुजशीं
यत्न हितास्तव तरि करिशी !
"कसें करूं मी ?
काय करूं मी"
ध्रुवपद नामी
हें तुझिया रडगाण्याचें,
नांव न संकट जाण्याचें !

(४)

करिसी एकांतीं गर्दी,
एकांतहि जनसंमर्दी.
जागा असतां कुणि त्यासी,
पुढचीं स्वप्नें दाखविसी !
निजतां कोणी त्याकरवीं,
करविसि तूं कामें बरवीं.
देइन म्हणशी,
सुंदर खाशी,
"उद्यां" नराशीं
"आज" हातिंची परि हरिसी
मृगजळिं मनुजा खेळविशी !

(५)

पुत्र भविष्यत्कालाचा,
जन्मसि त्याआधीं साचा;
चिंता जननी तुझी जरी,
घात इच्छिसी तिचा तरी.
वाढायाची गति अतुला,
काळाह्लानि बहु वेग तुला.
दीन जनांवर
लोभ अनावर
करिसि निरंतर;
विचित्र लीला जशी तुझी
तशी नाढळे जगीं दुजी !

—गोविंदाग्रज

## ४४. तीर आणि गरुड !

पुरे पुरे, हा वेग आवरीं; जा खालीं जा शरा !
वृथा तव यत्न गर्वनिर्भरा ! ध्रु०

पक्ष्यांचा मी राजा मजला गरुड बोलती पहा,
असे कीं शक्ती मम दुःसहा !
स्वैर विहरतों खबळें व्योमीं, दिशा मोकळ्या दहा,
मजा ती माझी मजला अहा !
या प्रवातपृष्ठीं स्वार होउनी सुखें
त्या प्रभुरायाचे गुण गातों निज मुखें,
गंधर्वहि येउनि ऐकतात कौतुकें,
स्पर्धा करिसी मजसंगें तूं पावुनि उसनी त्वरा !
वृथा तव यत्न गर्वनिर्भरा ! १

लोहाचें मुख तुझें विषारी प्रखर धार त्या जरी,
चेतनेविण फुका ती तरी;
सगुण धनूचें सहाय्य मिळतां उडसी गगनोदरीं,
`गानही कटुतर गासी खरीं;
हो मंद मंद तव गति क्षणोक्षण वरी,
खग हीन असावध वधिसी मार्गांतरीं,
ती क्लीबोचितशी तुझी शूरता खरी;
प्रबलावरती झेंप घालितां यश न निर्बला जरा !
वृथा तव यत्न गर्वनिर्भरा ! २

अंगींचे ज्या पक्ष राहती, कीटहि उडतो स्वतां,
त्याहुनी फार तुझी नीचता;
पिसें पराचीं, परशक्तीची उडी न दे प्रबलता,
दाविते गर्व हरुनि मूर्खता !
बुध लीन होउनी हीन जना चढवितो,
त्वन्मूर्खपणा त्या क्षणीं अंध घडवितो !
व्यापार नको तो पार ठार बुडवितो !
वर झालें शिर खालीं करुनी पडसी तूं पामरा,
वृथा तव यत्न गर्वनिर्भरा ! ३

— सुमन्त

## ४५. विरामचिन्हें

जेव्हां जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जो जो दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला.
बाल्याची पहिली अशी बदलली दृष्टी सदा बागडे,
तेव्हां ‘स्वल्पविराम’ मात्र दिसती स्वच्छंद चोंहींकडे !
आहे काय जगांत ? काय तिकडे ? हें कोण ? कोठें असे ?
सांगा ईश्वर कोण ? त्यापलिकडे तें काय ? केव्हां ? कसें ?
जें तें पाहुनि यापरी भकतसे दृक् संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसें तैं ‘प्रश्नचिन्हां’कित !
अर्धांगी पुढती करी वश मना, शृंगारदेवी नटे,
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे;
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये;
केला ‘अर्धविराम’ तेथ, गमलें येथून हालूं नये !
झाली व्यापक दृष्टि, चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं;
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखीं भ्रमविती, लागे मुळीं अंत न;
त्या काळीं मग जाहलें सहजची ‘उद्‌गार’वाची मन !
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश,
हीं एकेक समर्थ आज नसती चित्ता कराया वश !
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला,
देवा ! ‘पूर्णविराम’ त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला !

—गोविंदाग्रज

राजा ग्रंथ-संग्रहालय, ठाणे. [illegible]

## ४६. प्रभावना !

अनित्यांतुनी नित्य तेवढें बुद्धि वेंचिते जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

ध्येयासाठीं देहागेहा जीव विसरले जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

हीनादीनासाठीं ठिबके अश्रुमालिका जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

थकलेल्यांचे भार वाहण्या लवतें माथें जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

तळमळल्या हृदयावर फिरती कर करुणेचे जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

खुल्या दिलाच्या दारांतुन डोकावि मनुजता जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

हलाहल प्राशिते स्मितमुखें प्रणयदेवता जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

कंटकमार्गीं फुलें पसरती भणंग कोणी जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

डोळे वणव्यांतहि कोकिलगण गानसमाधिंत जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

कुऱ्हाडिचेही घाव ढळविना शांति मनाची जिथें,
मानितों प्रभावना नी तिथें.

प्राण होति कुरबान तत्त्वसंरक्षणकार्यीं जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

तिरस्कृतांही सहानुभूती जेथें कवटाळिते,
मानितों प्रभावना मी तिथें.

वत्सलता माउली पाहिना भेदभावना जिथें,
मानितों प्रभावना मी तिथें.

चेतनमात्रा करुणामाता जेथें जोजाविते,
मानितों प्रभावना मी तिथें.

निर्मल, सुंदर, पवित्र, मंगल जिथें जिथें नांदतें,
मानितों प्रभावना मी तिथें.

—रणदिवे

## ४७. एक समस्या

असे एकदां दोघे चौघे कामाला प्रातःकाळीं
घरांतुनी बाहेर निघालों, घाई जाण्याची सगळी.
तोंच धडकली समोर येउनि वृद्धा विधवा दारांत,
अपशकून हा पाहुनि बसला त्रासिक चरका चित्तांत.
" वेळ साधिते कशी बरोबर पहा अशी पीडा नसती,
या विद्रुप अवदसा सारख्या अशा चहुंकडे वणवणती "
*        *        *        *
चार पावलें पुढें सरकलों विसरुनि सारें झोकांत,
एक अडाणी कुणबट आलें कागद घेउनि हातांत.
अडवुनि बोले, "वाचुनि दावा दादा कागद हा इतुका "
त्रासुनि वदलों, "बाबा, आम्हां दुसरीं कामें नाहिंत का?
गिचमिड ओळी–भिकार अक्षरं·लावित बसणें हें कोणी;
दुसऱ्या कोणाच्या पाठीवर लाद नेउनी ही गोणी.
येईना वाचतां तुम्हांला जरि पत्राचा व्यवहार
कां करितां मग उगाच हा अव्यापारेषुव्यापार ? "
दिलें चिटोरें त्याचें त्याच्या अंगावरतीं टाकून,
चालू झालों गप्पा मारित कांहीं कांहीं हांसून.
*        *        *        *
जातां किंचित् पुढें आढळे–नांव न घेणें कवनांत,
डोकीवरती पाटी घेउनि अगदीं शेजारुनि जात.
त्या घाणीनें मस्तक फिरलें–रागाहि आला भरपूर,
बोलत कांहीं आम्ही झालों त्यापासुनि आधीं दूर.

" इतका झाला दिवस तरी हे खुशाल अजुनी फिरतात;
घाण घेउनी चहूंकडे ही हवे तसे वावरतात.
उर्मट तर हे इतके असती बेमुर्वत देतिल धक्का,
बंदोबस्तच या लोकांचा नाहीं केला कुणि पक्का ! "

* * * *

जातां जातां पुढें यापरी एक दिसे पिंपळपार,
दत्ताचें देवालय खालीं छोटेसें शोभे फार.
सुंदर तरुणी हिंडत होती त्या देवाच्या भंवतालीं;
निरखुनि बघतां–हरहर ! होती विधवा ती बाला असली.
उचंबळुनी ये करुणारस–नेत्रहि अश्रूंनीं भिजले;
निर्दयता दैवाची बघुनी हृदय बिचारें तें थिजलें.
न्यायदेवता जागृत झाली त्या सौंदर्या बघतांच,
विषय दयेचा लावित नाहीं कोणाच्या जीवा आंच ?
" धिग् धर्माला–धिग् रूढीला–तेतिस कोटी देवांना–"
किती बोललों––नको सांगणें ! पाठ असे तें सर्वांना.
काम कशाचें ! धाम कशाचें ! एक प्रश्न मम हृदयांत.
" सुधारणा होणार तरि कधीं या दुर्दैवी देशांत ? "

* * *

प्रश्नाच्या उत्तरासाठीं रसिकां जोडुनी करां
'गोविंदाग्रज' प्रार्थी कीं समस्या पूर्ण ही करा !

—गोविंदाग्रज

## ४८. पायऱ्यांची फिकीर

इंद्रधनूंतिल वर्ण कोणता करि सर्वांवर ताण ?
पंचशराचा प्रभावशाली अधिक कोणता बाण ?
पुष्पामाजीं वर्णे, गंधें कोण कुणाहुन छान ?
किन्नरकंठांतील कोणती अधिक मनोहर तान ?
हंसऱ्या ताऱ्यांमधें कोणता वरचढ इतरांहून ?
कारंजाचा कवण वारिकण टाकि अधिक मोहून ?
कवणाचें पद थोर नाचऱ्या सरित्तरंगांमाजीं ?
कवण जातिच्या रत्नावर हो अधिक चारुता राजी ?
सुधांशुच्या कोणत्या कराचें कुठें कोणतें स्थान ?
मंद वसंतसमीरणलहरिंत अधिक कुणाचा मान ?
रमणींचें भ्रूचालन वा नयनांची गनिमी फेंक,
अधरावरचे उवडझापिचे हास्याचे अभिषेक,
क्षणोक्षणीं बदलता पहारा गालींच्या अरुणाचा,
करीतसे जो जीव बापुडा खालींवर रमणाचा,
वा चढत्या रागाच्या तिचिया चढत्या लाटा भालीं,
किंवा नयनींच्या मोत्यांची माळ रुळे जी खालीं,
यांतिल सर्वोत्कृष्ट कोणता सौंदर्याचा खेळ ?
अन्यांच्याही कशा पायऱ्या रसिका, बसवी मेळ !

—रणदिवे

## ४९. एखाद्याचें नशीब

कांहीं गोड फुलें सदा विहरती स्वर्गांगनांच्या शिरीं,
कांहीं ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद ह्न्मंदिरीं;
कांहीं जाउनि बैसती प्रभुपदीं पापापदा वारि तें,
एकादें फुटकें नशीब-म्हणुनी प्रेतास शृंगारितें !
कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हैमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला;
कोणाला वनदेवता वरितसे, मोदांत जी नाहते,
एकाद्यामधुनी परंतु जळती ज्वालानदी वाहते !
झाडें जोडुनि पत्रयुग्मपुटलें मेघांप्रती याचती,
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती;
सारीं पाल्वती, फुलें विहरती, शोभा वरी लोळते;
एकाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !
चाले खेळ असा जगांत बहुधा; सौख्यांत सारे जरी,
एकादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी.
पाही कोण अशा हताश ह्रदया ? जो तो असे आपला.
देवा ! तूं तरि टाकि अश्रु वरुनी, त्यासाठिं तो तापला !

—गोविंदाग्रज

## ५०. फूल तें फूल !

तूं दहनभूमिंतिल पुष्प जयाला गणिशी,
तें त्याज्य कसें तें सांग एकदां मजशीं ! ध्रु०

गुण अन्य फुलांचे ह्यांत न का वद वसती,
जे रसिकां भ्रमरां दास करोनी घेती ?
नवनीतमृदुल हें स्पर्शी–नाहिं का ?
हा मोहक सौरभराशी–नाहिं का ?
हा आश्रय रसविभवाशीं–नाहिं का ?
हें अंतरंग वद भुलवीना कवणाशीं;
वद हरी न नेत्रां कवणाच्या हृदयाशीं. १

सौवर्णकोंदणीं रम्य हिरकणी दिसते,
तशि लोहमुद्रिकेवरि बसली नच खुलते.
सामान्यजनें निंदीली–ती तरि
पारखी उडी बघ घाली–तिजवरी,
चंद्रिका दिसे त्या गेली–ती खरी,
तिमिरांत आपुलें तेजच दावायाशी,
नच निसर्गसिद्धा बाध कधींहि गुणाशीं. २

पाहुनी शुक्तिला मुक्ताफल फेंकावें
कीं पंक पाहुनी कमला सोडुनि जावें ?

हें नसे वेड का सांग–तूं मला,
मम नको मानुं तूं राग–प्रेमला!
तूं उदार धरुनी वाग–वृत्तिला;
बा भारतपुत्रा! भारतांत सुमनाशीं
तूं कोठेंही बघ मान आपुलीं त्यांशीं. ३

——अनंततनय

## ५१. गर्वध्वनि

सखया मृदंग मृदु वाजविशी,
रुचला त्वदीय बहु बाज मशीं;
परि वादनांत उठतां बसतां
म्हणसी कुणास धिक तान् धिक तान् ?

तव बोल बोलति सुरेख किती,
भरण्यासही तव असे न मिती;
वरिशी किमर्थ मग बेसुरता
म्हणुनी दुजांस धिक तान् धिक तान् ?

लयकार लोक म्हणतात तुला,
असती विभूषणाचि आत्मकुला;
दिसते तथापि तव बेलयता
म्हणतां जनांस धिक तान् धिक तान्.

जग गाइ गायन, तयांत शिरूं;
चल त्यास आपणहि साथ करूं;
बघ आपली दिसत उद्धटता
वदतां जगास धिक तान् धिक तान्.

बनुंया समस्वर जगासह रे !
समताल त्यासहित होऊं बरे.
वद ठाव कोठुनि जगापरता ?
न म्हणूं म्हणून धिक तान् धिक तान्.

मनसोक्त आपण जरी फिरलों,
कवणीकडेहि जरि वावरलों,
समतासमेवरि मिळूं जगता,
न वदूं कुणास धिक तान् धिक तान् !

—साधुदास

# ५२. अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस

[ मध्यरात्रींच्या सुमाराला कोकिळेचा शब्द, विषण्ण व निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो, याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाहीं. ]

अवेळ तरिही बोल—कोकिळे—अवेळ तरिही बोल !
राञ पसरली जगतावती,
भुरके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भंवतीं,
बालचंद्रचंद्रिका घाबरी गोरीमोरी होत.

उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे जरि वरुनी हंसरी;
खिन्नताच जरि अंतरिं सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !

आनंदाच्या प्रातःकाळीं,
दिवसाच्या गजबजल्या वेळीं,
किंवा संध्या जेव्हां नटली,
आनंदाचीं गाणीं गाया गवई लाखकरोड !

असतां आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया
लागे ज्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !

परंतु जेथें उदासीनता
व्याकुल करिते विषण्ण चित्ता,
तेथें त्याला द्याया समता—
गाणें गावें, हेंच अलौकिक ईश्वरतेचें काम.

बाह्य सृष्टि जरि निद्रा भोगी,
अंतःसृष्टि तरी हतभागी,
उठते तशीच राहुनि जागी,
निजवाया तिजलागीं असलें गाणें गाई गोड !

अवेळ येथें कसली बाई ?
दुःखसांत्वना गा केव्हांही.
अनुकंपेला नियम न कांहीं.
रित्या मनीं या ओत सूर; त्यां जाऊं दे अति खोल.

वळवाचा हा वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षांतुनि अनिवार;
येतां जातां सूर काढितो भलभलते भेसूर !

खिन्न चांदणें ढगांआडचें
भग्न मनोरथ झाले ज्याचे—
हंसें जणूं तें अशा मनाचें,
पुष्पवतीच्या तोंडावरची छाया काय उदास !

या अवकाळीं—या एकांतीं
निद्रेची मिळवाया शांति
थकुनि भागुनी पडलों अंतीं,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाहीं ज्यास ?

हातीं संसाराची माती,
मनिंच्या आशा मनाच खाती;
भूतकाळचीं भूतें रडती !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !

निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भंवतीं,
विषण्ण येती विचार चित्तीं,
बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक !

गा तर चित्ता, मन रमवाया;
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणें वायां,
मशाल दिवसां लावुनि होतो लाभ कुणाला काय ?

दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई गीता,
झोंप येउं दे माझ्या चित्ता,
लक्ष लागतें सुरांकडे तव; वाटति ते बिनमोल !

पाहुनि ही तव दयाशीलता
द्रवेल कोणी भगिनी माता,

शांत कराया हताश चित्ता--
रूक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !

त्या अश्रूच्या शीतलतेनें
भोंवतालची आग जाळणें,
निद्रा घेतां शांत मनानें

'गोविंदाग्रज' ऐकत राहिल गुंगींतहि हे बोल !
कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

—गोविंदाग्रज

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६९९६
क्र. ....

# ५३. मूर्ति दुजी ती !

**परिचय** : सन १९१० मध्यें सावरकर फ्रान्समधून परत येतांच इंग्लंडमध्यें धरले गेले. लंडनच्या पोलिसचौकींत प्रथम बंद असतां इंग्लंडच्या मानानेंहि अतिशय कडक अशी थंडी पडूं लागली. त्यांतहि त्या कोठडीच्या भिंतीहि दगडी, फरशी दगडी; त्या काल्यासारख्या गार व्हाव्यात ! जवळ अंथरूण तर काय, पण पुरेसें पांघरूणहि नाहीं. दिवस रात्र पाय आपटावे, हात चोळावे, त्या पंधरा वीस पावलांच्या लांबींतच भरभर फेऱ्या घालाव्या, तेव्हां कुठें गारठून जाणारें रक्त कांहीं उष्णता पावूं शकावें. त्या भयंकर शारीरिक गारठ्याचा परिणाम मानसिक उत्साहहि गारठण्यावर होऊं नये म्हणून त्यांनीं आपल्या मनास वज्रशाली करण्यासाठीं जी विचारपरंपरा हृदयांत प्रदीप्त केली ती या कवितेंत ग्रथित केली आहे.

अपरिचित न जो तुझिया मधुर विलासा;
रम्य सरें तीं, नलिनें, नाल सुभग ते,
ते सुगंध भृंगगुंज, त्या सुमंजुला
सारंग्या, गीतें तीं गोड, गोड ती
दयित–स्मृति आलिंगन जीस तृप्तवी,
शेती ती हिरवी, आल्हादिते मळे,
सरितापुलिनोत्थ थंड तीं कलिंगडें,
मुक्त नील आकाशश्री मनोहरा,
मुक्त नील सागरतल, मुक्त वायु ते,
राजमार्गी भक्तीच्या गजर गोड वा

टाळमृदंगांचा हरिनाममत्त तो,
चंद्रबिंब शारद मेघांत धावतें,
आशा कीं रिक्त संशयांत सुखभरें:
ऐसें जें नव, संगत, मंजु, मुक्त जें
त्या त्यांतिल मधुर विलासासि जो तुझ्या
मूर्तींच्या लावण्यश्रीस वर्णिता
भाटाचि तो लंपट तव : देवि ! तोहि मी
आजि अहह इच्छितसें रूप देखण्या
तें दुजेचि तव ! तव ती मूर्ति दुजीचि !

मूर्ति मधुर ना ! परंतु ती भयंकरा
तव दुसरी घोर मूर्ति दावि ती मला !
कारण तूं बघसि का न आजि मज इथें
ऐशा ह्या लोह-पिंजऱ्यांत कोंडिला
हिंस्र कुणी पशु जैसा वध्य तसाची;
आणि ऐकशी न काय लोक पहा ते
परस्परांसि जे कथिती दावुनी मला
"असता हा हिंस्र कुणी पशुचि कीं क्वचित्
टिकता या पिंजऱ्यांत—वीर वा कुणी;
हा तो परि केवल कवि भावकोंवळा;
शोभेची मात्र वस्तु ! शयन-रंगणीं
विजयायुध वीणाची, म्हणुनि का कधीं
विजयायुध ती होई समररंगणीं ?
कसली ती कविता सुखभोग-लोलुपा

दाविल ना ह्यास इथें तोंडही पुन्हा
नसता कवि सहता तरि; हा तगेल ना ! ”

कां ? कविता काय कुणी पण्य अंगना
कीं जोंवरि उत्सवीय मनविमोहका
सुवर्णरत्नमौक्तिकांत तनु अलंकृता
तोंवरीच मात्र हात हंसत धरूं ये ?
आणि सुदैवाच्या आकस्मिका अशा
दुष्काळीं, पुष्करिणी शुष्कसलिल कीं
तेंवि रिक्तरसगव्हर हृदय तिचेंही
होउनि ती होत हात हिसडुनी दुरी ?
ना ना ना ! कुसुमसुगंधीय लाववी
तारेवरि वीणेच्या नाचती मुदें,
तींच तिचीं:होउनियां वज्र-कर्कशें
धारेवरि खड्गाच्या नाचतीं पदें !
ना ! कविता निजभक्ता त्यागिना कधीं !
भक्त तिला त्यागो, ती त्यागिना तया !

कारण कीं मूर्ति तिच्या असति दोन, ज्या
कर्तव्या अनुसरुनी रक्षिती तिच्या
पूजकासि वा प्रियासि समयिं विभिन्ना.
एक मूर्ति ती : नाचत हृदयमंचकीं
रसिकमनाची वीणा घेउनी करीं
तंतुतंतुतुनि कुशल-स्पर्श-पुलकिता
प्रेमाची वीज थरारूनि देत जे;

भावनांसि मोहन घालुनि ती करी
लोण्याहुनि कोमलशा—कोमला अशा
कीं जाव्या चांदण्यामधेंहि वितळुनी !
आणि दुजी ती : मूर्ति प्रखर जी तुझी
कविते ! घेऊनि शिरे वाण सतीचें
अहह ! हास्य करित प्रज्वलित चिताग्नी !
प्रथम मूर्ति तव; यमुना-पुलिन भिजुनि जें
चांदण्यांत शीतल त्या रात्रिं जाहलें,
त्या रात्रीं कमलनयन श्यामसुंदरा–
सहित रासलीलेमधिं गुप्त-गोडशा
हृदयाहृदयासि नाचनाचवी मुदें;
आणी आनंदाच्या किंकिणीप्रती
हास्य-लास्य-मग्न-गोपिका-हृदयांतल्या
ताल धरित मंजुळ रुणु झुणुं झुणूं झुणूं !

*　　*　　*

परि यमुना-पुलिनीं रसभरित कीं अशा
त्या कवळ्या नंदकिशोराचिया मऊ
लुसलुशीत अधरांवरि मधुर होतसे
मुरली जी, तीच अहा त्याच कोमला
अधरांवरि कर्कश रणशृंग होउनी
रणवेताळाच्या वेताळ-तांडवा
ताल पिटी भारतीय त्या रणामध्यें
“ अच्छेद्योऽयमदाह्योऽशोष्य एव च,
लोकक्षयकृत् प्रवृद्ध काळ काळ मी ! ”

दंष्ट्रा विक्राळ, गर्जं भयद कोण तो
कविते तव !--जो सहस्र वत्सरांतुनी
घुमत येत आजहिं, हें भुवन कंपवी !
--त्या छंदीं, त्या वृत्तीं, समरभीषणा
प्रकटित तव चंडमूर्ति जी तुजी अहा
देवि, आज देवो मज तीच दर्शना !
  कारण कीं भिन्नचि हें उदित आजला
कर्तव्य क्रकच-तीक्ष्ण ! आज ना असे
तन्मुद्रा स्मितशुभ्रा, वेष सौम्य ना
जरतारी थाटमाट रंगराग वा
रत्नखचित मुकुटहि तो आज ना दिसे
वाद्यें ना मंगल, ना गीत-मंजु ते
ताफे रंगेल नव तमासगिरांचे !
आज दों दिशा न पथांतूनि आवली
भवनांच्या वर्षती फुलें; न हर्षती
ललनांचे लोलनयन; गर्जतीहि ना
लोकसंघ जयजयध्वनी कृतज्ञ ते !
आजि सेवकांसि नसे पारितोषिकें
वांटित ये सोन्याचीं आमुचा धनी--
स्वयंसैनिका त्याच्या आज अवधि वा
मिळते ना क्षणही कीं स्वेच्छ विलासा
'अशिथिल परिरंभीं परिमृदितमृणाली-
-दुर्बलशा अंगकां 'सि लगटुनी कुण्या
अविदितगतयाम यामिनीसि न्यावया !

आज उलट सर्व ! उग्र, ना-हिडिस्ससा
लोखंडी जबडा वांसूनि आपला
कर्तव्य प्रकट आज ! मज चिरावया
दांतांच्या कवळ्यांच्या करवतींत दो !
दगडाहुनि निर्दय हें हृदय तयाचें
वेषही न बर्बरता झांकि अशी ही
त्याच्या अजि नंगी तरवार तनूची !
आणि बापरे थंडी ही भयंकरा !
निर्दयतेहूनि थंड थंड ! गोठलें
नदनदींत पाणी ह्या आणि शरीरीं
रक्तपिंडपिंड अहो जात थिजोनी !
या भयाण एकलकोंडींत एक ह्या
निःसहाय, निंदित, मी बघतसें स्वयें
जीवनरस नाड्यांतुनि माझिया अहा
थंड पडत जातांना ! दगडचुन्यांच्या
या नंग्या अंधाऱ्या भिंतिच्याहुनी
गार गारठा अंगीं असह्य भरुनि ये.
कारेच्या कोठडींत नागव्या अशा
नंगें कर्तव्य असें मजसि गांठतें !
आणि अधांतरिं शिखरावरति वायुच्या
संभाळुनि तोल सतत चढत धावण्या
आज्ञा मज दे ! पाठीवरति लादुनी
पर्वतसम दुर्धर सद्गर्वभार हा
राष्ट्राचा अखिलाची ! ये तरी अहा

तूंहि ! तुझ्या त्या दुसऱ्या चंडमूर्तिचें
दर्शन मज दे कवितें ! आजि दुजा तो
छेड सूर कर्कश, जो भित्रवि भैरवा !
    सूर ललित ना ! रुणुझुणु ताल-तोल ना !
आवडते ज्याचे आघात कोंवळे
हृदयकुंजिं नाचविती गोड गुलगुल्या
मंजु गीतगोविंदांतील छंद तेः
अबलांच्या अबल हृदा अधिक अबल जे
करिती ते बिल्हणीय करुण छंद वा.
परि कविते, भेरीचे सूर ते दुजे
छेड आजि अबलांच्या अबल हृदांही
करिते जे प्रबल प्रलयोर्मि सिंधुसे !
मृत्युंजय मंत्र कुणी प्रकटविल जो
मूर्ति चंडिकेची उद्दंड धावया
चंड मनोबळदाता मजसि वर अजी !
    कुरळीं जे खेळावे, केश मृदुल ते,
क्रोधानें राठ राठ उठुनियां जवें,
फुटलेल्या पेंवांतुनि सर्प कीं तसे
बुचड्यांतुनि चवताळत सुटुनि धावतीं
स्कंधीं वा वक्षीं वा पृष्ठिं वा मुखीं
विकराल क्रोधभरें अति भयंकराः
एक्या निज हस्तेंची छाटुनी स्वयें
खड्गानें आपलेंच मुंड फल तसें,
अन्या निज हस्तीं घेः आणि अहो जी

रक्ताची धार उडे वरि उफाळुनी
लाल लाल चिकट विकट त्या गळ्यांतुनी
धार तीच घट घट त्या क्रुद्ध मुखें पी
पेल्यांतुनि लाल मद्य पी जसें कुणी !
पिउनि रक्त आपुलेंचि आपुली तृषा
शांतवित्या त्या प्रचंड रौद्रभीषणा
रुंडधरा छिन्न-मुंड मूर्तिसी नमो
नमो नमः सहस्रधा प्रमत्त-नर्तने !
तूंची कर्तव्य-मूर्ति ! तूं जरी अशी
सद्यःकर्तव्यमूर्ति मद्हृदापुढें
रुंडधरा, छिन्नमुंड, खंड-कृपाणा
ऐशीची मूर्ति धरुनि, तूंहि ये करूं
कविते, या हृदयाचा पाठपुरावा !

—सावरकर

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रमांक ४८२८१ दि:
काव्य
क्रमांक १०५५ नोंद दि. २४।३।६८

## ५४. सागरास

ने, मजसी ने परत मातृभूमीला
सागरा, प्राण तळमळला ! ध्रु०

भूमातेच्या चरणतला तूं धूतां
मीं नित्य पाहिला होता;
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊं,
सृष्टिची विविधता पाहूं.
तैं जननीहृद् विरहशंकितचि झालें
परि तुवां वचन तिज दिधलें.
' मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठिं वाहीन;
त्वरित या परत आणीन ! '
विश्वसलों या तव वचनीं—मी,
' जगदनुभवयोगें बनुनी—मी,
तव अधिक शक्त उद्धरणीं—मी,
येईन त्वरें ' कथुनि सोडिलें तिजला,
सागरा, प्राण तळमळला ! १

शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं,
ही फसगत झाली तैशी !
भूविरह कसा सतत साहुं यापुढतीं,
दशदिशा तमोमय होती.
गुणसुमनें मीं वेंचियलीं या भावें
कीं तिनें सुगंधा घ्यावें !

जरि उद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा,
हा व्यर्थ भार विद्येचा.
ती आम्रवृक्ष-वत्सलता--रे,
नवकुसुमयुता त्या सुलता--रे,
तो बाल गुलाबहि आतां--रे,
फुलबाग मला, हाय ! पारखा झाला.
सागरा, प्राण तळमळला ! २.

नभिं नक्षत्रें बहुत, एक परि प्यारा
मज भरतभूमिचा तारा !
प्रासाद इथें भव्य; परी मज भारी
झोंपडी आइची प्यारी.
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा
वनवास तिच्या जरि वनिंचा.
भुलविणें व्यर्थ हें आतां--रे,
बहु जिवलग गमतें चित्ता--रे---
तुज सरित्पते, जी सरिता--रे,
तद्विरहाची शपथ घालितों तुजला,
सागरा, प्राण तळमळला ! ३.

या फेनमिषें हससि निर्दया, कैसा ?
कां वचन भंगिसी ऐसा ?
त्वत्स्वामित्वा संप्रति जी मिरविते
भिउनि का आंग्लभूमीतें,

मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी ?
मज विवासनातें देशी !
जरि आंग्लभूमिभयभीता-रे,
अबला न माझि ही माता-रे,
कथिल हें अगस्तिस आतां-रे;
जो आचमनीं एक वेळ तुज प्याला,
सागरा, प्राण तळमळला ! ४

—सावरकर

## ५५. दसरा

[ रूढीचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा ]

चला आज हा आला दसरा !
पाउल पुढतें टाकायाला,
सीमोल्लंघन करावयाला,
आनंदानें नाचायाला,
सणांमध्यें सण हाच खरा !

चौमासाला आतां विसरा !
मुसळधार तो पाउस वरला
तुडवित पायांखालीं चिखला
शेत पेरिलें येत पिकाला
येतां आनंदाचा दसरा !

पहिल्या दुभत्या गाई विसरा !
उन्हाळ्यांत त्या उडाल्याच ना ?
त्या गाईच्या खिल्लारांना
नव्या दमानें सोडा राना,
चला खाउं द्या पहाटचारा !

करा जरासा मुखडा हंसरा !
आतां कां हीं तोंडें रडवीं ?
कडवीं बीजें करी गोडवीं,
फुटलें तुटलें पुन्हांहि जडवी,
आला ना तो तुमचा दसरा

चला रूढिवर आतां घसरा !
टाकुनि सीमा मृत धर्माच्या,
दंभाच्या, या अंधपणाच्या;
जुनेपणाच्या, अहंपणाच्या;
सीमोल्लंघनकालाचि दसरा !

जुन्या मताचा जाळा कचरा !
नव्या मतांचे जे राऊत,
खरेखुरे मायेचे पूत,
येऊंद्या धैर्याला ऊत,
नका हातचा दवडूं दसरा !

नका हातचा दवडूं दसरा !
जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि,
आजकालच्या ऋषींमागुनी
जा तिकडे नेइल हा दसरा !

श्रुतिस्मृतींना आतां विसरा !
अंधभक्तिचा पांगुळगाडा
मोडुनि तोडुनिं उपडा गाडा;
पाताळीं तो नेउनि पाडा;
करा साजरा यापरि दसरा !

नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा,

जीन नको, उप्लाणी सोडा;
जेरबंद वा लगाम तोडा;
सीमोल्लंघनकालच दसरा.

जुन्यापुराण्या चिंध्या विसरा.
जरिपटका घ्या सुधारणेचा,
भगवा झेंडा नव्या मताचा,
नव्या दमानें फडकविण्याचा
मानवधर्माचा हा दसरा !

नव आशेच्या तृणांकुरांचा
तुरा शिरावर चढवा साज,
मढवा न्यायाचें शिरताज;
समचित्ताचे बरकंदाज
चला जमूं द्या जमाव तुमचा !

काळाचें मैदान अफाट,
दिसतां कोठें खंदक खांचा
द्या घोड्याला अमीन टांचा,
वाऱ्यावरच्या करवा नाचा,
कापा रस्ता आटोकाट !

चला निघूं द्या असली स्वारी;
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा
वाजवितां त्या आधीं हाणा;
घ्या कृष्णाची करीं ' तुतारी. '

रूढीच्या किल्ल्यावर स्वारी,
' अगरकरां'ची झडवा नौबत,
' भागवतां'ची धराच हिंमत,
' केशवचंद्रां 'चें ध्या चिलखत,
फुंका ' कृष्णाची 'च ' तुतारी'.

रूढीचा गड खालीं उतरा,
पाकोळ्या घुबडांना उडवा,
जिवंत सोनें अखंड लुटवा,
कृपण मनाचा रस्ता खुटवा,
असा साजरा कराच दसरा !

कसले पूर्वज घेउनि बसलां ?
होते मोठे सोन्या भरले
त्यांचें आतां काय राहिलें ?
त्यांचें त्यांच्या मागुनि गेलें.
शिक्का कायमचा तो कसला !

उगाच खाउनि बसतां हाय !
पूर्वज आले चार पावलें,
एकसारखे पुढें सरकले,
म्हणुनिच ना ते इतके आले ?
त्यांना पूर्वज नव्हते काय ?

कुंभारासारखेच लोटे
खोटें ठरतें आज तत्त्व तें,

पूर्वज संतत पुढें चालते
घायघूत ही नसती धरिते
बडे बापके तुम्ही बेटे !

रडत बैसले महारमांग,
दीनपणाला गर्वे छळतें,
अज्ञानाला भिउनी पळतें,
त्यां वर घ्याया नच जें वळतें
उच्चत्वा त्या लावा आग !

थांबा ऐका देउनि कान !
सुकल्या हातीं बाला कोमल,
तशाच विधवा करिती तळमळ
फत्तर फुटतिल येउन कळवळ
कुठला पोकळ गताभिमान !

चला उठा रे बांधा कंबर !
तुमच्यापुरती ही घी-शक्कर
टाकुनि, रूढीशीं द्या टक्कर.
युद्ध माजवा रे घनचक्कर !
फोडा कुजकें हें अवडंबर !

गेल्या धर्माचें हें भूत
पाहुनि बसलां कां रे भीत !
नव्या मतांचे भालाईत
घोडे अपुले या उडवीत,
नातरि रडते व्हा राऊत !

अंतकाळचें हें मैदान,
हिम्मतवाले चाबुकस्वार,
उत्साहाची करिं तलवार,
चित्साक्षीची ढाल तयार,
घोडा फिरवा रानोरान !

सरतां काळाचें मैदान
घोडा उडवा मग आकाशीं,
भिडवा नेउनि स्वर्गापाशीं
पूर्णपणाशीं, ईशपदाशीं,
तरीच होइल दसरा छान !

कुणी मनाचा असेल कच्चा
करील त्यालाही मनशूर
या गाण्याचे गाउनि सूर
'केशवपुत्रा'चा महशूर
'गोविंदाग्रज' चेला सच्चा !

—गोविंदाग्रज

## ५६. बेइमान कैसा होऊं

पाठविली पगडी अपुली करण्याला 'पगडी-भाई'
प्रेमाची भाषा तव जी भेदनीति केवळ तीही
निश्चय मम ढळला नाहीं परि विचार आले कांहीं !
पाजिलें जयानें दूध
त्यावरी करोनी क्रोध
ओकूं विष मी कां आज ?
स्वामित्व घालुनी फासा बेइमान होऊं कैसा ? १

उदगीरावरचा माझा तो तोफांचा भडिमार
संगीनींची चतुराई ती कडाबिनींची फैर
पाहुन जो आनंदानें 'धन्य ! धन्य !' बोले वीर
'हाय' काय त्या वदवाया--
राज्यलोभ तव पुरवाया--
दुर्लौकिक घेऊं वायां ?
जातीच्या मोहासरसा बेइमान होऊं कैसा ? २

व्यक्तीच्या स्वार्थासाठीं का देशाला बुडवावें ?
जातीच्या मोहानें का जन्मभूस हो ! रडवावें ?
नश्वर निज सौख्यासाठीं का एकीला फोडावें ?
समर्यांच परीक्षा होते
शीलाला महती येते
वाढवी अचल कीर्तीतें,
तो समय लाभतां ऐसा बेइमान होऊं कैसा ? ३

" आकाश फाडुनी खालीं  सैतान उतरुनी आला
इब्राहिम माझा असतां  कादीन भाजुनी त्याला
बसवोनी तोफेवरती  पाठवीन निज-धामाला "
हा भाऊंचा विश्वास
मजविषयीं असतां, त्यांस--
सोडाया लावूं श्वास !
हा नव्हे गारदी पेशा  बेइमान होऊं कैसा ? ४

सजलेली दाढी माझी  भरलेला पीळ जियेला
पाहुन जो हात न लावी  रुसलेल्यांच्या दाढीला
ताठ्यानें जातां जाट  जाईना परतविण्याला
माझ्या संगीनी-वरतीं
दिसते ज्याला जयकीर्ती
त्यावरीच फिरवावी ती
शिवते न कल्पना सहसा  बेइमान होऊं कैसा ? ५

कोणती बगल भिडवावी  कोणता व्यूह फोडावा ?
आणीबाणीच्या वेळीं  मनसुबा काय ठरवावा ?
बोलावुन आधीं ज्यानें  खानाचा सल्ला घ्यावा !
सरदारांचा सरदार
दिलदारांशीं दिलदार
माझ्यावर ज्याचा प्यार
विसरोनी तत्सहवासा  बेइमान होऊं कैसा ? ६

चाळितां कुराणग्रंथ स्वामीची मूर्ती दिसते !
खलिपांचीं वचनें स्मरतां तद्वचनाला आठवते !
भाऊंचे बघतां वैरी रक्ताला उसळी येते !
बंदुकिच्या नळिकेंतूनी
तोफेच्या तोंडांतूनी
उडती गोळे मैदानीं
करिती भाऊच्या घोषा बेइमान होऊं कैसा ? ७

जातीचे हिंदु असोत देशाचे बंधू माझे.
अभिमान तयांना माझा माझ्यावर त्यांचें ओझें.
कर्तव्याच्या धर्माला जागोनी कीर्ती साजे.
आज काय सांगू वर्म
शिकवीन उद्यां तुज धर्म
कीं स्वामिभक्तिचें कर्म
निरवावें स्वामि–त्रासा बेइमान होऊं कैसा ? ८

उतरोनी यमुना दिल्ली अडवून तुवां जी धरिली
दख्खनच्या वाटेवरची नाकेबंदी ती केली.
तळव्याची चढली आग मस्तकास जाउन भिडली !
दाराला लावुन पाय
बळवाया बघशी काय ?
मी होइन का निरुपाय ?
सोडून दीर्घ निःश्वासा बेइमान होऊं कैसा ? ९

होईल उद्यां उभयांचें जैं हटा-तटाचें युद्ध
इतुतूंत तुम्ही बोलाल 'दीनदीन' ऐसे शब्द
मी कर्तव्याच्या घोषें हसवीन ज्ञानी वृद्ध
गोलघुमट बांधुन पुढतीं
देऊन अराबा भंवतीं
एकदांच ती सरबत्ती
देईन घालुनी वळसा बेइमान होऊं कैसा ? १०

बरवा हा माझा मजला शोभतो शिपाई-बाणा,
मोत्यांची पगडी तूझी ही परती तुज कारितांना,
एक मूठ दारू देतों हा शूराचा नजराणा !
मुसलमान हिंदूसाठीं
घेती मृत्यूच्या गांठी
हा इतिहासाच्या पाठीं
लिहवीन लेख सुंदरसा बेइमान होऊं कैसा ? ११

—तिवारी

## ५७. पांखरास

पांखरा, गाइलें तुला कधींहि न कोणीं
न च अश्रु गाळिले कुणीं वनीं येवोनी !
निःश्वास धांवती सौख्यामागें सारे,
दुःखाचा वाली कुणा कुणीहि न बारे !
मधु सुखद उष्णता मिळतां रविरायाची
हीं पवनांदोलीं कमलें उमलायाचीं.
तेव्हांच कोकिला–मैना गातिल गाणीं,
होतील फुलें स्मरविव्हल त्या गीतांनीं.
त्या मधुर मुखींचे अश्रुमाळ चुंबीत
झुलतील फूल–पांखरें निजानंदांत.
रविवदनावरचा रंग भराभर बदले,
मम गान, सर्व सौंदर्य, सर्व हें थिजलें !
या मत्त कोकिळा गिरिकुहरीं दडतील,
कोंवळ्या कळ्या मोडोनि मान पडतील;
लवदार मनोहर वेलबुटी नवलाची
त्या काळीं कोठें नाहीं प्रगटायाची;
रवि वरतीं वरतीं चढत चढत गगनांत
अंगार भरिल या मंद शीत पवनांत.
निष्प्रेम मनाचें गाणें केविलवाणें
तें तुझें मात्र राहील तसेंच्या तैसें.
ती पूर्वतारका प्रभातरेषेवरतीं
जाशि काय उभी सौंदर्यदेवता होती;

परिधान करी ती पीतांबर कटिभागीं,
शिरिं मुकुट कळ्यांचा, त्रिलोकसुखदा मूर्ति;
हळुवार हिमाचें अवगुंठन हलवोनी
गाईल सर्व निद्रिस्त विश्व डुलवोनी.
सारून जरा कचभार बालिका पाहे,
एकेक तारका समाधिचें सुख लाहे.
निद्रिस्त भूमिला स्वप्न जणों हें दिसलें,
स्वप्नांत लाडके, सुंदर डोळे भिजले.
स्मरतांहि जया हो रोमांचाची भरती
मधु मंद अहा ती घटिका सौख्यद होती.
परि तोहि काळ तव हृदया नच सुखदायी
निष्प्रेम मनाला कोठेंही सुख नाहीं.
चुंबीत गुलाबी गाल मधुर संध्येचा
कर वरतीं आला सुंदर रविरायाचा.
जग समाधिस्थ जणुं सर्व सर्व हें होतें,
परि शांतिलेशही नव्हता ठाउक तूंतें !
बैसून कुठेंतरि कांटेरी झुडपांत
तव हूं हूं हूं चें होतें गीत वहात !
येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.
फिरवून भरारा गोफण तो झाडील
कांट्यांवर उपडें भग्न हृदय पाडील !
मग एकच धडकी, एकच अंतिम बोल
गाऊन तुझें हें जळतें हृदय निवेल !

—बालकवि

## ५८. मृतांचे आत्मे

विश्व चंद्रिकारसीं बुडालें,
प्रतिस्तब्ध चर अचरहि झालें,
आकाशाचें अंगण खुललें,
त्यावरि लाउनि निश्चल दृष्टी होतों गुंगत मी कांहीं ।
तोंच गगनपथिं दिव्यत्वाचा
प्रकाश पडला नवतेजाचा
अनंत तेजोमय गोल अहा ! अवतरले वातावरणीं ! १

हे तेजोमय गोल कशाचे ?
पुण्यात्मे हे खास मृतांचे
भूतलिं करुणामय गंगेचे–
वहावयाला लोट पातले हे गगनाच्या चौकांत !
अहो मृतांच्या पुण्यात्म्यांनो !
परंज्योतिच्या नवधामांनो !
घ्या घ्या माझे प्रणाम शतधा मी आहें तुमचा भक्त. २

काय भव्य ही तेजोमयता !
काय रुचिर ही स्निग्ध शांतता !
काय अभिनवा ही सुंदरता !
काय भूति ही ! काय दीप्ति ही ! सीमाच खरी तेजाची !
अनंतकोटि ज्योतिर्मय हे–
पूज्य–पूज्यतम गोल निघाले !
अंतरंग बहिरंग सृष्टि ही अवघी ज्योतिर्मय झाली ! ३

अहो मृतांच्या पुण्यात्मे हो !
भूवरि सत्वरि या हो ! या हो !
निबिड तमाचा नाश सपादि हो;
ही हत अवनी नवतेजोमयरसें विलेपित होऊं द्या.
पापिजनांचीं कठोर हृदयें
लिप्त जाहलीं अमित मलानें,
ओता त्यांवरि गंगा आणुनि पवित्रता त्यां येऊं द्या. ४

विश्वेशाचीं हीं संतानें
भांडति अन्योन्य स्वार्थानें,
भरून गेलीं मात्सर्यानें;
त्यांचीं हृदयें भरा प्रीतिनें हे तेजोमयगोलांनो !
जिकडे तिकडे एकत्वाचीं
गाणीं व्हावीं मधुररसाचीं
एथुनि तेथुनि आनंदमयध्वनिनादित हें जग होवो ! ५

तो विंध्याचल, तो गिरनारहि
गंगा सलिलस्निग्ध हिमाद्री,
माझा मंगल तो सह्यगिरी,
या साऱ्यांचा वसंत-राजा कदापि लोपुनि नच जावो.
त्यांच्या वेली पुष्पित व्हाव्या,
फलभारें तरुपांक्ति लवाव्या,
सरोवरांचा भाग एथला सदाहि हांसत तो राहो. ६

जैशी गंगा निजतेजानें
पावन करिते सुरसंघातें,
तसेच सारेही हे ओढे–
किमपि तेज निजजळीं धरोनी करोत पावन या विश्वा.
हिरवीं कुरणें, मृदुतर हिरवळ
कोमल पुष्पें, स्निग्धसलिल रस
पाठिं, पुढें, वर, अधोभागिंही वसोत पूज्यांनो ! अमुच्या ! ७.

चंडोलानें गाणें गावें,
भारद्वाजें ताला द्यावें,
शिखंडिनें सोन्मद नाचावें,
त्या गाण्यांतिल मधुस्निग्ध रस जगीं झऱ्यांनीं वितरावा.
प्रेम त्यांतलें संव्यादेवी,
हुडकुनि घेवो निजमंगलकारिं
भूगोलाचा पृष्ठभाग तो प्रणयसुरंजित करो सदा. ८

काळोखाची भीषण रजनी
केवल आहे जी पापखनी
तीवर मंगलरस अभिषेचुनि
तीस तापसी करा मृतांच्या आत्म्यांनो ! सत्वरि आतां.
तीच्या गाण्यांतिल भेसुरता
लोपुनि जावो हां हां म्हणतां
स्निग्ध चांदण्या रात्रीची ती खरीच होवो अतां स्वसां ! ९

असंख्यात ही घोर भुतावळ
व्याप्त जाहलें तिनें भूमितल,
मानवभक्षक दुष्ट अराजक,
सर्व भुतांना या गाडोनी टाका मंत्रांनीं अपुल्या;
दयामय प्रभु अमुचा राजा,
आशीर्वचनें तयास वितरा,
सांगोपांग शांतिदेवता सदा करो एथें क्रीडा. १०

नवतेजोरस जिकडे तिकडे
वाहो वरतीं, खालींहि पुढें
पाप ध्वंसुनि मांगल्याचे—
अहा ! लोटचे लोट भराभर मानवहृदयीं वाहोत.
जातिनिबंधन 'मी तूं' भाषण
दंभ सर्व हे जावो लोपुन
सत्यदयांकित सद्धर्माचा ध्वज फडको आतां एथ. ११

उच्च नीच हा कल्पित भेद
विरोनि जावो सर्व अपाप
परस्परांच्या हातीं हात
घालुनि मनुजप्राणी आतां प्रभुला सूक्तावलि गावो !
पुष्पसुगंधित–पवनासंगें
डुलोत अवघीं वनें, उपवनें
आक्रंदनरव विरोनि सारा हास्याची गंगा वाहो ! १२

पुण्यमृतांच्या आत्म्यांनीं हीं–
मृतात्मसूक्तें मी रचिलेलीं–
देवोनी निजलक्ष्य ऐकिलीं,
"शांतिः शांतिः शांतिं" म्हणुनि ते निघोनि गेले स्वर्लोकीं.
दग्धहृदय मम त्या योगानें
सबाह्य भरलें आनंदानें,
त्या आत्म्यांचें करित करित मनिं चिंतन गेलों मग झोपीं. १३

—नागेश

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...e 2 e 9..... वि ... ८१८८
क्रमांक ...... ९।८।८५ ..... नों वि २५३१९८

# .५९. निजूं दे स्वस्थपणें आतां !

लागले मिटाया डोळे निजूं दे स्वस्थपणें आतां.
किति शीण पहा मज आला, सर्वही पांगुळलीं गात्रें.
संपला दिवस जाइल हा दिवाकर अस्ता क्षणमात्रें.
अंकावर तुझिया पडतों अश्रु पण आवर हे आई !
या तुझिया सुसकाऱ्यांनीं झोंप मज येत गडे नाहीं.
वाजते बघ किती थंडी पसरला अंधकार भंवतीं;
पण मिटतां डोळे, दिसते एक मज तेजस्वी मूर्ती !
हें ऐक ! ऐक संगीत चहुंकडे घुमती स्वरलहरी.
फुलमाळ गळ्यांतिल त्याच्या कसा बघ मधुरगंध पसरी.
पण किती होय जड माथा, निजूं दे स्वस्थपणें आतां !

किति गोड ! गोड हें गाणें कां न ये ऐकूं तें तुजला ?
मिळतात अशीं स्वर्गांत गायनें ऐकाया सकलां.
हा देवदूत फुलमाळा घेउनी आला बघ आई !
खुणवितो मला, तो इच्छी मजसवें बोलाया कांहीं.
हांसतो हळुच कुजबुजतो, कुणाही पाहि न मजवीण.
किती तेज बघ तरी त्याचें ! असे हा सांग तरी कोण ?
झगमगे मुगुट किती त्याचा मलाही मिळेल का असला ?
तो म्हणतो ‘ आपण देतों ’ जाउं का आई घ्यायाला ?
पण किती होय तनु गलिता ! निजूं दे स्वस्थपणें आतां !

हें काय गडे ! मज ऐशी
मारिसी घट्ट मिठी सांग ?
कां सुसकारे ? कां अश्रू ?
कां तुझें कांपतसे अंग ?
लागती गार किती गाल,
क्षणभरें भारिच धगधगती.
मज बघसि अशी निरखून
घेउनी काय बरें चित्तीं ?
तूं माझी—माझिच आई !
रडुं नको, पूस बघूं डोळे.
बघ तिकडे, झाली सारी
घाबरीं तीं चिमणीं बाळें !
अगदीं न बोलवे मजला,
जीभ कां न कळे उचलेना;
पण नको काळजी; निजवी
घेउनी देवदूत ताना.
फिरविं तूंहि तनुवरि हाता,
निजूं दे स्वस्थपणें आतां !

—रेंदाळकर

# ६०. राजहंस माझा निजला !

[ पतिनिधनानंतर अल्पावधींतच वापडीवर एकुलत्या एक मुलाचें निधन पाहण्याचा प्रसंग आल्यावर असा भ्रम कां होणार नाहीं ? ]

हें कोण बोललें बोला ?
'राजहंस माझा निजला ?' ध्रु०

दुर्दैवनगाच्या शिखरीं नवविधवा दुःखी आई ।
तें हृदय कसें आईचें मी उगाच सांगत नाहीं !
जें आनंदेंहि रडतें दुःखांत कसें तें होई—
हें कुणीं कुणां सांगावें ।
आईच्या बाळा ठावें !
प्रेमाच्या गांवा जावें—
मग ऐकावें या बोला 'राजहंस माझा निजला !' १

मांडीवर मेलें मूल तो हृदया धक्का बसला.
होउनी कळस शोकाचा भ्रम तिच्या मानसीं बसला.
मग हृदय बधिरची झालें अति दुःख थिजवि चित्ताला.
तें तिच्या जिवाचें फूल.
मांडीवर होत मलूल !
तरि शोकें पडुनी भूल.
वाटतची होतें तिजला 'राजहंस माझा निजला ! २

जन चार भोंवतीं जमले मृत बाळा उचलायाला,
तों काळ नाथनिधनाचा हतभागि मना आठवला,
तो प्रसंग पहिला तसला हा दुसरा आतां असला;
तें चित्र दिसे चित्ताला !
हें चित्र दिसे डोळ्यांला !
निज चित्र चित्तनयनांला,
मग रडुनि वदे ती सकलां 'राजहंस माझा निजला ! ३

करुं नका गलबला अगदीं लागली झोंप मम बाळा.
आधींच झोंप त्या नाहीं खेळाचा एकच चाळा.
जागतांच वाऱ्यासरसा खेळाचा घेइल आळा.
वाजवूं नका पाऊल,
लागेल तया चाहूल,
झोंपेचा हलका फूल;
मग झोंपायाचा कुठला ? राजहंस माझा निजला ! ४

हें दूध जरासा प्याला आतांसा कोठें निजला.
डोळ्याला लागे डोळा कां तोंच भोंवतीं जमलां ?
जा ! नका उठवुं वेल्हाळा मी ओळखतें हो सकलां !
तो हिराच तेव्हां नेला,
हिरकणीस आतां टपलां;
परि जिवापलिकडे याला
लपवीन ! एकची मजला ! राजहंस माझा निजला ! ५

कां असलें भलतेंसलतें बोलतां अमंगळ त्याला ?
छबकड्यावरुनि माझ्या या ओंवाळुनि टाकिन सकलां.
घेतें मी पदराखालीं पाहूंच नका लडिवाळा !
मी गरीब कितिही असलें,
जरि कपाळ माझें फुटलें,
बोलणें तरी हें असलें
खपणार नाहिं हो मजला राजहंस माझा निजला ! ६

हें असेंच सांगुनि मागें नेलात जिवाचा राजा !
दाविलाहि फिरुनी नाहीं नाहींत का तुम्हां लाजा ?
न्यावयास आतां आलां राजहंस राजस माझा !
हा असा कसा दुष्टावा ?
कोणत्या जन्मिचा दावा ?
कां उगिच गळा कापावा
पाहुनी गरिब कोणाला राजहंस माझा निजला ! ७

हे काळे कुरळे केश खेळतात डोक्यावरती,
ही दृष्टि पहा मम वदनीं नेहमीं अशी ही असती;
हें तेज अशा रत्नाचें झालें का आहे कमती ?
कानांत नाचती डूल,
तोंडावर हंसरें फूल,
जीवाची घालुनि झूल
मी असाच झांकिन याला राजहंस माझा निजला ! ८

या अर्ध्या उघड्या नयनीं  बाळ काय पाहत नाहीं ?
या अर्ध्या उघड्या तोंडीं  बाळ काय बोलत नाहीं ?
अर्थ या अशा हंसण्याचा  मज माझा कळतो बाई !
हें हंसें मुखावर नाचे,
जणुं बोल दुग्धपानाचे !
कीं मुक्या समाधानाचे;
इतुकेंहि कळे न कुणाला  राजहंस माझा निजला ! ९

या माझ्या मानससरसीं  सारखें प्रेमजल वाही,
त्या तरंगलहरींवरती  राजहंस पोहत राही,
सारखा पोहुनी दमला  मग मला भुकेला बाही !
नयनांच्या शिंपांमधुनी,
अश्रूंचे मौक्तिकसुमणी,
मीं दिले तया काढोनी,
मोत्यांचा चारा असला  राजहंस खाउनि निजला ! १०

ते वैकुंठेश्वर गेले  पदिं त्यांच्या अर्पायाला
ही अखंड या अश्रूंची  वैजयंति मोहनमाळा
मी करित असें केव्हांची  धरुनियां उराशीं बाळा.
कौस्तुभ हा माळेमधला,
हृदयाचें कोंदण याला,
तो चोराया का आलां ?
दैत्याहुनि दैत्यचि झालां  राजहंस माझा निजला ! ११

हें असें जाहलें म्हणतां     तरि देवचि निजला का हो ?
जरि निर्दय होउनि निजला  आळवीन फोडुनि टाहो,
कीं असा पोटचा गोळा     पोटांतचि देवा राहो !
हा कुऱ्हाड आकाशाची
मजवरती पाडायाची,
नाहींच कल्पना त्याची,
हा तुमचा कावा सगळा     राजहंस माझा निजला !   १२

जरि दूत यमाचे आले     लाडक्यास या न्यायाला,
ते निष्ठुर असले तरिही     भुलतील पाहुनी याला.
हृदयाचें होउनी पाणी     लागतील चुंबायाला.
मी मुका असा घेतांना
हा पहा–पुन्हां हंसलाना ?
कां अशा फिरवितां माना ?
सुख खुपे काय डोळ्यांला   राजहंस माझा निजला !   १३

हें सर्वस्वाचें फूल     त्याभंवतीं झाला गोळा.
मी बघतें–कधिंचा आहे   त्यावरती तुमचा डोळा.
एकदां करावा त्याचा     वादानें चोळामोळा !
सर्वांच्या मनिंचा लाहो,
हाच ना ? स्पष्ट बोला, हो,
मी इतकी वेडी का हो
कीं हेंहि कळेना मजला ?   राजहंस माझा निजला !   १४

जरि होउं नये तें झालें तरि सोडणार या नाहीं.
पाळणाहि रुततो ज्याला प्रेमें जरि निजवी आई,
तो देह खांच दगडांत- छे: ! नको नकोग बाई !
हृदयाची खणुनी खांच
झांकिन मी बाळ असाच;
दु:खांचे फत्तर साच !
जा ! जाउनि सांगा काळा राजहंस माझा निजला ! १५

जरि काळाचाही काळ बाळाला न्याया आला,
तरि नाहीं मी धायाची या जीवाच्या जीवाला !
सारखीं गाउनी गाणीं निजवीन कल्पवर याला.
जा ! करा आपुलें काळें !
माझेही दमले डोळे;
प्राणांचें पसरुनि जाळें
मी निजतें घेउनि याला ! राजहंस माझा निजला !" १६

* * *

सांगुनी असें सकलांशीं मृत बाळ उराशीं धरुनी
तन्मुखीं स्वमुख ठेवोनी चुंबिलें एकदां फिरुनी;
पाहिलें नीट निरखोनी झणिं तीही गेली निजुनी !
मग पुन्हां कधीं ती उठली,
जाणीव कुणा ही कुठली !
परि मति या प्रश्नें हटली
"बोललें कोण या बोला राजहंस माझा निजला !" १७

मग मातापुत्रांवरि त्या    तरु गाळिति कोमल पानें;
ढाळिती लता निज सुमनें    पशुपाक्षिहि रडती गानें;
दशदिशा दगडही कढती    मन दुभंगुनी शोकानें.
दुमदुमतें स्थळ तें अजुनी
त्या एकच करुणागानीं;
जा जाउनि ऐका कानीं !
ऐकाल याच बोलाला    " राजहंस माझा निजला !" १८

—गोविंदाग्रज

## ६१. माझें मृत्युपत्र

**परिचयः** १९१० च्या मार्चमध्यें सावरकर विलायतेंत पकडले गेले. तेव्हां या जन्मांत जिची पुन्हा भेट होणें जवळ जवळ असंभवनीय झालेलें होतें त्या आपल्या पूजनीय वहिनीस आपल्या अटकेच्या वृत्तकथनाचा कुठारघात करण्याचें कटुकर्तव्य करतांनाच त्यांतील उदात्त आकर्षक दिव्य मर्म व्यक्त करण्यास्तव सावरकरांनीं लंडनमधील ब्रिक्स्टन जेलमधून आपल्या या जन्मांतला बहुधा शेवटचा होऊं पहाणारा हा निरोप–हें मृत्युपत्र-लिहून धाडिलें होतें.

१

वैशाखिंचा कुमुदनाथ नभांत हांसे,
यच्चांद्रिका धवल सौधतलीं विलासे;
घाली स्वयें जल जिला प्रिय बाल लोभें
ज़ाई फुले, परिमलें सुमनांत शोभे;

आले घरीं सकल आप्त-सुहृद् जिवाचे,
आनंदमग्न कुल गोकुळ काय साचें!
आदर्श दीप्ति-शुचिता-धृति-यौवनांचें
पाहूनि जें तरुणमंडळ, कीर्ति नाचे;

प्रेमें हृदें विकसलीं नव यौवनाच्या
गंधें सुवासित उदात्त सुसंस्कृतीच्या
दिव्या लता-तरुंसि जें गृह बाग झाला
ज्या पौर हर्षित वदे जन ‘ धर्म-शाला ’;

सैंपाक त्वां निजकरें कुशलें करावा,
प्रेमें तुझ्या अधिकची सु-रसाल व्हावा;
संवाद सर्व मिळुनी करितां नितांत
जेवावयासि बसलों जइं चांदण्यांत,

श्रीरामचंद्र-वनवास-कथा रसाला,
कीं केविं देश इटली रिपुमुक्त झाला,
तानाजिचा समरधीर तसा पवाडा,
गावा चितोरगड वा शनवारवाडा.

झाली कशी प्रियकरा अपुली अनाथा
दुर्दास्यखिन्न शरभिन्न विपन्न माता,
शोकें विवंचुनि तिच्या जइं मोचनाचे
केले अनंत तरुणां उपदेश साचे,

झाल्या तदा प्रियकरांसह आणभाका
त्या सर्व देवि वहिनी, स्मरती तुम्हां का?
'बाजी प्रभू ठरूं' वदे युवसंघ सर्व;
'आम्ही चितोरयुवती' युवती सगर्व.

कीं घेतलें व्रत न हें अहि्ं अंधतेनें;
लब्धप्रकाश इतिहास-निसर्ग-मानें
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें,
बुद्ध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें!

२

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका
त्यांतें स्मरोनि मग सांप्रत हें विलोका

नाहीं पुरीं उलटलीं जरि आठ वर्षें
तों कार्यसिद्धि इतुकी, मन कां न हर्षे ?

आसेतु-पर्वत उचंबळला प्रदेश,
वीराकृती धरित टाकुनि दीनवेष,
भक्तांचिया रघुपदीं झुलताति झुंडीं,
जाज्वल्य होयहि हुताशन यज्ञकुंडीं.

तो यज्ञ सिद्ध करण्यास्तव उग्र दीक्षा
जे घेति येइ तइं तत्कृतिची परीक्षा;
" विश्वाचिया अखिल मंगल-धारणाला
बोला असे कवण भक्ष्य हुताशनाला ? "

आमंत्रण प्रभु रघूत्तम सोडितां हें
दिव्यार्थ, देव ! अमुचें कुळ सज्ज आहे.
हे साध्वि, गर्जुनि असें पहिल्या हवीचा
हा ईश्वरीं मिळविला अम्हि मान साचा.

'धर्मार्थ देह' वदलों, ठरलें नितांत;
ते बोल फोल नच बालिश बायकांत;
ना भंगली भिउनियां धृति यातनांना
निष्काम-कर्मरति योगहि खंडिला ना !

ज्या होति तैं प्रियजनांसह आणभाका,
केल्याचि सत्य कृतिनें अजि ह्या विलोका !
दीप्तानलांत निजमातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलों कृतार्थ !

३

हे मातृभूमि ! तुजला मन वाहियेलें,
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेलें;
तूतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला,
लेखाप्रती विषय तूंचि अनन्य झाला.

त्वत्स्थंडिलीं ढकलिलें प्रिय मित्रसंघा,
केलें स्वयें दहन यौवन-देह-भोगां;
त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवा,
तत्सेवनींच गमली रघुवीर-सेवा.

त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृहवित्तमत्ता,
दावानलांत वहिनी नवपुत्रकान्ता;
त्वत्स्थंडिलीं अतुल-धैर्य वरिष्ठ बंधु,
केला हवी परमकारुण पुण्यसिंधु.

त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाल झाला,
त्वत्स्थंडिलीं बघ अतां मम देह ठेला.
हें काय, बंधु असतों जरि सात आम्ही,
त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मीं !

संतान या भरतभूमिस तीस कोटि,
जे मातृभक्ति-रत सज्जन धन्य होती;
हें आपुलें कुलहि त्यांमधिं ईश्वरांश
निर्वंश होउनि ठरेल अखंड-वंश.

४

कीं तें ठरोहि अथवा न ठरो, परंतु
हे मातृभू ! अम्हि असों परिपूर्ण-हेतु;
दीप्तानलांत निज-मातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलों कृतार्थ.

ऐसें विवंचुनि, अहो वहिनी ! व्रतातें
पाळोनि वर्धन करा कुल-दिव्यतेतें.
श्रीपार्वती तप करी हिमपर्वतीं ती
कीं विस्तवांत हसल्या बहु राजपूती.

तें भारतीय अबला-बलतेज कांहीं
अद्यापि या भरतभूमिंत लुप्त नाहीं
हें सिद्ध होइल असेंचि उदार उग्र
वीरांगने, तव सुवर्तन हो समग्र.

माझा निरोप तुज येथुनि हाच देवी !
हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी;
सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हांतें,
आलिंगन प्रियकरा मम अंगनेतें;

कीं घेतलें व्रत न हें अम्हिं अंधतेनें,
लब्ध-प्रकाश इतिहास-निसर्ग-मानें
जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें,
बुद्धयाचि वाण धरिलें करिं हें सतीचें !

—सावरकर

## ६२. यमाचे दूत

बोलवितात। विक्राळ यमाचे दूत !

गिरिशिखरावर आ पसरोनी,
काळ्या अंधारांत दडोनी,
किंवा पडक्या बुरुजावरुनी,
शब्द येतात। 'चल नको बसूं जगतांत'.

खोल खोल भेसुर दरडींत,
पडक्या घोर जुन्या विहिरींत
उगवुनि पिंपळ वर येतात
ते म्हणतात। 'चल जगांत दुसऱ्या शांत.'

परिस्थितीचीं कठोर भूतें
क्षणांत करिती शून्य मनातें,
पूर्वस्मृति मग ताजी होते,
जळतें त्यांत। हृदयाचें होउनि भूत.

क्षणभर सांपडतां एकांत
विचारलहरी उद्भवतात,
विझते प्रेमाशांची ज्योत,
पेट घेतात, हे असंख्य वणवे आंत.

पुस्तक वाचायाला घ्यावें,
कवितेनें कीं मन रमवावें,
सृष्टीचें सौंदर्य बघावें,
हृदयीं तों तों । हा विकार दृढतर होतो.

वेडें भूत बनोनी जावें,
लिहिलें दैवीं काय असावें,
न कळे तोंड कुठें लपवावें,
कां छळतात । हे असे यमाचे दूत ?

धांव, धांव सदया जगजेठी !
दया करी रे दीनावरतीं,
आशा तुजवाचुनिया परती
नुरली कांहीं । जननी गे, धावुनि येई.

— बालकवि

## ६२. अजुनि चालतोंचि वाट

अजुनि चालतोंचि वाट, माळ हा सरेना !
विश्रान्तिस्थल केव्हां यायचें कळेना !
त्राण न देहांत लेश, पाय टाकवेना,
गरगर शिर फिरत अजी होय पुरी दैना !
सुखकर संदेश अमित पोंचविले कोणा,
भार वाहुनी परार्थ जाहलों दिवाणा !
कांव्यांवरि घातलाचि जीव तयासाठीं,
हंसवाया या केली किति आटाआटी !
हेंच खास माझें घर म्हणुनि शीण केला,
उमगुनि मग चूक किती अश्रुसेक झाला;
दिन गेले, मास तसे वत्सरेंहि गेलीं,
निकट वाटतें जीवनसंध्या ही आली !
कुठुनि निघालों, कोठें जायचें न ठावें,
मार्गांतच काय सकळ आयु सरुनि जावें !
काय निरुद्देश सर्व जीवन मम होतें ?
मरुसरितेपरि अवचित झरुनि जायचें तें ?
पुरे ! पुरे ही असली मुशाफरी आतां,
या धूळिंत दगडावर टेकिलाच माथा !

—रेंदाळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रमांक ८४७ ........ वि ........
........ नों दि ........

# कविपरिचय

( संग्रहांत आलेल्या कवितांच्या क्रमानें कवींचा परिचय दिलेला आहे. )

## रेंदाळकर

केशवसुतानंतर जे नवीन कवि उदयास आले त्यांत रेंदाळकरांचें स्थान महत्त्वाचें व सन्मानाचें आहे. गोविंदाग्रजांच्या समकालीनांतील ते एक अग्रेसर कवि होते. केशवसुतांची अखेर आणि गडकरी–बालकवींचा उदय या दोहोंच्या मध्यकालांत रेंदाळकर यांचीच कविता विशेष लोकप्रिय होती. पहांटेच्या काळोखांत तेजःपुंज वाटणारी तारका उषःकालच्या प्रकाशांत हतप्रभ व्हावी, अशी कांहींशी अवस्था पुढील काळांत या कवीची झालेली दिसते. रेंदाळकरांच्या कवितेबद्दल वेगवेगळे विरोधी अभिप्राय टीकाकारांनीं व्यक्त केले आहेत. केशवसुतांच्या परंपरेचे पुढीळ काळांतील एकमेव नेते रेंदाळकर हेच होते, येथपासून रेंदाळकर हे कवि नव्हते, केवळ पद्यलेखक होते, येथपर्यंत या अभिप्रायांचा विस्तार आहे. परंतु हे दोन्ही पक्ष अतिशयोक्त आहेत. यांतील सत्य, नेहमींप्रमाणें कोठेंतरी मध्यें आहे.

रेंदाळकर हे कोल्हापूरजवळील रेंदाळ या गांवचे राहणारे. इतर अनेक कवींप्रमाणें रेंदाळकरांच्या कपाळावरहि दारिद्र्याची तप्त मुद्रा जन्मापासूनच मारलेली होती. त्यांचें शालेय शिक्षण फारसें झालें नाहीं. परंतु त्याची भरपाई त्यांनीं स्वतः वाचन आणि व्यासंग करून केली. नवल असें कीं, प्रारंभींच्या संस्कारक्षम काळांत त्यांनीं वाचन-मनन केलें तें जुन्या मराठी आणि अभिजात संस्कृत साहित्याचें. संस्कृत भाषेवर त्यांचें चांगलेंच प्रभुत्व होतें. पुढें व्यवसायानिमित्त मुंबई-पुण्याकडे आल्यावर त्यांनीं इंग्रजी व बंगाली या भाषांचा अभ्यास केला आणि त्यांतील काव्याचेंहि अभ्यासपूर्वक वाचन केलें. मित्रांच्या सुप्रसिद्ध ‘ मनोरंजन ’ मासिकामध्यें ते कांहीं वर्षें नोकरीस होते. संस्कृत, बंगाली आणि मराठी या तिन्ही भाषांतील काव्यपरंपरांचा त्यांच्या लेखनावर परिणाम झालेला आहे यांत शंका नाहीं. संस्कृत साहित्याचा परिणाम त्यांच्या शैलीवर झालेला आहे. बंगालींतील

मधुसूदन दत्त हे त्यांचे विशेष आवडते कवि होते. त्यांच्या कित्येक काव्यांची त्यांनीं रूपांतरें केलीं आहेत. परंतु जुन्या काव्याचे गाढ संस्कार असूनहि ते तत्कालीन पंडित कवींच्या रांगेंत जाऊन दाखल झाले नाहींत. उलट मराठी काव्यांतील आधुनिक परंपरेचा त्यांनीं आत्यंतिक निष्ठेनें स्वीकार व प्रचार केला. याचें मुख्य कारण म्हणजे केशवसुतांची कविता हें होय. हा प्रवाह त्यांच्या प्रतिभा–प्रकृतीशीं अधिक जुळता होता. तोच आदर्श त्यांनीं आपल्यापुढें ठेवला. केशवसुतांस उद्देशून ते म्हणतात.

गंगौघापरि भव्य केशवसुता, सावेश वाणी तुझी,
आहे साथ करावयास बसलों राहून मागें तुझ्या—

अशी ' साथ देण्याची ' विनम्र वृत्ति त्यांनीं काव्यलेखनांत स्वीकारली आहे. आर्थिक आपत्ति, एकलेपणा, प्रेयनिराशा, लौकिक आशा, अपेक्षांची असफलता वगैरे दुःखांनीं त्यांचें वैयक्तिक जीवन जखमी केलेलें होतें असें दिसतें. या सर्वांची दाट छाया त्यांच्या काव्यावर पडलेली आहे. सुखाची आणि आपली कधीं गांठ पडणारच नाहीं असें त्यांना वाटत असे.

कुठेंहि गेलों तरी कसें
सुख हतभाग्या लाभेल ?
कितिहि धावली ही रजनी
तरि रवि तिज का भेटेल ?

रेंदाळकर गडकऱ्यानंतर एक वर्षानें, म्हणजे इ. स. १९२० मध्यें निवर्तले. तेव्हां त्यांचें वय अवघें तेहतीस वर्षांचें होतें. गडकरी व बालकवि या समकालीनांच्या मानानें त्यांचें काव्यलेखन फार विपुल आणि विविधतापूर्णहि आहे.

काव्यांतून प्रकट होणारें कवीचें व्यक्तित्व बव्हंशीं व्यथित आणि निराशाग्रस्त असेंच आहे सौंदर्य, सुजनता, प्रेम, न्याय वगैरे जीवनतत्त्वांवर कवीची गाढ श्रद्धा आहे. परंतु सभोंवतीं असलेल्या मानवी संसारांत या तत्त्वांचा आढळ तर होत नाहींच, परंतु पदोपदीं त्यावर आघात केले जातात या जाणिवेनें व अनुभवानें त्यांचें अंतःकरण विद्ध झालेलें आहे. खरी कविवृत्ति ही कमलपुष्पांतील मकरंद सेवन करणाऱ्या मधुकराप्रमाणें केवळ सौंदर्यशोधनाची. त्याच्या जगामध्यें

द्वेष, दुर्जनता, स्वार्थ, अनुदारता, अन्याय वगैरे गोष्टींना अवसरच नाहीं. परंतु व्यावहारिक जगांत तर याच अनिष्टांचें प्राबल्य! हा विरोध पाहून रेंदाळकर वैतागानें म्हणतात,

कवींना राहाया अनुचित असे ही वसुमती
तुझी आज्ञा देवा, म्हणुनि जगिं कर्तव्य करतों
परी औदास्यानें सतत हृदय व्याप्तचि असे !

परंतु ह्या निराशेंतून उद्‌भवलेल्या अल्पकालीन मनःस्थितीमुळें कवीच्या अवतारकार्याचा प्रस्तुत कवीला विसर पडलेला आहे असें नाहीं. या बाबतीत त्यांची भूमिका केशवसुतांसारखीच आहे. ' माझें गाणें कुणासाठीं ' या प्रश्नाचें उत्तर, तें केवळ माझ्या मानसदेवीसाठीं आहे, तिथें जगाचा संबंध नाहीं, भलें-बुरें म्हणण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं, असें रेंदाळकर देतात. परंतु काव्य-निर्मितीशीं जगाचा संबंध नसला तरी निर्माण झालेल्या काव्याशीं मात्र आहे. कवि स्वतःच्या समाधानासाठीं निर्माण करीत असलेलें काव्य अखेर जगाचें कल्याण करतें.

कवि स्वर्गांतूनी भुविं परसुखार्थें उतरले
लोकीं कवीच नसते तर शून्य सारें
आनंद ओतति कवि स्ववचःप्रसारें !

काव्य आणि जीवन या संबंधींचा रेंदाळकरांचा दृष्टिकोन केशवसुतांशींच बराचसा मिळता असला तरी दोन गोष्टींत त्यांनीं केशवसुतांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला. बंधनातीत व अतिउदात्त अशा प्रेमाची कल्पना ( Platonic Love ) त्यांनीं आपल्या काव्यांतून मांडली आणि काव्यहि शक्य तेवढें बंधमुक्त असावें या भावनेनें निर्यमक पद्याचे प्रयोग केले. यमक हें पद्याचें आवश्यक अंग म्हणूनच मराठींत रूढ झालेलें असल्यामुळें रेंदाळकरांचे हे प्रयोग फारसे यशस्वी झाले नाहींत. पुढील काळांत यमकाचें बंधन सुटण्यासाठीं पद्याचेंच बंधन सुटावें लागलें. परंतु काव्येतिहासांत रेंदाळकरांच्या या प्रयोगांना मोठें महत्त्व आहे यांत संशय नाहीं.

रेंदाळकरांत भावनोत्कटता असली तरी तिचा आविर्भाव पुरेसा रसपूर्ण होत नाहीं. कल्पकता मर्यादित असल्यानें पूर्वसंकेतांत गुरफटून राहण्याची वृत्ति जागोजाग दिसते. शब्दांवर प्रभुत्व आहे, पण त्यांत प्रसन्नता कमी आढळते. या गुणदोषांमुळें रेंदाळकरांचें काव्य कधीं जमिनीवर सरपटत नाहीं त्याचप्रमाणें अंतराळांत उंचवर भरारीहि मारूं शकत नाहीं.

## रणदिवे

कवि दत्तात्रेय भिमाजी रणदिवे ( जन्म १८८०, मृत्यु १९२९ ) नव्या-जुन्याच्या सीमारेषेवर असणाऱ्या कवींत रणदिवे यांचा समावेश करावा लागेल. कांहीं दीर्घ कथात्मक कविता, तर कांहीं स्फुट भावगीतें; कांहीं पौराणिक वा धार्मिक स्वरूपाची, तर कांहीं अगदीं लौकिक विषयांवरील; कांहीं अक्षरगण वृत्तात्मक, तर कांहीं नवीन मात्रावृत्तामधील; कांहीं उघड बोधपर, तर कांहीं केवळ भावाविष्कारात्मक; कांहीं मोरोपंती थाटाची, तर कांहीं टिळक-बाळ-कवींसारखी अशी संमिश्र स्वरूपाची कविता रणदिवे यांनीं लिहिली. स्वतः जैनधर्मीय असल्यानें त्या धर्मांतील कांहीं पौराणिक कथा त्यांनीं श्रद्धेनें काव्यांत ग्रथित केल्या, तथापि केशवसुतादि कवींइतकेच ते सुधारणेस अनुकूल होते. आपल्या या मतांमुळें त्यांना स्वधर्मीयांकडून कांहीं काल बहिष्कारहि सहन करावा लागला. लेखन हाच एक उपजीविकेचा मार्ग ठरल्यामुळें काव्या-शिवाय कादंबरी व वर्तमानपत्रीं लेखन या स्वरूपाचें वाङ्मयहि त्यांना लिहावें लागलें असलें, तरी त्यांचा मूळ पिंड कवीचाच होता. त्यांच्या दीर्घ कवितेंत संस्कृतप्रचुरता बरीच आहे, तरीहि तीमध्यें सहजता आणि प्रसाद सर्वत्र आहे. मुग्ध व संयत शृंगार हा त्यांच्या स्फुट प्रेमकवितेचा विशेष होय हें या संग्रहां-तील त्यांच्या कवितेवरून कळून येईल. परंतु सर्वच प्रकारच्या विषयांकडे सारखेंच अवधान पुरविल्यामुळें त्यांच्या कवितेस वैशिष्ट्य आणि पृथगात्मता लाभली नाहीं व समकालीनांस कवि म्हणून ते कितीहि परिचित असले तरी आजच्या काव्यप्रेमी रसिकास त्यांची कविता अपरिचित राहिली आहे.

# साधुदास

केशवसुतानंतरच्या काळांत जुन्या काव्याची परंपरा निष्ठेनें पुढें चालू ठेवणाऱ्या कवींत सांगलीचे कवि साधुदास हे एक प्रमुख होत. त्यांचें संपूर्ण नांव गोपाळ गोविंद पाटणकर असें आहे. ( जन्म १८८४—मृत्यु १९४७ ). साधुदास हे शाळेंत हुशार विद्यार्थी म्हणून गणले जात. प्रवेशपरिक्षेनंतर ते पुण्यास कॉलेजांत गेले. परंतु ' बुद्धिबळा 'च्या अनिवार छंदामुळें त्यांचें कॉलेजशिक्षण अर्धवटच राहिलें. बुद्धिबळाच्या क्षेत्रांत मात्र त्यांनीं खूप कीर्ति संपादन केली. त्यांची वृत्ति प्रथमपासून धार्मिक होती. साधुमहाराज नांवाच्या एका सत्पुरुषाचें त्यांनीं शिष्यत्व पत्करलें व त्याच दृष्टीनें ' साधुदास ' हें नांव धारण केलें. त्यांच्या काव्यलेखनावर संतुष्ट होऊन पुढें सांगलीच्या अधिपतींनींहि त्यांचा गौरव करून त्यांना आश्रय दिला.

साधुदासांची काव्यरचना बरीच मोठी आहे. रघुवंशाच्या धर्तीवर काव्य लिहिण्याच्या मनीषेनें त्यांनीं रामायणांतील कथाभागावर वन, रण व गृह असे तीन ' विहार ' लिहिले आहेत. याशिवाय स्फुट लेखनहि बरेंच असून ते निर्माल्यसंग्रह, भाग १ व २, या संग्रहांत प्रकाशित झालें आहे. जुन्यांत नवीन म्हणून आणि नव्यांत जुने म्हणून साधुदासांच्या काव्याकडे रसिकांचें पुरेसें लक्ष गेलें नाहीं. परंतु त्यांचें काव्य अत्यंत सफाईदार, प्रौढ, अलंकारपूर्ण आणि रघुनाथ–वामन यांसारख्या पंडितकवींच्या काव्याची बरोबरी करणारे आहे असा अभिप्राय कित्येक रसज्ञ टीकाकारांनीं दिला आहे.

# आनंदराव टेकाडे

श्री. आनंद कृष्णाजी टेकाडे हे नागपूरचे रहिवासी असून त्यांचा जन्म इ. स. १८८८ मध्यें झाला. टेकाड्यांनीं काव्यलेखन निष्ठापूर्वक व विपुल केलें असून त्यांच्या संग्रहाचे तीन भाग ' आनंदगीत ' या नांवानें प्रसिद्ध झाले आहेत. टेकाडे आपल्या कवितेच्या ऐन अमदानीमध्यें बरेच लोकप्रिय होते. यांच्या कवितेमध्यें गेयता हा गुण प्रमुख असून ते स्वतः काव्यगायनहि फार परिणामकारक करीत असत किंबहुना रविकिरणमंडळाच्या कवींनीं पुढें प्रसृत

केलेली जाहीर काव्यगायनाची प्रथा टेकाड्यांनींच रूढ केली असें म्हणावयास हरकत नाहीं. 'आनंदकंद ऐसा हा हिंद देश माझा' यासारखीं त्यांचीं कांहीं राष्ट्रीय गीतें त्या कालांत बरींच गाजलीं होतीं. परंतु या गीतांत त्यास आवश्यक असें ओज फारसें आढळत नाहीं. राधाकृष्णांचें प्रेम हाहि टेकाड्यांचा एक अत्यंत आवडता असा विषय आहे. परंतु त्यांतहि उत्कटता, विविधता, कल्पनेची झेंप वगैरे काव्यगुण बेताचेच आहेत. काव्येतिहासांत या कवींचें महत्त्व आहे तें प्रामुख्यानें काव्यगायनाच्या प्रथेचे एक आद्य प्रवर्तक म्हणून.

## के. म. सोनाळकर

केशव महादेव सोनाळकर हे कवि जळगांव येथें वकिली करीत असत. ते स्वतः उत्साहानें काव्यलेखन करीत असतच. परंतु काव्याचे रसिक, कवींचे मित्र म्हणूनहि त्यांचा लौकिक विशेष असे. बालकवींचे व त्यांचे स्नेह-संबंध विशेष जिव्हाळ्याचे होते. बेहरे, अनंततनय, नाथ निफाडकर, तिवारी वगैरे कविमित्रांच्या सहकार्यानें त्यांनीं काव्यकौमुदी-मंडळ काढून 'काव्यकौमुदी' या नांवाचा एक प्रातिनिधिक कवितासंग्रह प्रसिद्ध केला. सोनाळकरांचें काव्यलेखन त्यांच्या समकालीन कवींच्या मानानें बरेंच कमी आहे. तें सर्व काव्याच्या आधुनिक परंपरेंत जमा होणारेंच आहे. सोनाळकरांचा काव्यसंग्रह 'कमल–पराग' या नांवानें प्रकाशित झालेला आहे. 'गीतांजली'च्या धर्तीवर कांहीं गूढगुंजनात्मक मुक्तकाव्येंहि त्यांनीं लिहिलीं आहेत. सोनाळकरांच्या वृत्तींत धार्मिकता बरीच होती. तिचा परिणाम म्हणून म्हणा, किंवा अन्य कारणानें म्हणा, परंतु पुढील काळांत त्यांनीं कविता लिहिणें जवळजवळ वर्ज्यच केलेलें होतें. (जन्म, १८८६; मृत्यु, १९३८)

## बालकवि

'बालकवीं'चें संपूर्ण नांव–त्र्यंबक बापूजी ठोमरे. त्यांचा जन्म १८९० सालीं खानदेशांत धरणगांव येथें झाला. त्यांचें शालेय शिक्षण फारसें होऊं शकलें नाहीं. अल्पवयांतच त्यांनीं काव्यलेखनास आणि शिक्षकाच्या व्यवसायास सुरवात केली. मिशनच्या शाळेमध्यें ते शिक्षकाचें काम करीत.

' बालकवि ' हें त्यांनीं आपण होऊन घेतलेलें टोपण नांव नव्हे. १९०७ सालीं कर्नल कीर्तिकर यांच्या अध्यक्षतेखालीं जळगांव येथें पहिलें मराठी कविसंमेलन झालें. या संमेलनांत सतरा वर्षे वयाच्या ठोमऱ्यांनीं गायिलेल्या कविता ऐकून सर्व सभा संतुष्ट झाली. अध्यक्षांनीं या नवीन कवीचा ' बालकवि ' या विशेषणानें गौरव केला व त्यास ' पागोटें–उपरणें ' देऊन त्याचा सत्कार केला. पागोटें–उपरणें कधींच या कवीच्या डोक्या-खांद्यावर चढलें नाहीं, कारण ते अखेरपर्यंत वृत्तीनें व वर्तनानें ' बाल 'च राहिले. परंतु अध्यक्षांनीं योजलेलें ' बालकवि ' हें विशेषण मात्र विशेषनामांत रूपांतरित होऊन महाराष्ट्र साहित्यामध्यें अजरामर झालें. रे. नारायण वामन टिळक यांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा निकट सहवास बालकवींना पुढील काळांत लाभला. बालकवींच्या जीवनास व काव्यास विशिष्ट वळण लावण्याच्या दृष्टीनें ही घटना विशेष महत्त्वाची होय. केशवसुतांच्या काव्यापासून त्यांना स्फूर्ति मिळाल्याचें जागोजाग स्पष्टपणें दिसून येतें. परंतु निसर्गासंबंधींचें प्रेम, मानवी जीवनांतील व्यापक बंधुभावाचें व समतेचें तत्त्वज्ञान आणि सुबोध शैली या त्यांच्या काव्यविशेषांचें नातें टिळकांच्या कवितेशीं व सहवासाशींच अधिक जोडतां येतें. बालकवींची ' काव्यवृत्ति ' सतत जागृत ठेवण्यासहि टिळकांच्या घराचें मोठेंच साहाय्य झालें लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांमध्यें आलेलें बालकवींचें स्वभाववर्णन अवश्य वाचण्यासारखें आहे. खुद्द टिळकांचेंहि बालकवींवर अत्यंत प्रेम होतें. " पांखरा येशिल का परतून " ही प्रसिद्ध भावपूर्ण कविता टिळकांनीं बालकवींना उद्देशूनच लिहिली आहे असें म्हणतात. मराठी काव्यसृष्टींतील हा नाजूक अंतःकरणाचा व सोनेरी पंखाचा पक्षी, रेल्वेच्या रुळावर एका मालगाडीच्या चाकाखालीं मरण पावला. ( इ. स. १९१८ ). त्याच्या काव्यमय जीवनाची अशी हृदयद्रावक अखेर झाली.

प्रेम हा गोविंदाग्रजांच्या काव्याचा प्रमुख स्थायी भाव आहे, त्याप्रमाणें निसर्गभक्ति ही बालकवींच्या कवितेंतील प्रमुख व सर्वस्पर्शी अशी भावना होय निसर्गांतील सौंदर्याचे, मांगल्याचे आणि निरामयतेचे ते निःसीम उपासक आहेत. केशवसुत, दत्त व टिळक कवींतहि निसर्गासंबंधींचें प्रेम दिसतें. परंतु

या प्रेमाला हार्दिक भाविकतेचें स्वरूप आलें आहे तें केवळ बालकवींमध्यें. वरील पूर्वकवींच्या काव्यसृष्टींत निसर्गप्रेमाला महत्त्वाचें स्थान आहे एवढें फार तर म्हणतां येईल. परंतु बालकवींची काव्यसृष्टि ही निसर्गाविषयींच्या अथांग प्रेमांतूनच सिद्ध झालेली आहे असा भास होतो. चंद्रभागेच्या वाळवंटांत, टाळमृंदगांच्या तालावर वारकरी विठ्ठलनामाचा भक्तिभावानें अगदीं तल्लीन होऊन गजर करीत असतात. पंढरीच्या विठोबाप्रमाणें निसर्गदेवतेसहि एखादें मंदिर आहे असें मानलें तर त्याच्या दाराशीं ' नामदेव–तुकाराम ' होण्याचा अधिकार केवळ बालकवींचाच आहे.

केशवसुत निसर्गातून आपल्या सुखदुःखाशीं संवादी अशी साथ शोधतात. टिळक त्यांतून बहुधा कोठल्यातरी तत्त्वाविष्काराचें संशोधन करतात. निसर्गाची अशी कांहीं उपयुक्तता बालकवि सामान्यतः मानीत नाहींत. निसर्गाकडे पाहण्याची त्यांची भूमिका रसिकाचीदेखील नाहीं, तर त्याच्याशीं एकरूप होऊं पाहणाऱ्या भाविकाची व प्रेमिकाची आहे. दूर उभे राहून ते निसर्गसौंदर्याचें वर्णन करीत नाहींत. ते अंतःकरणानें त्या सौंदर्यामध्यें प्रवेश करतात. त्यांत मिळून जातात. स्वर्ग–पृथ्वीचें ऐक्य करणाऱ्या अरुणोदयाच्या दिव्य सोहळ्यांत ते बुडून जातात. निर्झराबरोबर गिरिकंदरांतून प्रवास करतात. तारकांबरोबर आकाशांत लपंडाव खेळतात आणि चिमुकल्या फुलराणीचा लग्नसमारंभहि मोठ्या थाटामाटानें साजरा करतात. बालकवींचा अरुण कोणत्या ऋतूंतील कोणत्या ठिकाणचा हें कळत नाहीं अशी शंका एका टीकाकारानें व्यक्त केली आहे. माधवराव पटवर्धनांनीं त्यास दिलेलें उत्तर समर्पक आहे. कवि एकाद्या दृश्याचा म्हणजे त्यांतील सौंदर्याचा केवळ शाब्दिक फोटो काढीत नाहीं. त्या सौंदर्यामुळें स्वतःच्या मनावरती झालेले संस्कारच तो प्रकट करीत असतो. म्हणून अशा काव्यांना भौगोलिक वा व्यावहारिक सत्याचें मोजमाप लावणें इष्ट नव्हे.

निसर्गासंबंधींच्या या गाढ प्रेमामुळें बालकवींचें काव्यविश्व अर्थातच फार मर्यादित झालेलें आहे. आयुष्याच्या अखेरच्या काळांत त्यांच्या मनावर कोठल्या तरी विफलतेची सावली पडलेली दिसते. सतत सावलींत असलेले अंकुर जागच्या जागीं कोमेजून जावेत त्याप्रमाणें आपली काव्यशक्तीहि आतां अस्तंगत होत आहे

कीं काय असें त्यांना वाटे. या विषण्ण भावनेंतून निर्माण झालेल्या त्यांच्या कविता त्यांच्या निसर्गगीतांइतक्याच सुंदर व प्रभावी आहेत. 'तुतारी' ला साथ देण्याच्या ईर्ष्येनें त्यांनीं लिहिलेली 'धर्मवीर' ही कविता मात्र केवळ अनुकरणात्मक व म्हणूनच अयशस्वी आहे. त्यांच्या गूढगुंजनाची अवस्थाहि याहून फारशी वेगळी नाहीं.

बालकवींची शैली असाधारण आहे. अकृत्रिमता आणि लालित्य यांचा मनोहर संगम त्यांच्या भाषेमध्यें झालेला आहे. गडकऱ्यांप्रमाणें तेथें डोळे दिपविणारा झगझगाट नाहीं, तर अंतःकरणास स्पर्श करणारी प्रसन्नता आहे. काव्याच्या भावनेंत जी कोमलता आहे तीच शब्दांमध्यें आहे. फूल उमलतांच फुलपांखरें आमंत्रणाशिवाय त्याच्याकडे झेंप घेतात त्याप्रमाणें सुंदर, समर्पक शब्द बालकवींकडे आपण होऊन धाव घेतात कीं काय असें वाटतें.

## सावरकर

बॅ. विनायक दामोदर सावरकर यांच्या नांवाचा उच्चार करतांच, स्वातंत्र्यवीर, आघाडीचे क्रांतिकारक, आपल्या जळत्या भाषेनें सहकाऱ्यांना प्रेरणा देणारे पुढारी, अंदमान बेटांतील काळ्या पाण्यावरचे कैदी, हिंदी राजकारणांतील विशिष्ट पक्षाचे नेते वगैरे संदर्भ चटकन मनामध्यें येतात. मराठीमध्यें अविस्मरणीय मानलें जाणारें काव्य त्यांनीं लिहिलें आहे हें तितक्या लौकर ध्यानांत येत नाहीं. सावरकरांच्या काव्याला अन्याय त्यांच्या स्वतःच्या अन्य क्षेत्रांतील कीर्तीनेंच केला आहे !

सावरकरांचा जन्म इ. स. १८८३ मध्यें नाशिकजवळच्या एका खेडेगांवीं झाला. कळायला लागल्यापासून स्वातंत्र्याकांक्षा ही त्यांच्या जीवनाची प्रमुख किंबहुना एकमेव निष्ठा बनली. मॅझिनी, लो. टिळक आणि शि. म. परांजपे यांच्या चरित्राचा व विचारांचा त्यांच्यावर बालवयांतच दृढ परिणाम झाला होता. १८९९ मध्यें त्यांनीं नाशिक येथें मित्रमेळा व पुढील काळांत अभिनव भारत या क्रांतिकारकांच्या संस्था स्थापन केल्या. मित्रमेळ्यातर्फे वेगवेगळे उत्सव साजरे होत. त्या प्रसंगीं मेळ्याच्या कार्यक्रमासाठीं म्हणून सावरकर व गोविंद हे

कविता लिहीत असत. सध्यां गणेशोत्सवांत दिसणाऱ्या मेळ्यांवरून सावरकरांच्या मित्रमेळ्याची कल्पना केली तर ती साफ चुकीची होईल. आजच्या मेळ्याप्रमाणें त्यांत लहान मुलांच्या कौतुकाला, गायकीला अथवा करमणुकीला मुळींच स्थान नव्हतें. मेळा हें प्रामुख्यानें राजकीय प्रचाराचें साधन होतें. काळकेसरीसारखीं वृत्तपत्रें जें कार्य लेखनानें करीत तेंच कार्य मित्रमेळ्यासारखे मेळे संगीताच्या माफक साहाय्यानें करीत. या भूमिकेमुळें या मेळ्यांना पदें लागत नसत, तर कविता लागत असत. गोविंदांच्या अनेक उत्कृष्ट कविता या मेळ्यासाठीं लिहिल्या आहेत हें ध्यानीं घेतलें म्हणजे या विधानाची सत्यता पटेल.

पुण्यांत कॉलेजांत असतांहि त्यांनीं कांहीं काव्यलेखन केलें. परंतु त्यांचें विशेष प्रसिद्ध व अधिक तेजस्वी असें काव्य अंदमानच्या कारागृहांतच लिहिलें गेलें. लेखनाचें साहित्य जवळ नसल्यामुळें तुरुंगाच्या भिंतीवर दगडाची लेखणी करून ते कविता लिहीत व पाठ करून ठेवीत. अशा रीतीनें ऊर्जस्वल काव्यलेखन केल्याचें उदाहरण जगाच्या इतिहासांत अन्यत्र असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. यांत त्यांच्या इतर निष्ठांबरोबर त्यांची काव्यावरील निष्ठाहि प्रकट होते. कमला, सप्तर्षि, मूर्ति दुजी ती, वगैरे काव्यें आणि गोमंतक या काव्याचा प्रारंभींचा भाग हें सर्व लेखन अंदमानांत झालें. गोमंतकाचा पुढील भाग रत्नागिरीच्या स्थानबंदींत लिहिला गेला आहे. यानंतरच्या काळांत त्यांनीं काव्यलेखन केलें नाहीं.

'लेखण्या मोडून तरवारी घ्या' हा मुंबईच्या साहित्यसंमेलनांत सावरकरांनीं दिलेला अध्यक्षीय संदेश त्यांच्या स्वतःच्या काव्यांत सुरवातीपासूनच लाक्षणिक अर्थानें प्रत्ययाला येतो. आपलें काव्य लेखणीनें न लिहितां, तरवारीच्या टोकानें ते लिहीत आहेत कीं काय असा भास होतो. स्वातंत्र्य, स्वातंत्र्यासाठीं केलेल्या त्यागांतून उद्‌भवणारीं विविध सुखदुःखें, हिंदु धर्मीयांवर झालेलीं आक्रमणें व वीर पुरुषांनीं केलेला त्याचा साहसी प्रतिकार हे त्यांच्या काव्याचे प्रधान विषय होत. पतंग ज्योतीभोंवतीं फिरतो त्याप्रमाणें त्यांची प्रतिभा स्वातंत्र्याच्या व संग्रामाच्या तत्त्वज्ञानाभोंवतीं सतत प्रदक्षिणा घालत आहे असें दिसतें. केवळ सौंदर्यात्मक वा भावनात्मक अशा विषयांचें किंवा घटनांचें आकर्षण त्यांच्या

प्रतिभेस कधींच वाटलें नाहीं. आधुनिक काव्याची जी परंपरा केशवसुतादि कवींच्या लेखनामुळें रूढ झाली होती तिचा कोठलाच परिणाम सावरकर किंवा गोविंद यांच्या काव्यावर झाला नाहीं. ते वृत्तीनें आधुनिक होते आणि स्वतःच्या भावनांचा आविष्कार ही नवीन काव्यपरंपरेची भूमिकाहि त्यांनीं—अर्थात् स्वतंत्रपणानें—स्वीकारली होती. परंतु इतर समकालीनांप्रमाणें काव्य हें जीवनांतील प्रमुख तत्त्व असें त्यांनीं कधींच मानलें नाहीं. घुबडापासून कोकिलेपर्यंत आणि डासापासून ईश्वरापर्यंत अशा विविध विषयांतील रससौंदर्य शोधून काढण्याचा उद्योग त्यांच्या कवितेनें कधीं केला नाहीं. व्यापक, उदात्त आणि भव्य अशा विषयाचेंच तिला काय तें आकर्षण होतें. सावरकरांची प्रतिभा भावकवीची नसून महाकवीची आहे या टीकाकारांच्या अभिप्रायाचा हाच अर्थ होय.

इतर आधुनिक कवींप्रमाणें जुन्या वळणाच्या पंडिती काव्याशींहि सावरकरांचें कांहीं नातें नसलें तरी त्यांची शैली पंडिती थाटाची आहे यांत शंका नाहीं. त्यांतहि संस्कृतचें प्राबल्य, शब्दांविषयींचे नवे प्रयोग यांसारख्या प्रवृत्तीमुळें त्यांची पुष्कळशी कविता क्लिष्ट व अप्रासादिक झालेली आहे, त्याग, वीरता वगैरे उदात्त भावनांची भव्य अभिव्यक्ति आणि कल्पनेची आकाशगामी झेंप हें त्यांच्या काव्याचें प्रमुख सामर्थ्य होय.

## ना. के. बेहरे

श्री. ना. के. बेहरे हे नागपूरवासी कवि (जन्म १८९०) केशवसुतांना गुरुस्थानीं मानून काव्यलेखन करूं लागले. प्रारंभींच्या काळांत 'केशवसुत' हें कलमनामहि त्यांनीं धारण केलें होतें. बेहऱ्यांनीं विज्ञानशास्त्रांत पदवी संपादन करून शाळेंत व कॉलेजांत अध्यापकाचें काम केलें. मध्यप्रांतांतील शिक्षणक्षेत्रांत त्यांना बरेंच महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें होतें. त्याना अखेरीं आपल्या नोकरीवर पाणी सोडावें लागलें तें काव्यासाठीं. 'चित्रमयजगत्' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या एका गीताबद्दल त्यांना जाब विचारण्यांत आला आणि बेहऱ्यांनीं स्वाभिमानपूर्वक जबाब देऊन नोकरीचा राजीनामा दिला. काव्यासाठीं चरितार्थाच्या सुखकारक साधनाला तिलांजलि देण्याचें हें धाडस दुर्मिळच होय.

बेहऱ्यांचें काव्यलेखन विस्तारानें कमी नाहीं. त्यांची समग्र कविता ' मोत्यांची माळ ' या ग्रंथांत समाविष्ट आहे. शिशुगीतें, संसारगीतें, सृष्टीचे बोल, राष्ट्रीय कविता आणि कवीचें तत्त्वज्ञान असे पांच ' पदर ' या माळेंत आहेत. या वरून त्यांच्या विषयांची व्याप्ति लक्षांत येते. या कवितेंत भावनेचें उधाण वा कल्पनेची भरारी फार कमी. साधीसुधी रचना, विषयांची विविधता, व ' नवयुगवादा 'चा सरळ धोपटमार्गी प्रचार हीं त्यांच्या काव्याचीं विशेषांगें.

## गोविंदाग्रज

राम गणेश गडकरी हे मराठी साहित्यक्षेत्रांत तीन वेगवेगळ्या नांवांनीं वावरले आणि त्यांच्या प्रतिभेचें सामर्थ्य एवढें मोठें होतें कीं या तीनहि नांवांना त्यांनीं उदंड लोकप्रियता मिळवून दिली. गडकरी म्हणून नाट्यक्षेत्रांत, गोविंदाग्रज म्हणून काव्यांत आणि बाळकराम म्हणून विनोदी लेखनांत त्यांनीं संपादन केलेलें यश अविस्मरणीय आहे. त्यांच्या समग्र काव्याचा संग्रह ' वाग्वैजयंती ' या नांवानें त्यांच्या निधनानंतर १९२१ मध्यें प्रसिद्ध झाला.

असामान्य प्रतिभा असलेल्या या साहित्यिकाचा जन्म महाराष्ट्राच्या बाहेर, गुजरातेंतील नवसारी या गांवीं १८८५ मध्यें झाला. बालवयांतच वडिलांच्या संरक्षक छत्रास मुकावें लागल्यामुळें, गडकऱ्यांना हालअपेष्टा, दारिद्य आणि उपेक्षा यांचें ओझें शिरावर घेऊनच पुढील मार्ग शोधावा लागला. त्यांचें प्रवेशपरीक्षे-पर्यंतचें शिक्षण कर्जत व पुणें येथें झालें. पदवी मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेनें ते फर्गसन कॉलेजांत दाखल झाले. परंतु दारिद्य आणि शिक्षण यांची कुंडली जमेना. मनांतल्या आशा मनांतच जिरल्या आणि ते चरितार्थाच्या मागें लागले, किर्लोस्कर नाटक मंडळींत मुलांचे ' मास्तर ' म्हणून ते नोकरीस राहिले. कंपनीच्या वातावरणांत त्यांच्या नाट्यलेखनास फार मोठी चालना मिळाली आणि पुढील काळांत चरितार्थासाठीं मुख्यतः नाट्यलेखनाचाच त्यांनीं अवलंब केला. इ. स. १९१९ मध्यें ते दीर्घ आजारानंतर निधन पावले.

यावज्जीवहि ' काय मी ' न कळलें आप्तांप्रती नीटसें
मित्रांतेहि कळे न गूढ—न कळे माझें मलाहि तसें !

हे गडकऱ्यांनीं स्वतःसंबंधीं विनोदानें काढलेले उद्गार बरेच सार्थ वाटतात. गडकऱ्यांचें प्रसिद्ध असलेलें सारें बाह्य चरित्र, विनोद आणि विक्षिप्तपणा यांनीं आच्छादित असें आहे. त्यांचें आंतर चरित्र शोधण्यासाठीं त्यांच्या वाङ्मयाकडेच वळावें लागेल. आणि असा शोध घेतल्यावर एक गोष्ट निश्चितपणें लक्षांत येते. गडकरी त्यांच्या आठवणींत व आख्यायिकांत दिसतात तसे केवळ 'विनोदी' व विक्षिप्त नव्हते. अहंकारी मनुष्य आपल्या जखमा इतरांपासून व स्वतःपासून लपविण्यासाठीं विविध क्लृप्त्या अभावितपणें योजीत असतो. आपल्या दुःखी दरिद्री आणि निष्प्रेम जीवनांतील विविध व्यथांवर गडकरी विनोदाच्या आणि तऱ्हेवाईकपणाच्या झालरी सोडीत आहेत असें वाटतें. अर्थात् गडकऱ्यांजवळ तीव्र विनोदबुद्धि होती म्हणूनच हें शक्य झालें.

गोविंदाग्रज केशवसुतांचे 'सच्चे चेले' म्हणून काव्यांत अवतरले. नाटकांत कोल्हटकरांचें आणि काव्यांत केशवसुतांचें शिष्यत्व त्यांनीं मान्य केलें. एवढेंच नव्हे तर तें त्यांनीं अभिमानानें मिरविलेंहि. किंबहुना मराठी साहित्यप्रांतांत 'गुरुपरंपरा' ही चीज गडकऱ्यांनींच रूढ केली असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. परंतु गडकऱ्यांनीं गुरु म्हणून केशवसुतांचा गौरव केला असला तरी या गुरुशिष्यांच्या काव्यांमध्यें साम्यापेक्षां भिन्नताच अधिक आढळते. ही भिन्नता प्रतिभेच्या वेगवेगळ्या प्रकृतींतून आणि आविष्काराच्या भिन्न पद्धतींतून निर्माण झाली आहे. ज्या भावकाव्याच्या परंपरेचे केशवसुत हे अग्रगामी नेते होते तीच परंपरा गोविंदाग्रजांनीं पुढें चालविली. कित्येक कवितांचे विषय केशवसुतांवरून घेतलेले, स्फुरलेले दिसतात. कवितेच्या माथ्यावर काव्यविषय विशद करणाऱ्या ( क्वचित् अधिक रहस्यमय करणाऱ्या ) टीपा लिहिणें, कवितेच्या शेवटीं एक श्लोक वेगळ्या वृत्तांत लिहिणें वगैरे बाह्य गोष्टींतहि गडकऱ्यांनीं केशवसुतांचें अनुकरण केलें आहे. येथेंच उभयतांतील साम्य संपतें. गडकऱ्यांच्या काव्याचें—निदान श्रेष्ठतर काव्याचें—अंतरंग केशवसुतांहून खूपच वेगळें आहे. नाट्य, कल्पकता आणि चमत्कृति, हे केशवसुतांमध्यें प्रायः अभावानेंच आढळणारे गुणविशेष गडकऱ्यांच्या काव्याचे मूलाधार आहेत. हे गुणविशेष कोल्हटकरांच्या साहित्यांत प्रकर्षानें आढळतात.

म्हणूनच " वाग्वैजयंतींतील कांहीं थोडे मणी केशवसुती घाटाचे असले तरी कोल्हटकरी घाटाच्या मण्यांची संख्याच एकंदरीनें अधिक भरेल " हें तात्यासाहेब केळकरांचें मत यथार्थ वाटतें.

गोविंदाग्रजांची प्रसिद्धि आणखी दोन गोष्टींसाठीं आहे. त्या म्हणजे त्यांचीं प्रेमकाव्यें व त्यांची ललित, कल्पनाप्रचुर आविष्कारपद्धति या होत. 'प्रेमाचा शाहीर' ही त्यांची रसिकमान्य झालेली पदवी आहे. ती सार्थ आहे यांत शंका नाहीं. प्रेम हा गडकऱ्यांच्या काव्याचा सर्वांत प्रिय आणि सर्वांत प्रभावी असा विषय आहे. निराशा, विरह व उत्कंठा या प्रीतीच्या विविध अंगांचा अत्यंत हृदयंगम आविष्कार त्यांच्या कवितेंतून झालेला आहे. अतृप्त आणि असफल प्रीतीचें हृदयस्पर्शी विलापन त्यांत आहे, त्याप्रमाणें मीलनांतील शृंगारिक अनुभवांचे मधुरालापहि आहेत. राधेसारख्या लावण्यवतीच्या प्रेमाचेंच त्यांच्या प्रतिभेला आकलन होतें असें नाहीं, तर—

सुंदर गोपी योग्य रडाया जगन्मोहना तुजसाठीं
परी कुठें मी आणि कुठें तूं लोकसुंदरा जगजेठी—

असे उद्‌गार काढीत निर्जनांत आसवें गाळणाऱ्या कुरूप कुब्जेचें उदासरम्य प्रेमहि ते जिव्हाळ्यानें चितारूं शकतात. केशवसुतादिकांच्या काळांत सुरू झालेलें प्रेमाचें स्वर्गीकरण गोविंदाग्रजांच्या ( व इतरहि कित्येक समकालीनांच्या ) काव्यांत शिगेला पोहोचलेलें दिसतें. प्रेमाच्या या अतिरेकी उपासनेचें तत्त्वज्ञान 'प्रेम आणि मरण' या सुंदर कवितेंतून चांगलें व्यक्त झालेलें आहे. 'शाहीर' या शब्दानें आविष्काराची जी उत्तानता सूचित होते तीहि केशवसुत–टिळक वगैरे पूर्वकवींच्या मानानें गडकऱ्यांच्या प्रेमकाव्यांत फार अधिक आहे. पुढील काळांतील 'माधव जूलियन' या एका कवीचा अपवाद सोडला तर प्रेम हा विषय इतर कोणत्याहि मराठी कवीनें इतक्या जिव्हाळ्यानें व प्रभावीपणानें प्रकट केलेला नाहीं.

गडकरी हे मराठी साहित्यसृष्टींतील एक अव्वल दर्जाचे भाषाप्रभु आहेत. त्यांच्या वाङ्मयांत प्रवेश करतांना एखाद्या कुबेराच्या जामदारखान्यांत प्रवेश करीत आहोंत असें वाटतें. असामान्य कल्पनाशक्ति आणि शब्दांवरील प्रभुत्व

यांच्या दुर्मिळ मिलाफामुळें गडकऱ्यांचा तत्कालीन वाचक केवळ भारावूनच नव्हे तर भांबावूनहि गेला यांत नवल नाहीं. गद्याप्रमाणें पद्यांतहि गडकऱ्यांचें हें भाषाप्रभुत्व दिसून येतें. गुणांच्या अतिरेकामधून दोष निर्माण होतो या न्यायानें कवींची ही शब्दासक्ति कित्येकदां काव्याला बाधक झाली आहे हेंहि निर्विवाद होय. अनेक कवितांतून काव्याच्या मागें शब्द येण्याऐवजीं शब्दांमागें काव्य आलें आहे असा भास होतो. 'कृत्रिमता' हा गोविंदाग्रजांच्या काव्यांतील दोष शब्दांच्या या मृगयेंतूनच बव्हंशीं उत्पन्न झाला आहे. परंतु–" आतिसाधेपणामुळें नवीन मराठी काव्याची जी हेटाळणी जुन्या रसिकांकडून व्हावयाची, ती गडकऱ्यांच्या कवितेची करतां येईना. नखऱ्याप्रमाणें सामर्थ्यहि मराठी कवितेच्या भाषेला गडकऱ्यांनीं मिळवून दिलें." ( अर्वाचीन मराठी काव्य ). गडकऱ्यांच्या काव्याचें मूल्यमापन नेहमींच वादांत भिजत पडलेलें असतें; परंतु एक तपापूर्वी अस्तित्वांत आलेल्या आधुनिक काव्याच्या परंपरेला त्यांनीं थोर प्रतिष्ठा व मान्यता मिळवून दिली हें त्यांचें ऐतिहासिक कार्य वादातीत आहे.

## उपाध्ये

'चालचलाऊ भगवद्गीता' या प्रसिद्ध विडंबन–काव्याचे लेखक जयकृष्ण केशव उपाध्ये नागपूरकडील राहणारे. ते १८८३ मध्यें जन्मले. उपाध्ये हे वृत्तीनें विरक्त, परंतु मोठे रसिक आणि विनोदचतुर असे होते. आयुष्यांत अनेक आपत्ति ओढवल्या असतांहि त्यांच्या स्वभावांतील विनोद अखेरपर्यंत कायम होता. त्यांनीं लिहिलेलीं विनोदी विडंबनपर काव्यें अत्यंत मार्मिक आहेत. गीतेसारख्या गंभीर ग्रंथांतून त्यांनीं निर्माण केलेला विनोद त्यांच्या या सामर्थ्याचा प्रत्यय आणून देणारा आहे. परंतु उपाध्यांनीं केवळ विनोदी काव्येंच लिहिलीं असें नाहीं. त्यांची पुष्कळशी कविता ईश्वराची आराधना करणारी आहे. 'लोकमान्य–चरितामृत' नांवाचें एक दीर्घकाव्य त्यांनीं लिहिलें असून गीतगोविंदाच्या धर्तीवर 'गीतराघव' हें काव्यहि प्रसिद्ध केलें आहे. उपाध्यांनीं फिट्झ्जेरल्डच्या उमरखय्यामच्या रुबायांचें भाषांतर केलें. त्यांचें रसिकांकडून चांगलेंच स्वागत झालें. संस्कृत श्लोकवृत्ताचा स्वीकार करून, सुबोध व लालित्य–

पूर्ण अशा भाषेंत हें भाषांतर त्यांनीं केलें आहे. त्यांची स्फुट कविता ' पोपट-पंची ' या नांवानें प्रसिद्ध झाली आहे. उपाध्ये १९३७ मध्यें निधन पावले.

## खापर्डे

कविभूषण ब. ग. खापर्डे हे विदर्भीय कवि १८९० मध्यें जन्मले. १९१८ मध्यें त्यांनीं ' काव्यकांतार ' हें काव्य प्रसिद्ध केलें. काव्यकांतार हा एका संकल्पित दीर्घकाव्याचा पूर्वभाग होता. परंतु नंतरच्या काळांत कवींनीं स्फुट काव्य-लेखनाकडेच विशेष लक्ष दिलें. ही स्फुट कविता ' काव्यकांताराचीं फुलें ' या संग्रहांत समाविष्ट आहे. पुढील काळांत रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याचा त्यांच्या मनावर गाढ परिणाम झाला. खापर्ड्यांची मनोवृत्ति मूलतःच धर्मपर आणि भक्तिशील असल्यामुळें, गूढगुंजनात्मक काव्यांत ते जितके रमतात तितके अन्यत्र रमत नाहींत. त्यांचीं ' सर्वस्वाचीं गद्य गाणीं ' हीं प्रायः भक्तिपरच आहेत. त्यांची लेखनशैली डौलदार, अलंकारिक व प्रौढ आहे. खापर्ड्यांच्या गूढ-गुंजनांत दोन वेगळ्या प्रवाहांचें मिश्रण दिसतें. एक केशवसुतादि पूर्वकवींचा व दुसरा टागोरांचा. आधुनिक मराठी कवितेंतील गूढगुंजनाच्या सांकेतिक कक्षेंतून पलीकडे जाण्याचा प्रयत्न त्यांच्या पुढील काळांतील काव्यांत आहे. " ऐतिहासिक दृष्ट्या, अलीकडच्या काळांतील विदर्भांतील गूढगुंजनाचें आरंभस्थान " ( —अर्वाचीन मराठी काव्य ) म्हणून खापर्ड्यांच्या काव्याचें विशेष महत्त्व मानलें जातें.

## रहाळकर

कवि नरहर शंकर रहाळकर हे इंदूरचे रहिवासी. त्यांचा जन्म १८८२ मध्यें झाला. रहाळकरांना केशवसुतांच्या प्रत्यक्ष सहवासापासून आणि काव्यापासून लेखनाची स्फूर्ति मिळाली. केशवसुतांच्या श्रेष्ठतेची अगदी प्रथमतः ज्यांना ओळख पटली व ती इतरांनाहि पटवून देण्याचा ज्यांनीं निष्ठेनें प्रयत्न केला त्यांत रहाळकर हे प्रमुख होत. रहाळकरांनीं काव्य लिहिलें तें केशवसुतांच्या धर्तीवरच. परंतु काव्यलेखनांत त्यांचें लक्ष फार दिवस राहिलें नाहीं. १९०४

नंतर आपण काव्यलेखनांतून निवृत्त झालों असें त्यांनीं स्वतःच सांगितलें आहे. रहाळकरांचा ‘ पुष्पांजलि ’ हा काव्यसंग्रह १९२४ मध्यें प्रकाशित झाला. आपल्या गुरुप्रमाणेंच त्यांनीं प्रागतिक सामाजिक विचार आपल्या काव्यांतून मांडले असून प्रेमासारख्या विषयावर आत्मलेखनात्म काव्यहि लिहिलें आहे. त्यांची भाषा साधी व अनलंकृत अशी आहे.

## सुमन्त

कवि सुमन्त यांचें संपूर्ण नांव अप्पाराव धुंडिराज मुरतुले असें होतें. ते कोल्हापूरला रहात असत. त्यांचा जन्म १८८१ व मृत्यु १९३९ मध्यें झाला. सुमंतांचें चरित्र त्रिविध रसांनीं परिपूर्ण असें आहे. व्यापारी घराण्यांत जन्म असूनहि त्यांचें पूर्वायुष्य दारिद्र्याशीं झगडण्यांत गेलें. लहानपणापासूनच काव्य-नाटकादि साहित्याचा त्यांना छंद होता. या छंदामुळें ते एकदां घरून पळाले व एका नाटक कंपनींत जाऊन राहिले. कांहीं दिवसांनीं पुन्हां परत घरीं येऊन त्यांनीं कागल येथें इंग्रजी शाळेंतलि शिक्षण घेतलें. हें शिक्षण पुरें होण्याच्या आधींच त्यांना संसारांत व नोकरीपेशांत पडावें लागलें. योग्य व्यवसायाच्या अभावीं त्यांचे प हाल झाले. अखेरीस ते कागल सोडून कोल्हापूरला शाहू-महाराजांची भेट घेण्यासाठीं आले. मध्यंतरींच्या काळांत ‘ रानांतील बोरें-उंबरें व ओढ्याचें पाणी ’ यांवरती त्यांना कांहीं काळ गुजराण करावी लागली. शेवटीं महाराजांची मुलाखत होऊन त्यांना खाजगीकडे नोकरी मिळाली व तेव्हांपासून त्यांच्या आयुष्यास वेगळें वळण मिळालें. पुढें छत्रपतींनीं त्यांच्या काव्याचा गौरव करून त्यांना ‘ कविमौक्तिक ’ ही पदवी दिली. शंकराचार्यांनींहि त्यांना ‘ कविकुंजर ’ हा किताब दिला. टागोरांना ‘ नोबेल प्राइज ’ मिळाल्यावरती त्यांची भेट घेण्यासाठीं छत्रपतींच्या सूचनेवरून सुमंत कलकत्यास गेले होते. मराठी कविमंडळांतहि, विशेषतः जुन्या वळणाच्या कवींत त्यांना बरीच प्रतिष्ठा प्राप्त झाली. इंदूर व बडोदें येथील राजांनींहि सुमंतांचा सत्कार करून त्यांना भरपूर बिदागी दिली. त्यांनीं पुढील काळांत विपुल व बहुविध काव्यलेखन केलें.

सुमंत व रेंदाळकर हे चांगले मित्र होते. परंतु पुढें काव्यावरूनच त्यांच्यांत

वाकडें आलें ! रेंदाळकरांना आपल्या काव्यगुणांमुळें आपल्याविषयीं मत्सर वाटतो अशी सुमंतांची समजूत झाली होती. ती खरी असो वा खोटी असो, शंकराचार्य आणि राजेमहाराजे यांचे अभिप्राय लक्षांत न घेतां, काळानें जो अखेरी निर्णय दिला तो मात्र उलट ! आधुनिक कवितेच्या दुसऱ्या कालखंडांत आज रेंदाळकरांचें स्थान सन्मानाचें आहे, सुमंतांची बहुतेक कविता मात्र आतां विस्मृतप्राय झाली आहे.

## अनंततनय

अनंततनय हे विद्यमान असतांना काव्यक्षेत्रांतील एक ' राजे ' मानले जात. अनंततनय हे राजे आणि प्रो. श्री. नि. चाफेकर हे प्रधान अशी पुण्याच्या कविमंडळांत तरी परिस्थिति होती. ( मराठी वाङ्मयसेवक ' माधव जूलियन ' ) अनंततनयांच्या या राज्यामध्यें बहुधा आधुनिक कवींबरोबर युद्ध पुकारलेलें असे. अनंततनय आणि त्यांचे टीकाकार स्नेही श्री. चाफेकर हे दोघेहि काव्यांतील परंपरागत वळणाचे जाज्वल्य अभिमानी आणि नवीन ' बिंदुस्रावी ' काव्याचे कट्टे वैरी. अनंततनयांनीं, शत्रूंकडून खंडणी वसूल करावी त्याप्रमाणें भावकाव्यास विरोध करतां करतां स्वतःहि तशा प्रकारची कविता बरीच लिहिली. परंतु एकंदरींत त्यांच्या काव्याचें स्वरूप प्रौढ, प्रशस्त व पंडिती घाटाचें आहे यांत शंका नाहीं.

या कवींचें संपूर्ण नांव—दत्तात्रेय अनंत आपटे असें आहे. (जन्म : १८७९) ते सरकारी नोकरींत होते. नोकरीची शृंखला असूनहि त्यांनीं खूप लेखन केलें व काव्यासंबंधींच्या तत्कालीन वादांत हिरीरीनें भाग घेतला. ऋतुसंहार, तिलक-विजय, मराठी भगवद्‌गीता वगैरे त्यांचीं दीर्घ प्रकरणें प्रसिद्ध असून स्फुट कविता ' हृदयतरंगा 'च्या तीन भागांत प्रकाशित झाली आहे. हें काव्य एकूण विपुल व विविधतापूर्ण असलें तरी प्रतिभेचा आंवाका मर्यादित असल्यामुळें त्यांच्या हयातींत त्याला जितकें महत्त्व होतें तितकें नंतर उरलें नाहीं. अनंततनय इ. स. १९२९ मध्यें निवर्तले.

## तिवारी

आपल्या संग्रामगीतांनीं लोकप्रिय झालेले कवि दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी

हे खानदेशांत रहात असत. त्यांचा जन्म इ. स. १८८७ मध्यें झाला. तिवारींचें घराणें उत्तरेकडील कानपूर भागांत राहणारें. दक्षिणेकडे आल्यावरतीहि घरांत हिंदी भाषेचाच वापर अधिक असे. त्यामुळें हे कवि हिंदी भाषेंत व साहित्यांत प्रथमपासून चांगले पारंगत होते. वडिलांनीं संन्यास घेतल्यामुळें यांना अल्पवयांतच चरितार्थासाठीं प्राथमिक शिक्षकाचा व्यवसाय पत्करावा लागला. तिवारींनीं संस्कृत, हिंदी व मराठी या तिन्ही भाषांतील काव्यांचा बारकाईनें व्यासंग केला. हिंदीमधील वीररसात्मक कविता लिहिणारे चंद आणि भूषण हे त्यांचे विशेष प्रिय कवि होते. १९३९ मध्यें ते जळगांवीं निधन पावले.

तिवारींची एकूण काव्यरचना विपुल आहे. संस्कृत वृत्तांचा आणि शैलीचा स्वीकार करून त्यांनीं अनेक दीर्घ काव्यें लिहिलीं आहेत. ईश्वरभक्तीपासून राधामाधवप्रेमापर्यंत अनेक विषयांचा त्यांनीं परामर्श घेतला आहे. परंतु तिवारींचें नांव विशेष रसिकमान्य झालें तें त्यांच्या संग्रामगीतांसाठींच. मराठ्यांचीं संग्रामगीतें आणि झांशीची संग्रामदेवता हे त्यांचे संग्रह सहसा काव्याच्या वाटेस न जाणाऱ्या लोकांनींहि आवडीनें वाचले. तिवारींची ही कविता राष्ट्रीय म्हणण्यापेक्षां 'ऐतिहासिक'च म्हणावी लागेल. सावरकर–गोविंदांची हृदयाचा ठाव घेणारी उत्कटता त्यांत नाहीं. त्यांत वर्णनावर विशेष भर. यामुळें व कवीच्या काव्यविषयक मर्यादांमुळें ती इतर अनेकांपेक्षां लोकप्रिय झाली असली तरी तिचें स्वरूप बरेचसें 'शालेय' आहे.

## नागेश

कवि नागेश गणेश नवरे यांचा जन्म १८८९ मध्यें झाला. रेंदाळकरांप्रमाणें ते कोल्हापूरचे रहिवासी. रेंदाळकरांशीं त्यांचे गाढ स्नेहसंबंध होते. या दोघां मित्रांची काव्यविषयक भूमिका आणि आविष्कारपद्धतीहि सामान्यपणें सारखीच होती असें म्हणावयास हरकत नाहीं. रेंदाळकरांप्रमाणें नागेशहि संस्कृत काव्याचे चांगले जाणकार आणि केशवसुतांचे व आधुनिक काव्यपरंपरेचे निष्ठावंत अनुयायी. केशवसुतांसंबंधींचा आपला आदर नागेशांनीं अनेक कवितांतून व्यक्त केला आहे. त्यांचें काव्यलेखन विपुल आहे. त्यांचा 'वन्य पुष्पें' नांवाचा एक संग्रह

१९१४ मध्यें प्रकाशित झाला. परंतु पुस्तकरूपानें एकत्रित न झालेली कविता अद्यापि पुष्कळ आहे.

त्या काळामध्यें जे नावीन्याचे संकेत निर्माण झाले होते त्याहून फारसें स्वतंत्र अथवा पृथगात्म वाटणारें काव्य नागेशांनीं लिहिलेलें दिसत नाहीं. रेंदाळकरां-प्रमाणें त्यांचीहि कल्पनाशक्ति मर्यादित आहे. उत्कटतेच्या आणि भावकाव्यास आवश्यक अशा सहजतेच्या बाबतींत मात्र ते आपल्या मित्राहून कमी वाटतात. नागेशांची शैली संस्कृतप्रचुर व प्रौढ आहे. रेंदाळकरांनीं सुरू केलेल्या निर्यमक काव्यलेखनाला नागेशांनीं महत्त्वाचा हातभार लावला.

REFBK-0016961

REFBK-0016961

# संदर्भ आणि टीपा

**फुलबाग**
क्र. १४ पा. : २९

सावरकरांच्या ‘ कमला ’ या दीर्घ, अपूर्ण कथा-काव्यांतील हा उतारा होय. हें काव्य अनुष्टुभ् छंदांत लिहिलें आहे. अलीकडील मराठी काव्यांत या छंदाचा उपयोग केवळ सावरकरांनींच केला आहे. त्यांच्या प्रतिभा–प्रकृतीला तोकडीं व कडव्यांनीं खंडित होणारीं वृत्तें फारशीं मानवत नव्हतीं.

**तूं तर चाफेकळी**
बालकवि
क्र. ३१–पा. ६२

बालकवींच्या काव्यसंग्रहांत या कवितेचा समावेश अपूर्ण कवितांत आहे. शेवटचे चरण लक्षांत घेतां कविता अपुरी वाटत नाहीं. कदाचित् एखाद्या दीर्घ संकल्पित काव्यांतील हा एखादा स्वतंत्र भाग असेल.

**तीर आणि गरुड**
सुमंत
क्र. ४४–पान : ८५

या कवितेच्या मागें एक आख्यायिका आहे. सुमंत व रेंदाळकर यांच्यांतील मैत्री काव्यावरूनच बिनसली. या मैत्रीच्या अखेरच्या दिवसांत या दोघां कविमित्रांनीं ‘ पतंग ’ हा एक विषय घेऊन कविता लिहिल्या. त्यांत सुमंतांची कविता सरस झाल्यामुळें रेंदाळकर चिडले व त्यांनीं सुमंतांची खूप नालस्ती केली. या नालस्तीस उत्तर म्हणून सुमंतांनीं ‘ तीर व गरुड ’ ही कविता लिहिली असें म्हणतात.

**मूर्ति दुजी ती**
सावरकर
क्र. ५३–पान : १०२

ही कविता ‘ वैनायक ’ वृत्तांत आहे. या वृत्ताची योजना व रचना सावरकरांनींच प्रथमतः केली असून त्यासाठींच त्याचें नांव ‘ वैनायक ’ आहे. इंग्रजीमधील ‘ब्लँक् व्हर्स्’च्या धर्तीवर हें वृत्त आहे. त्यासाठीं ‘धवल-चंद्रिका ’ या जातीचा सावरकरांनीं उपयोग केला असून चरणाच्या व यमकाच्या बंधनांतून तें मुक्त केलें आहे. सावरकरांच्या दीर्घ रचनेस असें वृत्त आव-श्यकच होतें. परंतु इतरांनीं त्याचा फारसा स्वीकार केलेला दिसत नाहीं.

**दसरा**
गोविंदाग्रज
क्र. ५५ पा. : ११३

उप्लाणी : खोगिरसाज नसलेला घोडा.

अमीन : विश्वासपूर्ण.

आगरकर–भागवत हे महाराष्ट्रांतील व केशवचंद्र सेन हे बंगालमधील सामाजिक सुधारणेचे थोर पुरस्कर्ते होते. आगरकरांचें चरित्र सर्वपरिचितच आहे. भागवतांचें नांव तितकें विख्यात नसलें तरी 'शास्त्री' असलेल्या या सुधारकानें सामाजिक सुधारणांचा फार हिरीरीनें प्रचार केला होता. केशवचंद्र सेन यांनीं राममोहन राय यांनीं स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजास मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली.

**बेइमान होऊं कसा**
दु. आ. तिवारी
क्र. ५६–पान : ११९

पानिपतच्या युद्धांतील मराठ्यांच्या तोफखान्यावरील मुख्य सरदार इब्राहिमखान गारदी याचे हे स्वगत उद्‌गार होत. खानाची 'जातिनिष्ठा' जागृत करून त्याला आपल्याकडे वळविण्यासाठीं अहमदशहा अबदालीनें त्याच्याकडे पगडी पाठविली. खानानें पगडी परत करून शिवाय मूठभर दारूहि बरोबर रवाना केली.

**माझें मृत्युपत्र**
सावरकर
क्र. ६१ पा. : १३९

देहान्त शासन समोर दिसत असतां, इंग्लंडमधील तुरुंगांत सावरकरांनीं ही कविता लिहिली आहे. सावरकरांची 'वहिनी'–कै. बाबा सावरकरांची पत्नी–ही केवळ वीरांगना नव्हती, वीरांना स्फूर्ति देण्याचें सामर्थ्यहि तिच्यामध्यें असलें पाहिजे. या कवितेच्या पूर्वार्धातील 'मी' अहंकाराचा निदर्शक नसून वस्तुस्थितीचा आहे. घरांतील मंडळींना व आपल्या अनेक मित्रांना स्वातंत्र्याच्या समरांगणांत नेऊन उभे करणारे स्वतः वि. दा. सावरकरच होते. प्रत्यक्ष कार्याची प्रेरणा त्यांच्यापासूनच सर्वांना मिळाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १६८८६१
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर